पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक – २०

सभावृत्तांत

दिनांक – १९.०८.२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑगस्ट-२०१३ ची मा.महापालिका सभा सोमवार दि.१९.०८.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी
२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२२. मा.पवार संगीता शाम

२३.मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२४.मा.तानाजी विठ्ठल खाडे
२५.मा.बो-हाडे शुभांगी संजय
२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२७.मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२८.मा.भारती फरांदे
२९. मा.आर.एस.कुमार
३०. मा.जावेद रमजान शेख
३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३२.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३३.मा.पांढरकर निलेश शंकरराव
३४.मा.नंदा विकास ताकवणे
३५.मा.नेटके सुमन राजेंद्र
३६. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३७.मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३८. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३९. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
४०.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४१. मा.लोंढे गणेश नारायण
४२.मा.शमीम पठाण (पठाणबाई)
४३.मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
४४.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४५.मा.अनंत सुभाष को-हाळे
४६.मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४७.मा.जयश्री वसंत गावडे
४८.मा.प्रसाद शेट्टी
४९.मा.अविनाश (दादा) टेकावडे
५०.मा.काळभोर वैशाली जालिंदर
५१.मा.सौ.साळुंके सविता सुरेश
५२.मा.शेख अस्लम शैकत
५३ मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५४.मा.वाबळे संजय मल्हारराव
५५.मा.मडिगेरी वर्षा विलास
५६.मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५७.मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
५८.मा.सुपे आशा रविंद्र
५९.मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
६०.मा.अजित दामोदर गव्हाणे
६१.मा.गोफणे अनुराधा देविदास
६२.मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६३.मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६४.मा.महेशदादा किसन लांडगे
६५.मा.श्रध्दा बाजीराव लांडे
६६.मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६७.मा.लोंढे शुभांगी संतोष
६८.मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६९.मा.ननवरे जितेंद्र बाबा
७०. मा.सावळे सिमा रविंद्र
७१.मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७२.मा.भोसले राहूल हनुमंतराव
७३.मा.पालांडे सुजाता सुनिल
७४.मा.बहल योगेश मंगलसेन
७५.मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७६.मा.कदम सदगुरु महादेव
७७.मा.गिता सुशिल मंचरकर
७८.मा.कैलास महादेव कदम
७९.मा.छाया जगन्नाथ साबळे
८०.मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
८१.मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
८२.मा.वाघेरे सुनिता राजेश
८३.मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
८४.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

८५.मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८६.मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८७.मा.काळे विमल रमेश
८८. मा.पाडाळे निता विलास
८९.मा.विनोद जयवंत नढे
९०.मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
९१. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
९२.मा.विमलताई सुरेश जगताप
९३.मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
९४. मा.बारणे निलेश हिरामण
९५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९६.मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
९७.मा.बारणे माया संतोष
९८.मा.ओव्हाळ शेखर अशोक
९९.मा.यमुनाताई रमणनाना पवार
१००.मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
१०१.मा.कलाटे स्वाती मयुर
१०२.मा.नांदगुडे विलास एकनाथ
१०३.मा.चौंधे आरती सुरेश
१०४.मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१०५.मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१०६.मा.बोकड रामदास गेणभाऊ
१०७.मा.जवळकर वैशाली राहुल
१०८.मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०९.मा.जगताप राजेंद्र गणपत
११०.मा.शितोळे शैलजा बाबुराव
१११.मा.जगताप नवनाथ दत्तु
११२.मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
११३.मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
११४.मा.जम सोनाली पोपट
११५.मा.प्रशांत शितोळे
११६.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

११७.मा.काटे रोहितअप्पा सुदाम
११८.मा.गायकवाड संध्या सुरदास
११९.मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१२०.मा.शेंडगे आशा सुखदेव
१२१.मा.मोटे किरण बाळासाहेब
१२२.मा.सोनकांबळे चंदकांता लक्ष्मण
१२३.मा.संजय केशवराव काटे
१२४.मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१२५.मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१२६.मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त,मा.झुरे-सह आयुक्त,मा.गायकवाड,मा.मुंढे,मा.कारचे,मा.कुलकर्णी,मा.टेकाळे,मा.दुरगुडे,मा.माछरे,मा.फुंदे-सहा. आयुक्त,मा.गावडे-नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहरअभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.पाटील, मा.चव्हाण,मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय- प्र.आरोग्य वैद्य. अधिकारी, मा.डॉ.मनोज देशमुख- प्र.वैद्यकिय अधिक्षक, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर,मा.सवणे,मा.चव्हाण,मा.रामदास जाधव,मा.कपिले, मा.थोरात, मा.साळवी, मा.काची, मा.पठाण,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.पिरजादे,मा.दांगट,मा.तांबे,मा.सय्यद,मा.बरशेटटी मा.जुंधारे - कार्य.अभियंता, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकिय अधिकारी, मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.पवार - प्र.कायदा सल्लागार, मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर:-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

नाशिकफाटा उड्डाणपुलाच्या सुशोभिकरणासाठी एल.ई.डी. दिवे वापरून प्रकाशव्यवस्था करणे या कामाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता व उपलेखाशिर्ष तयार करुन तरतुद वर्गीकरणास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल -७०                    प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, दि.०५/०८/२०१३ रोजी पाक सैनिकांनी केलेल्या हल्यात शहिद झालेले भारतीय जवान यांना तसेच चेतनदास खिओमल मेवानी,पिंपरी चिंचवड नगरपालिकेचे पहिले उपाध्यक्ष आणि भारतीय जनता पक्षाचे माजी शहराध्यक्ष, कुसूम विनायक भोसले, जेष्ठ पत्रकार विजय भोसले यांच्या मातोश्री,अनंत तिबिले,जेष्ठ साहित्यिक आणि शांताबाई गेणू भोसले,शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती गोविंद भोसले यांच्या मातोश्री यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्त्ब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

---------

**अ)** मा.महापालिका सभा क्र.१८ दि.२०/०६/२०१३, २७/०६/२०१३ (दु.१.०० वा. व दु.१.३० वा.) चा सभावृत्तांत कायम करणे.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौरसाहेब, मी मागिल सभेमध्ये बीआरटी विषयावर विषय क्र. १३ मध्ये माझे निवेदन डायसवर दिले होते. हे निवेदन सभावृत्तांतात समाविष्ट झालेले नाही. तरी सभावृत्तांत कायम करताना माझे म्हणणे सभावृत्तांतामध्ये पुढीलप्रमाणे समाविष्ट करुन घेणेत यावे – “महापालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नियम क्र. एन २.५.२, एन २.५.३ व एन २.५.४ मध्ये फेरबदल करणेकामी व नियम एन २.५.७ नव्याने समाविष्ट करणेकामी कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्याचा प्रस्तावास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात आला आहे. विकास नियंत्रण नियमावलीतील प्रस्तावित केलेल्या फेरबदलाबाबत सभागृहासमोर मांडण्यात आलेला मजकूर हा इंग्रजीत आहे. सभागृहातील ब-याच सदस्यांसह महापालिकेच्या अनेक जबाबदार अधिका-यांना देखील इंग्रजीतील विकास नियंत्रण नियमावली समजणे/अर्थ काढणे कठीण जाते. मा.महापौरसाहेब प्रशासनाने सभागृहासमोर ठेवलेल्या प्रस्तावात नियम एन २.५.२. च्या फेरबदल प्रस्तावात शेवटच्या परिच्छेदात ‘The minimum rate of premium may be s**utaiblly** revised as & when required’ असे नमूद केले आहे. मी इंग्रजीचा संपूर्ण शब्दकोश तपासला परंतू s**utaiblly** हा शब्द शब्दकोषात उपलब्ध नाही. तसेच एन २.५.४ च्या नियमात “ Setback/Front Margin foe all proposed developments/buildings”

असे नमूद केले आहे. इंग्रजीत foe या शब्दाचा अर्थ शत्रु असा होतो. प्रशासनाला Setback/Front Margin हे proposed developments/buildings चे शत्रु असे का म्हणायचे आहे याचा उलगडा मला झाला नाही. या व्यतिरिक्त नियम एन २.५.७ या नव्याने समाविष्ट करण्यात येत असलेल्या नियमात मुददा क्रमांक १ मध्ये " The the whole plot will be **considered as plot a within** BRT Corridor" असे नमूद केले आहे यातील **considered as plot a within** हे पुर्णपणे चुकलेले व्याकरण आहे. तसेच इतर अनेक चुका आयुक्तांच्या सहीने सभागृहासमोर मांडलेल्या प्रस्तावात आहेत. यावरुन प्रशासनातील जबाबदार अधिका-यांनाच इंग्रजी निट येत नाही हे सिध्द होते.

भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद ३४८ उप कलम १ (३) नुसार त्या त्या राज्याच्या भाषेनुसार कायदे, नियम, विधी, उपविधी,आदेश इ.करता येतात फक्त त्याचा अनुवाद इंग्रजी मध्ये उपलब्ध असला पाहिजे. तसेच संविधानाच्या या अनुच्छेद कालमर्यादा ही स्वातंत्र्य मिळाल्यापासून केवळ १५ वर्षापुरतीच लागू होती व नंतर प्रत्येक राज्य हे आपआपल्या भाषेनुसार कारभार करु शकते.

महाराष्ट्र राज्य भाषा अधिनियम १९६४ च्या कलम ५ नुसार महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या दिनांकापासून राज्याचा सर्व कारभार कायदे, नियम, आदेश, अधिसूचना, विधी, उपविधी आदेश इ. यांची अधिकृत भाषा ही मराठी असेल. मराठी भाषा हि राज्याच्या अकरा कोटी जनतेची अस्मिता आहे व शिवसेना भाजप युतीची सत्ता महाराष्ट्रात येताच शासनाने अधिसूचना काढून शासकीय कामकाजात मराठीचा वापर अनिवार्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्य भाषा अधिनियम १९६४ च्या कलम ५ अंमलात आणण्याची तारीख ही १५ ऑगस्ट १९९५ घोषीत केली व १९४७ साली इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळाल्यावर १९९५ ला महाराष्ट्राची इंग्रजीपासून सुटका केली. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन व्यवहारात मराठी भाषेचा वापर १००% करण्यासंदर्भात आत्तापर्यंत सुमारे ३९ आदेश काढलेले आहेत. भूमी संपादन अधिनियम, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ हे महापालिका कारभारातील महत्वाचे कायदे मराठीत उपलब्ध आहेत, शासनाचा सर्व कारभार मराठीत चालतो सर्व अधिनियम, आदेश, परिपत्रके मराठीत असतात. इतकेच नव्हे तर सार्वभौम संविधान

सुध्दा मराठीत उपलब्ध आहे. महापालिकेच्या नियमात महत्वाचे फेरबदल करताना सदस्यांना अंधारात ठेवण्यासाठी नियमातले बदल मुददांमून इंग्रजीत सभागृहासमोर मांडण्यात आले आहेत.

मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिका क्र.7513 of 2011 मध्ये दिनांक ०९/१०/२०१२ रोजी दिलेल्या निकालात न्या.मा.ए.एम.खानविलकर व न्या.मा.आर.एन.गानु यांच्या खंडपिठाने दिलेल्या निकालामध्ये विकास योजना अथवा विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करताना सदर फेरबदल हे सर्वांना समजण्यासाठी मराठीमध्ये करण्यात यावे असे आदेशित केले आहे. मात्र असे असतानाही महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करणेकामी सभागृहासमोर मांडण्यात आलेला संपूर्ण मजकूर हा इंग्रजीत आहे. यास्तव सदर मजकूर हा पुर्णपणे मराठीत सभागृहासमोर मांडण्यात यावा व तदनंतरच त्याबाबत निर्णय घ्यावा.

मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नियम एन.२.५.२. नुसार जुन्या व नव्या हददीतील मंजूर विकास योजनेतील कोणत्याही विकास हस्तांतरण हक्क झोनमधील निर्माण झालेला टी.डी.आर. बी.आर.टी. कॉरिडॉरमध्ये अधिमूल्य भरुन वापरता येईल व त्यासाठी आकारण्यात येणारा अधिमुल्य हा मा.महापालिका सभा ठराव क्र. ४५२ दिनांक १९/८/२००८ मध्ये ठरविलेल्या दरांपेक्षा म्हणजेच

अ) नविन गावांमधील प्रस्तावीत झोन मधील टीडीआर साठी रु. १२००० प्रती चौ.मी

भ) सी- झोन मधील प्रस्तावीत झोन मधील टीडीआर साठी रु. ९००० प्रती चौ.मी.

क) बी- झोन मधील प्रस्तावीत झोन मधील टीडीआर साठी रु. ६००० प्रती चौ.मी.

ड) ए- झोन मधील प्रस्तावीत झोन मधील टीडीआर साठी रु. ३००० प्रती चौ.मी.

कमी नसावा व सदर अधिमुल्याचे दर आयुक्तांनी वेळोवेळी ठरवावयाचे आहेत. त्याच भूखंडातील रस्ता रुंदीकरणातील ०.४० च.क्षे.नि.(चटई क्षेत्र निर्देशांक) साठी अधिमुल्य आकारला जाणार नाही अशी तरतूद आहे. नियम एन.२.५.२. मध्ये जुन्या व नव्या हददीतील मंजूर विकास योजनेतील कोणत्याही विकास हस्तांतरण हक्क झोनमधील निर्माण झालेला टी.डी.आर. बी.आर.टी. कॉरिडॉरमध्ये अधिमुल्य भरून वापरता येईल. यासाठी यापुर्वी शासनाने मंजूर केलेल्या धोरणानुसार अधिमुल्य आकारणी न करता त्याऐवजी ज्या ठिकाणी टी.डी.आर. निर्माण झाला व ज्या ठिकाणी वापरण्यात येणार आहे त्या दोन्ही जागेचे शासनाचे

रेडिरेकनर दरांतील फरक किंवा रु.५००० प्रती चौ.मी. या दोन्हीपैकी जो जास्त असेल तो आकारण्यात यावा असा फेरबदल प्रस्ताव प्रशासनाने मांडला आहे.

बी.आर.टी च्या पहिल्या टप्प्यातील ते आळंदी रोड व नाशिक फाटा ते वाकड या दोन रस्त्यांसाठी महापालिकेला स्वहिस्सा सहित अतिरिक्त खर्च असे एकूण ४०० कोटी रुपये खर्च करावा लागत आहे. बी.आर.टी. च्या ८ रस्त्यांसाठी एकूण ९६.७४ कि.मी.चे अंतर आहे आणि सदर ८ रस्त्यांच्या प्रकल्पासाठी एकुण रु.३००० कोटी रुपयांचे खर्च अपेक्षित आहे. आजपर्यंत बीआरटीएस रस्त्यांच्या कामाची प्रगती पाहता कामास उशिर होणार असल्याने हा खर्च अजून रु.५०० कोटी ने वाढणार आहे. बी.आर.टी रस्त्यांच्या दोन्ही बाजूच्या १०० मी. क्षेत्रात अतिरिक्त १ च.क्षे.नि. लागू करुन या जादा एफ.एस.आय. ला अधिमूल्य आकारले जात आहे बी.आर.टी रस्त्यांच्या खर्चासाठी व देखभाल दुरुस्तीसाठी होणारा खर्च या अधिमुल्यांच्या रक्क्मेतून होणार आहे. महापालिकेच्याच आकडेवारीनुसार शहरातील केवळ ८ बी.आर.टी. कॅरॉडॉरच्या क्षेत्रात ५ लाख ७३ हजार १२०० चौ.मी. क्षेत्रावर विकास अपेक्षित आहे व प्रचलित नियम एन.२.५.२. नुसार अधिमूल्य आकारल्यास महापालिकेला सुमारे रु.४५८४.९६ कोटींचे उत्पन्न अपेक्षित आहे. प्रशासनाने मांडलेल्या फेरबदल प्रस्तावानुसार ज्या ठिकाणी टीडीआर निर्माण होणार व ज्या ठिकाणी तो वापरण्यात येणार आहे या दोन्ही जागांचे शासनाचे रेडिरेकनर दरांतील फरक किंवा किमान रु.५००० प्रती चौ.मी.इतके अधिमुल्य आकारण्यात येणार आहे. महापालिकेच्या टीडीआर वाटपांचे अवलोकन केल्यास असे स्पष्टपणे दिसुन येते कि शहराच्या वाढीव हददीच्या गावांमधुनच टिडीआरच्या मोबदल्यात आरक्षणातील क्षेत्र ताब्यात येत आहे. तसेच बीआरटीएस कॉरिडॉरचे ठिकाणी जादा एफएसआय वारताना ९० टक्के पेक्षा जास्त प्रकरणांमध्ये वाढीव हददीत निर्माण झालेल्या टीडीआरचाच वापर होत आहे. वाढीव हददीतील मोशी, डुडुळगाव, वडमुखवाडी,किवळे,च-होली,चिखली आदी गावांच्या सरासरी रेडीरेकनरचा दर ३५०० रु प्रती.चौ.मी. इतका आहे तर बीआरटीएस रस्त्याच्या लगत असलेल्या चिंचवड, रहाटणी, पिंपळे निलख, वाकड, आकुर्डी, भोसरी आदी विकसीत भागाचा सरासरी रेडीरेकनरचा दर हा ८५०० रु.प्रती चौ.मी.इतका आहे. म्हणजेच टिडीआर निर्माण होणा-या क्षेत्राच्या व टिडीआर वापराच्या

क्षेत्रांच्या रेडिरेकनरच्या दरातील फरक हे सरासरी ५००० रु प्रती चौ.मी. इतके आहे. बी.आर.टी. कॅरीडॉरच्या क्षेत्रातील अपेक्षित विकासाचे ५ लाख ७३ हजार १२०० चौ.मी. क्षेत्रात नव्या प्रस्तावीत फेरबदलामुळे वाढीव हददीतील टिडीआरचे वापराबाबत प्रचलित नियमातील दर १२००० रु.प्रती चौ.मी.ऐवजी ५००० रु. प्रती चौ.मी.इतकाच दर आकारला जाणार आहे. बिआरटी कॉरिडॉर मधील अपेक्षित विकासातील क्षेत्रांपैकी केवळ ७० टक्के क्षेत्रात म्हणजेच सुमारे ४० लाख चौ.मी.क्षेत्रात टिडीआरचा वापर हा वाढीव हददीतील निर्माण होणा-या टिडीआरने झाला तर १२००० रु प्रती चौ.मी.च्या दराऐवजी ५००० रु प्रती चौ.मी.दर आकारल्यास महापालिकेच्या उत्पन्नात सुमारे २८०० कोटी रुपयांची (४० लाख चौ.मी.X ७००० रु.प्रती चौ.मी.) घट होणार आहे. एन.२.५.२. मध्ये अशा प्रकारे बदलांमुळे महापालिकेचे खूप मोठे आर्थिक नुकसान होणार असून असे बदल हे बी.आर.टी. कॉरिडॉर च्या मूळ संकल्पनेलाच बाधा पोहचविणारा असून लोकहिता विरुध्द आहेत.

बिल्डरांची सुपारी घेऊन असे प्रस्ताव वांरवार सभागृहासमोर मांडले जात आहेत का? या व्यतिरिक्त पार्कींग बाबतचे प्रस्तावीत फेरबदल हे छोटया प्लॉट धारकांना विकास करताच येऊ नये असे आहेत. बीआरटीएस रस्त्याच्या लगत नेमके किती पार्कींग लागणार आहे? किती व कोणकोणत्या प्रकारची वाहने महापालिकेस प्राप्त होणा-या पार्कींगचा वापर करणार आहेत? या नव्या नियमामुळे अंदाजे किती पार्कींगचे क्षेत्र प्राप्त होणार आहे? याचा कोणताही शास्त्रोक्त अभ्यास प्रशासनानने केलेला नाही. दिनांक ३/३/२०१० रोजी म्हणजेच सुमारे ३ वर्षापुर्वीच सभागृहाच्या शिफारशीने प्रशासनाने तयार केलेले बीआरटी रस्त्याबाबतचे नियम मंजूर करण्यात आले असताना ते इतक्या लवकर व वारंवार बदलण्याचा खटाटोप प्रशासन का व कोणच्या हितासाठी करत आहे? बिल्डरांची सुपारी घेऊन महापालिकेच्या आर्थिक हिताचा कोणताही विचार न करताच हा फेरबदल प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात आला आहे. मा.महापौरसाहेब नगररचना विभागाकडून या फेरबदलाबाबतची माहिती मी मिळविण्याचा प्रयत्न केला मात्र नव्याने प्रस्तावीत करण्यात येत असलेले फेरबदल हे कोणत्याही अभ्यास, पाहणी शिवाय प्रस्तावीत करण्यात आलेले आहेत. महापालिकेच्या महसुलात २८०० कोटी रुपयांचे नुकसान करणा-या या फेरबदल प्रस्तावास मी पुर्णपणे विरोध करत आहे.”

यापप्रमाणे मा.सिमा सावळे यांचे निवेदन विषय क्रमांक १३ मध्ये समाविष्ट करणेत येऊन मा.महापालिका सभा क्र.१८ दि.२०/०६/२०१३, २७/०६/२०१३ (दु.१.०० वा. व दु.१.३० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत येत असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विद्युत विभागाबद्दल प्रश्न आहे. त्यांचे स्टेटमेंट करायचे आहे. मी प्रश्न दिले होते. त्याची कॉपी डिपार्टमेंटला गेली, त्याच्याच दुस-या दिवशी कॉन्ट्रॅक्टर माझ्याकडे जे प्रश्न विचारले त्याची कागदपत्रे घेऊन आला होता. प्रश्न, महापालिकेची कागदपत्रे कॉन्ट्रॅक्टरपर्यंत एक दिवसात कसे पोचले जातात याची मला माहिती पाहिजे. कदाचित कॉन्ट्रॅक्टरला वाटले असेल जे काही प्रश्न विचारायचे त्याचे पैसे द्यायचे. म्हणजे अबसेंट रिपोर्ट म्हणून आला असेल. पण त्याच्यापुढे कागदपत्रे कशी गेली. दुसरी गोष्ट म्हणजे कमिशनर साहेब, आपल्याकडून ही अपेक्षा नव्हती. आपण प्रश्नांना जी उत्तरे दिली आहेत, ती तुमच्यासारख्या रिस्पाँडंट ऑफीसरने दिली म्हणून याबद्दल खेद वाटतो. मी प्रश्न १अ विचारला होता की, टेंडर नं.१२/४-२००७-२००८ या विद्युत क प्रभागातील टेंडरची चौकशी केव्हा सुरु केली? या प्रश्नाचे उत्तर दिले आहे की, प्रकरणी जुन २०१३ मध्ये चौकशी केली आहे. जून २०१३ मध्ये आयुक्त साहेबांनी प्रस्तावाबाबत ६४ लाख वसूलीचा रिमार्क दिला आहे. २४ जून रोजी रिमार्क दिला आहे. विकास अभियंता यांनी हा मुद्दा वेगळा घेतला नाही. सर्व वसूली करावी. म्हणजे ६६ लाखांची वसूली झालेली नाही. मग का झाली नाही याचे उत्तर दिले आहे, वसूली झाली नाही. ठेकेदाराची अंतिम देयक अदा करताना वसूलीची विधीवत कार्यवाही करणेत येईल. माझ्या म्हणण्याप्रमाणे अंतिम देय रक्कम ४० लाख सुद्धा नाही. ठेकेदाराकडून ६६ लाख कशाला वसूल करायचे? ही फक्त ठेकेदाराची जबाबदारी आहे का? काही झाले की ठेकेदाराकडून वसूली करायची. याला अधिकारी का जबाबदार नाही? या डॉकेटमध्ये अधिका-यांनी सही केली असेल, आयुक्त साहेबांनी सही केली असेल, त्यांनी विषय पास केला असेल तर मग ठेकेदाराकडून रक्कम कशी काय वसूल करताय? ६६ लाख वसूल करा असे आयुक्त म्हणतात. अधिका-यांकडून सुद्धा वसूल केले पाहिजे. ठेकेदाराने सप्लाय केला नसेल, त्याने बील दिले नसेल तर त्याच्याकडून वसूली करायचा प्रश्नच येत नाही. ६६ लाखांची वसूली ताबडतोब करण्यात यावी. अधिकारी व ठेकेदार दोघांनी एकत्र येऊन पैसे भरायला पाहिजेत. फक्त ठेकेदाराला दोषी धरु नये. ज्यावेळी ६६ लाख वसूल करायचे. आयुक्त म्हणतात, चुकीचे काम झाले आहे. कामात चुक आहे. अंतिम देय म्हणजे काय? काय देणार. अजून ५ वर्षे दिले नाहीतरी काय होणार? विद्युत विभागाकडून या कामाला १० महिन्यांची व्हॅलिडीटी होती. त्याला २०१३ पर्यंत मुदत वाढवत

आणून अंतिम देयक अदा करताना वसूली करताय. ही रक्कम देण्यास जबाबदार अधिकारी कोण आहे – या प्रश्नाचे उत्तर तुम्ही दिले आहे की, तत्कालिन विकास अभियंता (वि/यां) यांनी दि.१८.८.२००७ चे निविदा सूचना क्र. १२/०७-०८ संबंधित कामांकरिताचे निविदापूर्व सभेच्या निर्णयाप्रमाणे सदर भाववाढ देणेबाबत मान्यता दिली होती. त्यानुसार कार्य.अभियंता (वि) क प्रभाग कार्यालयाकडुन भाववाढ फरक बिले अदा करणेत आली होती. या उत्तरात आयुक्त यांचा उल्लेख नाही. तत्कालिन विकास अभियंता यांचे नाव लिहिलेले आहे. आत्ता जे काम करतात, त्यांच्या नावे पेमेण्ट दिलेले आहे. How that person is responsible? ज्यांनी पेमेण्ट दिले ते सर्व लोक जबाबदार आहेत. It is a cumulative responsibility. प्रश्न क्र.५ मध्ये त्याच्याकडून रक्कम वसुल करणार का असा प्रश्न विचारल्यावर तुम्ही उत्तर दिले आहे, ज्या बाबींकरिता भाववाढ रक्कम देय नाही त्यांची पडताळणी करुन सदर रक्कम संबंधित ठेकेदाराकडून वसुली करणेबद्दल कार्यवाही करणेत येईल. परंतू हा प्रोजेक्ट चुकीचा आहे. यात ठेकेदाराची चूक काय? तुम्ही ऑर्डर दिली. त्याने सप्लाय केला. यात फक्त ठेकेदारच जबाबदार आहे का? २५ टक्के रक्कम मेंटेनन्ससाठी, वाटप करण्यात गेली आहे. प्रश्न क्र.६ विचारला आहे, त्यांच्यावर काय कारवाई केली? यामध्ये तुम्ही उत्तर दिले आहे, संबंधित अधिका-यांकडून खुलासे प्राप्त झाले आहेत व ठेकेदारांकडून वसुली करणेत येणार असल्याने अधिका-यांवर अद्याप कारवाई केलेली नाही. खुलासा आल्यानंतर सुद्धा तुम्ही कारवाईसाठी कोणाची वाट पाहताय? आज ५ वर्षे झाली काम चालू आहे. अंतिम देयक प्राप्त झाले नाही तोपर्यंत कारवाई करणार नाही का? हे मोशी इथले काम आहे. तिथे २५ टक्के हार्डरॉक असल्याचे म्हटले आहे. म्हणजे ठेकेदाराला जास्त पैसे द्यायचे. मोशी इथे हार्डरॉक आहे का? किती गलथान कारभार आहे बघा. आत्ता पेमेण्ट केले त्याची चौकशी होणार नाही का? प्रश्न १ क) मध्ये विचारले आहे, सदर निविदा रिंग करुन संगनमताने भरण्यात आली का, त्याची चौकशी झाली असल्यास त्याकरिता जबाबदार अधिकारी कोण आहेत – त्या काळात प्रभाग अ, ब व ड मध्ये या कामाचे टेंडर मंजूर झाले होते. ते तुम्ही बघू शकता. त्या काळातील टेंडर ३५ टक्के बिलो असताना काही टेंडर ५ टक्के अबोव्ह झाले आहेत. ब प्रभागात ४० टक्के काम झाले होते, हे कबूल केले पाहिजे. एका प्रभागात अबोव्ह टेंडर मंजूर होते, त्याच कामाचे टेंडर दुस-या प्रभागात ३५ टक्के बिलो कसे जाते? त्यावेळचे इंटर्नल ऑडीटर यांनी काय केले, आयुक्त यांनी काय केले, कोण विचारणार? आम्हाला वाटले, तुम्ही †क्शन घेणार, प्रश्न विचारणार. तुम्ही चुकीच्या कामांना पनिशमेंट देता, अशी भावना असल्यामुळे आम्ही इथे प्रश्नउत्तरे देतो, बोंब मारतो. हे टेंडर म्हणजे पूर्वीचे टेंडर नाही. १० महिने व्हॅलिडीटी असणा-या टेंडरला ६ वर्षे चालू ठेवले आहे. बघा कोणत्या कायद्यात बसते? मी प्रश्न २ अ) मध्ये सर्व निविदांबाबत प्रश्न केला आहे. मी या निविदा वाचून बघितल्या आहेत. जानेवारी २००८ला वर्कऑर्डर दिली. दि.२८/१/२००८ला मुदत वाढवून दिली. डिसेंबरमध्ये वर्क ऑर्डर

दिली आणि लगेच फेब्रुवारी २००१मध्ये १० कोटी वाढवले. इंटर्नल ऑडीटर कुठे गेले? १ टक्याऐवजी २ टक्के हा दर आत्ता चालू आहे. कोणी चूक काढणार नाही. इतकी लूटमार चालू असताना सुद्धा त्यावेळचे आयुक्त यांनी, इंटर्नल ऑडीटर यांनी बघितले का? शासनाला सांगून टाका, ऑडीट विभागावर खर्च होतो. ते बंद करा त्याची काही गरज नाही. प्रश्न २ब मध्ये विचारले आहे, निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता आहे का? तुम्ही उत्तर दिले, यात अनियमितता नाही. म्हणून आपण त्या टेंडरचे ६६ लाख वसूल करायला सांगता. म्हणजे यात अनियमितता नाही. मग अधिका-यांना सस्पेण्ड करणार का? चुकीचे पत्र दिले म्हणून †क्शन घेणार का? जर अनियमितता नसेल तर ६६ लाख वसूल करायची ऑर्डर कशी दिलीत ते सांगा. २ क) मध्ये मी प्रश्न विचारला होता, २ कोटीचे १२ कोटी रिवाईज केले का? २ कोटींचे ३ कोटी करा, पण २ कोटींचे १२ कोटी केलेत, त्यावर ६६ लाख दंड केला. ३६ कोटींचे ७२ कोटी केल्यावर पॉईंट आऊट केल्यावर कमिशनर यांनी †क्शन घेतली नाही. मला वाटायला लागले आहे, मी पुरावे देत असताना सुद्धा तुम्ही †क्शन घेत नाही. २ कोटींचे १२ कोटी होऊ शकतात का? ७/१२/ ला वर्क ऑर्डर दिली होती. एक महिन्यात १० कोटी वाढवून दिले आहेत. प्रश्न ३ मध्ये मी विचारले आहे – मे.शहा इलेक्ट्रीकल्स कॉन्ट्रॅक्टर्स यांच्या विद्युत विभागातील कामाबाबत आर्बीट्रेशन निकालाबाबत विचारणा केली. या आर्बीट्रेशन यांचे १०० पानी ४ अवार्ड आहेत. त्यात आपण स्पष्ट सांगितले आहे, आपल्या अधिका-यांनी चूक केली आहे. ठेकेदाराने पैसे दिले नाही आणि तो हाय कोर्टात गेलातर आर्बीट्रेशन निवाड्याप्रमाणे (पुस्तकातील मजकूर वाचून दाखवला) यात ताशेरे ओढले आहेत. महापालिका सभेत ज्या अधिका-यांनी उत्तर दिले, त्यांना सस्पेण्ड करण्याबाबत ताशेरे ओढले आहेत. तुम्ही म्हणता आर्बीट्रेशन यांनी अवार्डमध्ये ताशेरे ओढलेले नाहीत. मी लवादाने दिलेला निवाडा वाचून दाखवतो – (वाचून दाखवले) हे ताशेरे नाहीत का? महापालिका सभेसमोर किती चुकीची माहिती दिलेली आहे. ब्लॅकचे व्हाईट होत असताना उत्तर काय देताय, ताशेरे ओढलेले नाहीत म्हणून. आम्हाला अशी चुकीची उत्तर द्यायला, चुकीचे लिहून द्यायला किती गटस् असायला पाहिजेत. यामध्ये, कहाणी तयार करुन आर्बीट्रेशनसमोर दिली असे ताशेरे ओढले आहेत. तरी तुमचे अधिकारी म्हणतात ताशेरे ओढलेले नाहीत. म्हणून विकास अभियंता यांना सस्पेण्ड करा अशी मागणी इथे करतो. याबरोबर ४ मुद्यांवर ताशेरे ओढलेले आहेत. असे असताना kindly म्हणतात, ताशेरे ओढलेले नाहीत. रिटायर्ड ऑफिसर म्हणतात, कनेक्टीव्हीटीमध्ये चुकीचे काम केले आहे. मुद्दा क्र. ४ मध्ये †नमेक इलेक्ट्रीकल्स यांच्या ड प्रभागातील भूमीगत केबलच्या कामामध्ये गैरव्यवहार/अपहार झाला आहे असे उत्तरामध्ये म्हटलेले नाही. या प्रकरणी चौकशी सुरु आहे असे उत्तर दिले आहे. हे अधिका-यांचे स्किल आहे. हो म्हणायचे नाही आणि नाहीही म्हणायचे नाही. आयुक्त यांनी स्पष्ट लिहिलेले आहे, गैरव्यवहार/अपहार झालेला आहे. म्हणजे प्रश्नोत्तरांमध्ये दिलेले उत्तर

चुकीचे आहे. या मुद्यामध्ये प्रश्न क्र.२ विचारला होता, जबाबदार अधिकारी कोण? यात कार्यकारी अभियंता (वि) ड प्रभाग हे सदर कामाचे प्रभारी प्रमुख आहेत. असे उत्तर दिले आहे. कार्यकारी अभियंता कोण होते. त्यांचे नाव का घेतले नाही, त्यांचे नाव आत्ता सांगा. प्रश्न क्र.४ मधील मुद्दा क्र.३ मध्ये त्यांच्यावर आणि ठेकेदारावर काय कारवाई झाली – सदरच्या कामाचा अंतिम चौकशी अहवाल अप्राप्त असल्याने कारवाई झाली नाही. हे दिलेले उत्तर चुकीचे आहे. आम्हाला खरे उत्तर द्यायचे नाही. कमिशनर यांनी अधिका-यांना बळी पडू नये. मुद्दा क्र.४ मध्ये संबंधित अधिकारी यापुर्वी ट्रान्सफॉर्मर चोरी प्रकरणी निलंबीत होता का या प्रश्नाचे उत्तर होय असे दिले आहे. परंतू अधिका-याचे नाव सांगितले नाही. मुद्दा क्र.५ मध्ये वारंवार अपहार/चोरी करुनही कारवाई का होत नाही या प्रश्नाचे उत्तर संबंधित अधिकारी यांचेवर प्रशासकीय शास्तीची कार्यवाही झाली आहे असे उत्तर दिले. मी विचारलेल्या प्रश्नांना अजून सुद्धा व्यवस्थित उत्तरे मिळत नाहीत. माझ्या माहितीप्रमाणे मोशी सारख्या भागात काम झालेले आहे. तिथे भुसभुशीत माती आहे. खडक नाही. बीलाच्या ऑर्डरचे पैसे दिले होते. या कामाबद्दल स्वतः साहेबांनी नमूद केलेले आहे. नोटीसमध्ये सगळी उत्तरे चुकीची आहेत. आपल्याला विनंती आहे की, प्रशासनामध्ये चौकशी करुन कारवाई करा. पण चुकीची उत्तरे दिल्याबद्दल अधिका-यांवर काय कारवाई करणार याचे उत्तर द्या. पॉलिसी डिसीजन घेतला जातो. १२३ निवडून आलेले नगरसेवक आहेत. ५ कॉर्पोरेट स्वीकृत नगरसेवक आहेत. हे लोकशाहीचे मंदीर आहे. इथे तुम्ही लोकांना खोटी उत्तरे देताय. विकास अभियंता यांच्याकडे किती गटस् असायला पाहिजेत. त्याबद्दल त्यांना सस्पेण्ड करणार का नाही याचे उत्तर द्या.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ज्येष्ठ नगरसेवक व माजी महापौर मा.आर.एस.कुमार यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये † नमेक इलेक्ट्रीकल्स या कंपनीचा उल्लेख आहे. मी मा.आर.एस.कुमार यांचे अभिनंदन करते की, त्यांनी अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित करुन सभागृहात अतिशय महत्वाच्या विषयाकडे लक्ष वेधले आहे. २०१३ मध्ये † नमेक इलेक्ट्रीकल्स संदर्भात तक्रार केली होती. नो डाऊट, ही फाईल देण्यासाठी आपण मला मदत केलीत. जवळपास ४० ते ५० लाखांचा दंड या ठेकेदाराला बसतोय. आपण चेन्नई इथे गेला होतात. अधिका-यांनी फाईलची पळवापळवी केली होती. हे सुद्धा आपल्या कानावर घातले होते. संबंधित अधिका-याकडे फाईलसाठी गेले तर माहिती अधिकारात पत्र दिले होते. एक तारखेपासून सात तारखेपर्यंत माझे पत्र स्विकारले नाही. प्रत्येकजण आपल्या गोटातला बॉल दुस-याच्या गोटात टाकत होता. जवळपास १८ तारखेला माहिती घ्यायला गेलेतर संबंधित अधिका-याने सांगितले, नगरसेवकांनी वेळ द्या. दोन महिने फाईल मिळाली नाही. लेखाधिका-यांकडे गेले. श्री.घाडगे यांच्याकडे गेले. त्यांचा आम्हाला फायदा झाला. ही गोष्ट आपल्या

कानावर घातल्यानंतर † नमेक इलेक्ट्रीकल्स कंपनीची फाईल आपल्याकडे दिली. जवळपास ६ महिने उलटले आहेत. नेमके इनवेस्टीगेशन काय करतो? तक्रारधारकांना एक पत्र पाठवून तसदी घेतली का? ६/६ महिने आपल्या उत्तराची वाट पाहून त्यावर कोणतीही कारवाई करत नाही. म्हणून सभागृहात प्रश्न विचारण्याशिवाय पर्याय रहात नाही. खरेतर माझ्या पत्राचे काय केले, तर त्या पत्रावर चौकशी लावली आहे. जिथे ४९ लाख दंड घेणार आहात, जिथे २५ लाखाची रिकव्हरी काढणार असाल तर, ज्या-ज्या अधिका-यांनी डोळ्यांत धूळफेक करायचा प्रयत्न केला, त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात? ठेकेदाराने दबावतंत्र म्हणून नुकसान भरपाईचा दावा दाखल करणार असल्याचे पत्र पाठवले आहे. माझ्याकडे एवीडन्स आहे. ठेकेदाराने ज्या कंपनीची केबल घेतली होती. त्याने तीच परत करायला पाहिजे होती, ती परत न करता विशाल कंपनीची केबल परत केली होती. दरवाढ देताना करंट डिसी रुलप्रमाणे आणि दंड मारताना मात्र २००७ ला वर्कऑर्डर दिली होती त्याप्रमाणे दंड मारायचा. या सगळ्यातून स्वच्छ उघड आहे की, चोरी करणारा योग्य आहे. दरवाढ व दंड सुद्धा आजच्या डी.सी. रुलप्रमाणे झाला पाहिजे. याठिकाणी जेवढी उत्तरे त्यांनी दिलेली आहेत, ती पूर्णपणे दिशाभूल करणारी दिली आहेत. क प्रभागात २००७-०८ चे टेंडर होते. आत्ताच मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले आहे, २ कोटींचे टेंडर काढतो. त्याला १० कोटींची मुदतवाढ देतो. वाढीव कामाची मुदतवाढ एक महिन्याच्या आतमध्ये देतो. हे पहिल्याच दिवशी ठरले होते,काय काम करायचे. एक महिन्यात १० कोटींची वाढ होऊ शकते का? हे कसले इंजिनिअर आहेत. यांना भाजी विकायचे स्टॉल लावून दिले पाहिजेत. यांनी सभागृहात बसून आम्हाला अक्कल शिकवायचा अधिकार नाही. हे कसले इंजिनिअर आहेत. दि.१२/४-२००७-२००८ ला २ कोटींची ऑर्डर दिली, दुसरी ऑर्डर दि.१२/५-२००७-२००८ ला म्हणजे एक महिन्याच्या फरकाने दिली. अशा प्रकारे वर्कऑर्डर दिली जात असेलतर त्यामध्ये काहीतरी घोटाळा आहे हे निश्चित आहे. त्यावेळी श्री.कपिले हे संबंधित अधिकारी होते. त्यांना दंड झाला पाहिजे. अ, ब व ड प्रभागांमध्ये ३५ टक्के बिलो टेंडर असताना क प्रभागात अबोव्ह टेंडर गेले होते. याची चर्चा झाली. अधिकारी सांगतात, आपल्याकडे बील अबोव्ह म्हणजे ३५ टक्के आले होते म्हणून ३० टक्के इतके कमी करायला सांगितले. त्याचे कारण काय? टेंडर चीनमधल्या कंपनीचे, चीनमध्ये काय झाले म्हणून त्याचा आपल्याकडे काय संबंध आला? संबंध असेलतर ४ प्रभागांतील रेट काढले पाहिजेत. ३ प्रभागांत रेट वाढले नाहीत. फक्त क प्रभागांत रेट वाढला आहे. २०१३चे एंडींग आहे तरी अजून पर्यंत हे काम चालू आहे. खरेतर अशा ठेकेदारांवर कारवाई झाली पाहिजे. यांना काळ्या यादीत टाकले पाहिजे. ५/६ महिने पत्र दिल्यानंतरही उत्तर देत नाही. याबाबतीत निश्चितपणे खुलासा करावा, काय दंड मारला आहे, कशा पद्धतीने लावला आहे याचा खुलासा करावा. याठिकाणी मा.आर.एस.कुमार यांनी दुसरा प्रश्न विचारला होता. शहा इलेक्ट्रीकल्स् कॉन्ट्रॅक्टर्स यांच्या विद्युत विभागातील

कामाबाबत आर्बीट्रेशन निकाल काय झाला? खरेतर हे आपल्या चाणाक्ष नजरेतून सुटले नसेल. या आर्बीट्रेशनमध्ये ३१.६.२ असा जो पार्ट आहे. त्यात आर्बीट्रेशन सांगते, “The demeanor of the witness is also to be considred. Shri.Kapile was taking considerable time, sometime as long as 15 to 20 minutes to answer certain questions. It was evident that he was debating in his mind as to which will be the most suitable answer and favourable to the Respondents’ case. Thus he was not spontaneous in answering the questions, but was constructing the answers by thinking for long time as to what he should say. This indicates that the answers cannot be considered reliable. Shri. Kapile has contradicted himself a number of times. Some examples pointed out were as under – In his affidavit, Shri. Kapile has stated in Para 5 (b) that the Claimant has submitted FDR after four months. After further questioning in Q.19 and Q.20, he has admitted in answer to Q.20 that there was no delay in submitting FDR. Thus Shri.Kapile has made false statement in sworn affidavit.” याठिकाणी श्री.कपिले हे आर्बीट्रेटर यांना खोटे उत्तर द्यायला घाबरले नाहीत. यासंदर्भात आयुक्त साहेबांबरोबर पत्रव्यवहार झाला आहे. त्यावर उत्तरे मिळाली नाहीत. याठिकाणी हार्ड रॉकचा उल्लेख झाला आहे. आज आधुनिक टेक्नीकच्या मशीनरी आलेल्या आहेत. मोशीसारख्या ठिकाणी त्या वापरता येतील. मशीनने लेवलिंग करता येते. जमिनीत कुठे माती आहे, कुठे मुरुम आहे, कुठे दगड लागेल हे मशीनने न खोदता शोधून काढू शकतो. याची टेस्ट घ्यावी. ज्या-ज्या ठिकाणी ठेकेदाराला पैसे दिले गेले आहेत, ते दंडासहित वसूल करावेत. संबंधित अधिका-यावर सुद्धा कारवाई झाली पाहिजे. क प्रभागात सुमे इलेक्ट्रीकल्स् या ठेकेदाराला काम दिले होते. त्या कामात अशाच प्रकारचा भ्रष्टाचार झालेला आहे. तो विषय आपल्याकडे आलेला नाही. तुम्ही म्हणता, हा विषय माझ्या काळात झालेला नाही. माझ्या काळात झालेली कामे सांगा. ज्यावर तुमच्या सह्या आहेत, ती कामे सांगीतली तरी उत्तर मिळत नाही. आपल्याकडून अजिबात अपेक्षा नाही. अजून ६ महिने उत्तर देऊ नका. एकदा चौकशी करा. आरोप करायचे म्हणून करत नाही. एकदा खरेच चौकशी करा. कोणी हात वर करायचा, अधिका-यांना कसा फायदा द्यायचा, हे ठरत असेल तर व्हिजिलन्स डिपार्टमेंट काय करते याचा शोध घ्यावा लागेल. ६/६ महिने सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे मिळत नसतील तर आम्ही काय समजायचे? आपण अत्यंत कार्यक्षम, नॉन करप्टेड अधिकारी म्हणून तुमचा उल्लेख केला जातो. परंतू आम्हाला तुमच्याकडून वेळेत उत्तरे मिळत नाहीत. पत्र देतो. संबंधित अधिका-यांना मार्क करता, उत्तर मिळत नाही. आत्ता वाटायला लागले आहे, पत्र द्यायचे का नाही, नको. † नमेक इलेक्ट्रीकल्स् यांच्या फाईलवर सही केली होती. आपण स्वतः विषय मंजूर केला होता. आपले अधिकारी फसवतात. कोणी कारवाई करत नाही. त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. एक रुपयाची वस्तू चार रुपयाला, चार रुपयाची वस्तू चाळीस रुपयाला घ्यायची. त्यांची हिंमत वाढवायचे काम करताय. कोणी कारवाई करत नाही. एकप्रकारे भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देताय. कामाचा वर्कलोड जास्त आहे हे

समजू शकतो. आपण सारथी ही एक लिंक केली, तशीच सदस्यांच्या पत्रांना सुद्धा थोडीफार किंमत द्या, जास्त देऊ नका. † नमेक इलेक्ट्रीकल्स् यांच्या कामात एक रुपयाचा सुद्धा भ्रष्टाचार नाही असे मला उत्तर द्या.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कृपया मा.आर.एस.कुमार साहेबांनी माझ्या प्रश्नांमधून गैरसमज करुन घेऊ नये. मला आपल्याला प्रश्न विचारायचा आहे. मा.आर.एस.कुमार यांना प्रश्न विचारलेला नाही. ६४ लाखांची वसूली या प्रकरणी जी.बी. मध्ये पत्र दिल्यानंतर ऑडीटर यांच्याकडे फाईल पाठवली असणार. आपल्याला प्रश्न करायचा नाही. ज्या गृहस्थाला ६४ लाखांची वसूली करावी असे वाटते, त्याने सभागृहाला सविस्तर उत्तर द्यावे. निविदा केव्हा काढली होती, त्या निविदेवर त्यावेळच्या आयुक्तांनी व डिपार्टमेंटने असा निर्णय का घेतला, अशी मंजूरी का दिली, फक्त एक अभियंता त्याला जबाबदार आहे किंवा तो ठेकेदार जबाबदार आहे? दोषींवर कारवाई मग तो कोणीही असेल व्हायला पाहिजे. ऑडीटर यांची यातून कायम सूटका होते. ऑडीटर यांना असा अभिप्राय द्यावा असे का वाटले याचा खुलासा पहिल्यांदा ऑडीटर यांनी करावा. त्यांना हे हे वाटते, ६४ लाखांची वसूली करावी. ज्या कोणी ऑडीटमध्ये हे काढले असेल त्याने उत्तर द्यावे. त्यावेळच्या विद्युत विभागातील संबंधित अधिका-यांनी फाईल आल्यानंतर यावर निवेदन मागवावे. ते सभागृहाला सांगावे. फाईलमध्ये जे आहे ते नीट मांडायला सांगा. म्हणजे ब-याचशा गोष्टींचा खुलासा होईल. त्यावेळच्या आयुक्तांनी अबोव्ह रेट आला असे सांगितले होते. ठेकेदाराला बोलवून घेतले होते. अशी ५% वाढ देता येणार नाही. काम करायचे असेलतर करा. ठेकेदाराने सांगितले, आम्ही काम करायला तयार आहोत. ही गोष्ट यात मांडली नाही. संबंधित ठेकेदाराने ३ वर्षांचा मेंटेनन्स करायचा आहे. केवळ नेमका विषय संबंधित अधिका-यांनी सांगावा. तुम्ही प्रस्ताव ठेवला, आम्ही मंजूरी दिली. स्थायी समितीतून मान्यता घेतो, तेव्हा आपल्या अधिका-यांना हे बरोबर का वाटले? आयुक्तांनी होकार का दिला? ऑडीटर यांना शंका आहे. त्यांनी थांबवायचे बरोबर नाही. ह्या ऑडीटर यांना आज असे वाटते. त्यांना सांगावेसे वाटते की, महापालिकेत गैरसमज होत आहेत. ६४ लाख वसूल करावेत असा शेरा त्यांनी दिला. त्यांनी पहिल्यांदा असे काय चुकले ते सांगावे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.आर.एस.कुमार यांनी प्रश्न विचारले आहेत. त्यांची उत्तरे दिली आहेत. काही गोष्टी यापूर्वी झालेल्या आहेत. फाईलमध्ये जे जे आहे, ते सांगावे. ज्या पद्धतीने खुलासा होईल, त्याच पद्धतीने सांगू इच्छिते, ऑडीटर यांना ऑडीट करताना काहीतरी वाटले तर यावेळी ब-याचशा गोष्टी उपस्थित होतात. आयुक्त यांनी विषय सांगितला. एका फाईलवर सरळ सांगितले होते, बील देता येणार नाही.

आजपर्यंत कोणता ठेकेदार भांडायला आला नाही. आम्ही विषय मांडला म्हणून कोणत्याही ठेकेदाराने, अधिका-याने आमच्याशी भांडू नये अशी अपेक्षा नाही. पूर्वी दादांची व्हिजिट झाली, त्यावेळी चाफेकर पूलाबद्दल विचारले होते. त्यावेळी ७० लाखांचे बील ठेकेदाराला देण्यात येणार नाही असे ऑडीटर यांनी लिहिले होते. तो मनुष्य म्हणतो, मी जगावे का मरावे मला माहित नाही. पूर्वीच्या कमिशनर यांनी फाईलवर काय काय केले? पूलाची रुंदी वाढली का? यात काही गोष्टी आहेत का? याच परिस्थितीमुळे कार्य.अभियंता म्हणतात, आम्ही काही करु शकत नाही. आम्ही बीलाला हो म्हणणार नाही. आम्ही भूमिका घेणार नाही. मी एक सर्वसामान्य मनुष्य आहे. माझे उर्वरीत आयुष्य व्यवस्थित जायचे आहे. कार्य. अभियंता घाबरतात. याचा अर्थ पूर्वीचे आयुक्त चुकीचे होते का? त्या आयुक्तांनी अशा फाईलवर या गोष्टी केल्या नसत्यातर पुढील गोष्टी अधिका-यांनी कशाला केल्या असत्या? आयुक्तांनी सही केली असेलतर खालचे अधिकारी त्याप्रमाणे काम करत असतात. आयुक्तांनी सांगितले, तुम्ही केले. आमचे अधिकारी नंदीबैल आहेत का हे कळत नाही. अशा परिस्थितीत आयुक्त साहेबांनी फाईलवर लिहिले होते, पाच टक्के अबोव्ह निविदा मंजूर आहे. मग ऑडीटर यांनी रिमार्क का दिला? इथे असे उत्तर का देण्यात आले, इथे फार अवघड परिस्थिती आहे. पूर्वीच्या आयुक्तांना तसेच त्या-त्या विषयातील ज्यांनी सह्या केल्या, त्यांना सुद्धा इथे बोलवले गेले पाहिजे. म्हणजे या आधीचे आयुक्त जे करत होते, ते सगळे चुकीचे होते का? १० वर्षांपूर्वी श्रीकर परदेशी असायला पाहिजे होते का? तसे नसेलतर तसे लिखाण झाले पाहिजे. अशा गोष्टींचा खुलासा इथे झाला पाहिजे. संबंधित फाईलच्या डिटेल्स् चा खुलासा झाला पाहिजे. कोण अधिकारी होते, कोणत्या कामाची गरज होती, काय काम केले, कशा पद्धतीने केले गेले या सगळ्या गोष्टी नमूद केल्या गेल्या पाहिजेत. मला आपल्याला विनंती करायची आहे की, सगळ्या सूचना रितसर झाल्या पाहिजेत. नाहीतर आज अधिका-यांची जी परिस्थिती झाली आहे. पेमेण्टमधून वसूली करायची. त्यामुळे कोणीच काम करायला तयार नाहीत. रिटायरमेंटला आलेले अधिकारी माझ्या प्रभागात दिले आहेत. कृपा करुन असे अधिकारी आमच्या प्रभागात टाकू नका. वडीलांसारखे सैय्यद साहेब त्यांना आम्ही काम सांगू शकत नाही आणि बोलूही शकत नाही. त्यांना खड्डे बुजवले नाही म्हटले तरीसुद्धा भिती वाटते. आम्ही काय करायचे? इतकी वर्षे ३० वर्षे सेवा केली आणि आता जाताना कुठेही रिमार्क नको आहे, असे ते म्हणतात. त्यांचा सूरच वाढला होता. त्यांच्याकडे बघायचा दृष्टीकोण बदला. मी रिटायरमेंटला आलो आहे. मला सांभाळून घ्या, इथून पुढे कधीही कोणते काम करायचे, करायचे नाही यासाठी माझ्याकडे येऊ नका. मी सांगतो मला काही सांगू नका. मला काही सांगायचे नाही. आम्हाला शब्दाने शब्द वाढवायचा नाही. आम्ही सांभाळून घेणारी मंडळी आहोत. पूर्वी सगळ्या गोष्टी झाल्या आहेत. आता करणार कोण आणि भरणार

कोण अशा पद्धतीने कुठल्याही अधिका-याला चुकीची निष्कारण शिक्षा होता कामा नये. तुम्ही शहानिशा करावी. अधिका-यांना शिक्षा व्हावी असे मला अजिबात वाटत नाही.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी २६ जून २०१३ ला जे पत्र दिले होते, त्यावरुन आयुक्त साहेबांनी † क्शन घेतली आहे का हे मला माहित नाही. पण मी रुलमधील बोलतोय. कॉंट्रॅक्टरवरचे प्रेम, अधिका-यांचे प्रेम, इथून कुठे प्रेम आलेतरी रुल बोलतोय. आयुक्तांनी या महिन्यात लिहिले आहे, फाईल नवीन आहे जुनी नाही. सभासद बोलताना कॉंट्रॅक्टरसाठी अधिकारी असे कशाला म्हणताय? तुम्हाला ४ टक्के मिळतात, लॉट वाढायला पाहिजे. पब्लिकला सांभाळू नका, कॉंट्रॅक्टर व बिल्डर यांनाच सांभाळा.

**मा.ऊल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रश्नोत्तरांसाठी एक तास पुरणार नाही. मी विनंती करतो, शहराशी संबंधित प्रश्न असताना प्रत्येकालाच बोलायची इच्छा असते. मला वाटते यांचा शब्द पाळावा. अजून ऑडीटर यांनी खुलासा करायचा आहे. काहीतरी गैरसमज होतो आहे. याठिकाणी केबलसंदर्भात मा.सिमाताईंनी प्रश्न उपस्थित केले. तुमच्या स्टॉकमधील उरलेली केबल दिली हे नॉर्मस् प्रमाणे आहे का नाही? दुसरीकडे हे रेट बरोबर आहेत का? यात फरक आहे का सेम आहेत? टेंडर अबोव्ह किंवा बिलो आल्यानंतर एखाद्या अधिका-याची हिंमत असते का परस्पर काम घ्या. त्याला प्रोसिजर आहे. फाईल ऑडीटर यांच्याकडे जाणार, आयुक्तांकडे जाणार. XYZ अधिका-याचा संबंध येत नाही. तो एकटाच निर्णय घेऊ शकतो का? तो स्वतःच निर्णय घेणार आहे का म्हणून याठिकाणी खुलासा करावा. कस्टडीतली केबल दिली. सेम रेटमध्ये आहे का, नॉर्मस् मध्ये आहे का याचा खुलासा करावा.

**मा.महापौर** – संबंधित अधिका-यांनी खुलासा करावा.

**मा.भगवान घाडगे** (मुख्यलेखापरिक्षक) – मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, टेंडर नं. १२/४-२००७-२००८ विद्युत क प्रभाग मनपा भवन रस्ता, शहर सुशोभिकरणाअंतर्गत उच्चदाब वाहिनी/केबल हलविण्याबाबत यासंबंधीची नस्ती आपल्याकडे आली होती. ६४ लाख मंजूर झाले होते. देखभाल दुरुस्तीचे कामाबाबत भाववाढ होत नाही तिथे या कामाचे पेमेण्ट भाववाढ देऊन झाले. याचे अवलोकन केले असता सदरचे काम देखभाल दुरुस्तीसहित कन्सल्टंट ठेकेदाराची विनवणी मान्य करुन भाववाढ देऊन दिले गेले. अटी शर्तीत बदल करायचे अधिकार मा.आयुक्त यांना आहेत. प्रिबीड मिटींगला मा.आयुक्त यांची मान्यता घेतली नाही. म्हणून असा अभिप्राय या फाईलवर दिलेला आहे. पहिला अभिप्राय फेब्रुवारी २०१३ ला दिला. नंतर रिसबमिशन दि.२४ जून २०१३ ला केले. याबाबत क्लिअर केलेले आहे. अजून

काम केलेले नाही. प्रिबीड मिटींग याच्या तारखा विकास अभियंता यांनी सांगितल्यातरी बरे होईल. यासंदर्भात काम मंजूर होत नाही. मा.स्थायी समिती ठ.क्र.३५८० दि.२१/११/२००७ व ठ. क्र.३६६७ दि.२२/०१/२००८ मध्ये देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी मंजूरी दिलेली नाही. यासंदर्भात मा.आयुक्त यांचा आदेश, पाणीपुरवठा क्र.१/२/३/९८, स्थापत्य शहर अभियंता क्र. १/१/७९/९९ चे अवलोकन करता, दुरुस्ती देखभालीचे कामाकरिता भाववाढ देय राहणार नाही. सदर प्रकरणी भाववाढ फरकासहित रक्कम यास आयुक्त यांची मंजूरी घेतलेली नाही. तरीसुद्धा रक्कम अदा केली आहे. म्हणून हा अभिप्राय दिलेला आहे.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आयुक्त यांनी मान्यता दिलेली नाही मग इथे बील अदा कसे काय झाले?

**मा.भगवान घाडगे** (मुख्यलेखापरिक्षक) – मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य,संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याशी चर्चा करण्यात यावी. बील आधी झालेले आहे.

**मा.सुरगुडे** (विकास अभियंता) – मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य,दि.१२/०७/२००८ रोजीच्या टेंडर नोटीसवर ५/६ कामे अंतर्भूत होती. आपल्या मान्यतेने या कामांसाठी मनपाने खरेदी केलेले साहित्य वापरायचे, हे एमएसईबीशी संबंधित काम होते. या कामासाठी टेंडर नोटीस काढली आहे. दि.१८/७/०७ रोजी प्रिबीड मिटींग झाली. ५० लाखाच्या वरच्या कामाला मंजूरी घेतली जाते. त्यावेळी ठेकेदारांनी हा मुद्दा उपस्थित केला होता की, ३ वर्षे मुदतीचे काम आहे. महापालिकेचे साहित्य वापरून फक्त मजुरीचे काम आहे. यात ठेकेदाराचे काहीही मटेरिअल नव्हते. या कामांना त्यावेळी ३ वर्षांसाठी काम करणार आहेत. तुम्हीच घेतलेले मटेरिअल घेऊन काम करा. त्यामुळे भाववाढ द्यायची ही मागणी मान्य झाली. प्रिबीड मिटींगचे मिनिटस् हा टेंडर प्रोसिजरचा एक भाग आहे. तत्कालिन विकास अभियंता कै.सिंग यांची सही आहे. ठेकेदाराने निविदा भरली त्यावेळी सुमारे ३०,३२ व ३५ टक्के अबोव्ह इतकी निविदा आल्यानंतर विभागाने टिपणी लिहिली की, दर अवास्तव जास्त वाटतात म्हणून ही निविदा रद्द करावी. पुर्ननिविदा करावी असे लिहिले. आयुक्त साहेबांनी रिमार्क दिला, ठेकेदारांना निगोसिएशनसाठी बोलवावे. त्याप्रमाणे साहेबांनी त्यांना असलेल्या मर्यादेमध्ये तुम्ही काम करायला तयार असालतर हे काम करा असे इनडायरेक्ट सांगितले. त्याप्रमाणे या मिटींगचे मिनिटस् आज उपलब्ध नाहीत, कोणी रेकॉर्ड केलेले नाही. ठरवल्याप्रमाणे पत्र दिले होते. त्या मिटींगमधील प्राप्त सूचनेच्या आधारे ठेकेदाराने निविदा दर ५ टक्के कमी करुन दिला. त्याप्रमाणे पुन्हा टेंडर प्रोसिजर एक्सपाण्ड प्रोसिजर झालेली आहे. ही २००७ सालची घटना आहे. ऑडीटर यांनी आयुक्त यांच्या निदर्शनास ही गोष्ट आणून दिलेली आहे. त्यावेळी श्री.सिंग हे विकास अभियंता होते. त्यांचे दि.१७/२/२००८ रोजी दुःखद निधन झाले.

त्यानंतर जवळजवळ सप्टेंबर २००८ पर्यंत शहर अभियंता श्री.ऊगिले साहेब हे विद्युत विभागाचे प्रमुख होते. पहिले एस्कलेशनचे बील रु.४५ लाखांचे म्हणजे मी पदग्रहण करण्याअगोदर दिले गेले आहे. त्याचे मिनिटस् झालेले आहेत. पार्ट †ण्ड पार्सल टेंडर डॉक्युमेंट होती, त्यावेळी ठरले होते, आयुक्तांची सही घेतली. महाराष्ट्र पब्लिक वर्क मॅन्युअलप्रमाणे ठेकेदारांनी केलेल्या कामाची बीले देण्याची शंभर टक्के जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची आहे. त्याप्रमाणे बील डायरेक्ट चेकसाठी जाते. काम झाले त्याबद्दल सहशहर अभियंता, विकास अभियंता यांच्या प्रोसिजरमधून, बजेट प्रोसिजरमधून त्याला पुढे ऑबजेक्शन आले नाही. महाराष्ट्र पब्लिक वर्कस् मॅन्युअलप्रमाणे कार्य.अभियंता यांची पूर्ण जबाबदारी आहे. यांच्या व्यतिरिक्त कोणी अधिकारी नाही. आयुक्त यांची जबाबदारी नाही. जे.ई. बील चेक करतात. नियमांत ठरवलेल्या प्रोसिजरप्रमाणे बील तयार करतात, पेमेण्ट देतात. महाराष्ट्र शासनात सुद्धा हिच प्रक्रिया आहे.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता विकास अभियंता श्री.सुरगुडे यांनी खुलासा केला की, आयुक्त साहेबांनी शिफारस केली होती, निविदा रद्द करा. ऑडीटर यांचे सुद्धा पत्र असते. विभागाने शिफारस केली पाहिजे होती, ती आलेली नाही. दुसरीकडे देखभाल दुरुस्तीसाठी भाववाढ देता येत नाही. आपल्याकडे हा खुलासा पाहिजे. एच.ओ.डी. म्हणून केबल तुटली, बंद झाली तर ही जबाबदारी कोणाची? ठेकेदाराला आम्हीच बोलवायचे, महापालिकेची केबल पुरवायची मग त्याचे काम काय? त्यांचे म्हणणे आहे, भाववाढ लागू होत नाही. असे असताना भाववाढ कशी काय केली याचा सुद्धा खुलासा होऊ द्या.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, प्रिबीड मिटींगचे मिनिटस् नसताना सुद्धा आयुक्त मंजूर करु शकतात. आयुक्तांचा शेरा तिथे होता. आयुक्तांनी रिमार्क दिला, केलेले नाही, तुम्हाला करायचे आहे का? आयुक्त परत लिहितात, मुद्दा क्र.२ प्रमाणे वसूली करावी. मुद्दा क्र.२ काय म्हणतो, टिपणी आहे, विकास अभियंता यांनी नमूद केल्याप्रमाणे पान क्र. ११८ वरील कारवाई झाली असेलतर फेरनिविदा केली. निविदा क्र.वि/नि/१/ब/कावि/ २५८/२००७ व निविदा क्र.वि/नि/१/कावि/२९/२००७ दि.१६/८/२००७ च्या अनुषंगाने मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.२५८० दि.२१/११/२००७,ठ.क्र.३६६७ दि.२२/१/२००८ यात भाववाढीसंदर्भात मंजूरी दिलेली नाही. एवढा संदर्भ आयुक्त यांच्या टिपणीत दिलेला आहे. मुद्दा क्र.२ मध्ये म्हणतात, आयुक्त यांच्याकडील परिपत्रक क्र. पापू/१/२/३/९८ दि.२४/४/९८ व आदेश क्र.स्था/च/१/१०७९/९९ दि.२१/११/९८ याचे अवलोकन करता दुरुस्ती व देखभाल कामासाठी भाववाढ देय नाही. तरीसुद्धा निविदापूर्व भाववाढ देय करुन आयुक्त यांची मंजूरी घेतलेली नाही. विद्युत विभागाने प्रत्यक्षात बीलात देखभाल दुरुस्तीसाठी भाववाढीची रक्कम

अदा केलेली आहे. संबंधित ठेकेदारावर भाववाढीपोटी दिलेली रक्कम वसूल करणे क्रमप्राप्त आहे. संबंधित अधिका-यावर कारवाई निश्चित होते. आयुक्तांनी काही वाच्यता केली नाही असे तुम्हाला म्हणायचे आहे. आयुक्तांनी केलेली कामे एकदम योग्य होती. त्यांना खोटे ठरवायचे काम करताय.

**मा.आर.एस.कुमार**– मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हे काम कार्य.अभियंता यांच्यापर्यंत आहे असे सांगून सगळे खालच्या अधिका-यावर ढकलतात. तुम्हाला समजत नसेल, तुमची काही क्युम्युलेटीव्ह रिस्पाँसिबिलिटी आहे का नाही? चांगले काम केलेतर शाबासकी मिळते. आणि चूक झालीतर तुम्ही जबाबदार आहात असे म्हणू नका. टक्केवारीमध्ये म्हणतो. तेव्हा खालच्या कामाला टक्केवारी घेतो का नाही? बीलावर सही करताना टक्केवारी घेता मग बाकी कामासाठी कार्य.अभियंता जबाबदार कसे म्हणता? ऑडीटर यांना सरकारने डेप्युटेशनवर पाठवले आहे. त्यांचा फार मोठा अनुभव आहे. त्यांनी इथे रिपोर्ट दिलेला आहे. त्यांना इथे सभागृहात चॅलेंज करण्यासारखे नाही. तिस-या पार्टीने म्हटले आहे, असे असताना विभागाच्या प्रत्येक बिलात, देखभाल दुरुस्ती कामात भाववाढ रक्कम अदा केलेली आहे. संबंधित ठेकेदाराकडून भाववाढ रक्कम वसूल करणे क्रमप्राप्त आहे. संबंधित अधिका-यावर जबाबदारी निश्चित करणे योग्य होईल. यावर आयुक्त यांनी आक्षेप घेतला. ऑडीटर व कमिशनर यांच्या पॉवर्सला चॅलेंज करणार का. सभागृहाने हे पहिले समजून घेतले पाहिजे. दिशाभूल करायची आहे का? मॅटर तसाच ठेवायचा. ऑडीटर यांनी सांगितले, चुकीचे घडले आहे, ते बरोबर आहे. त्यांना चॅलेंज करायचा अधिकार कोणाला नाही. परत परत चर्चा करायची. त्यांच्यावर कोणतीही कारवाई करायची नाही. तुम्हाला तुमची जबाबदारी समजते का? मी अभ्यास करुन आले आहे. करप्टेड अधिका-याला सिक्युअर करताय.

**मा.सुरगुडे** (विकास अभियंता) – मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, मा.योगेश बहल यांनी विचारणा केली की, महापालिकेच्या विद्युत विभागाने खरेदी केलेले केबल साहित्य साईटवर वापरुन ठेकेदाराने फक्त मजूरीचे काम करायचे आहे. ते करुन एमएसईबी यांना हँड ओव्हर करतो. त्यावेळी सामायिक जबाबदारी आपली असते. हि जबाबदारी ठेकेदारावर टाकली आहे. केबलचे नुकसान झालेतरी त्याची प्रॉपर दुरुस्ती, निगराणी, पूर्ण रोखायची जबाबदारी ठेकेदार याची आहे. तशी कामे झालेली आहेत. दुसरी गोष्ट मा.सिमा सावळे यांनी सांगितल्याप्रमाणे चीफ ऑडीटर यांच्याकडे नस्ती गेलीतर त्यांनी आक्षेपित केलेले आहे. त्यांच्या म्हणण्याशी मी निश्चित सहमत आहे. उत्तरात दिले आहे. विधिवत रक्कम वसूल करणार आहोत. काम फायनल का झाले नाही. एमएसईबीशी संबंधित कामाचे कोऑर्डीनेशन ठेवावे लागते.

**मा.सिमा सावळे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, म्हणजे तुम्ही चुकत नाही. आयुक्त यांची रिकव्हरी करावी असे म्हणताय का? प्रिबीड मिटींगचे मिनिटस् द्या.

**मा.सुरगुडे** (विकास अभियंता)– मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, एस्कलेशनसंदर्भात आक्षेप निघालेला आहे.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ऑडीटर यांचे म्हणणे आहे, देता येत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे, केबल ज्याने आणायची, खर्च त्यानेच करायचा. ३ वर्षांत केबलचे भाव वाढलेतर कोण देणार? तुम्ही डिपार्टमेंट हेड म्हणून म्हटले पाहिजे. भाववाढ द्यायची का नाही. ठेकेदाराला वाचवायला, अधिका-याला वाचवायला आम्ही इथे उभे राहिलेलो नाहीत. जबाबदारीने बोलतोय. ऑडीटर यांनी जसे सांगितले, विभागप्रमुखांनी खुलासा करावा. त्यांनी आधी विचारणा केली असेलच. सगळ्या गोष्टी अंतर्भूत व्हायला पाहिजे होत्या. सिंग साहेब स्वर्गवासी झाले. ऊगीले साहेब इथून गेले. दोघांपैकी एका मनुष्यावर जबाबदारी येणार. विभाग प्रमुखांना सांगतो, कार्यकारी अभियंता यांची जबाबदारी असतेच. पण विभागप्रमुख म्हणून तुम्ही सुद्धा ठामपणे सांगितले पाहिजे, असे असे काम होते. भाववाढ द्यायचे मंजूर केले होते. मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले, ऑडीटर यांना चॅलेंज करु नका. मागील ऑडीटर सुद्धा राज्य सरकारचे होते. ते आपले अधिकारी नव्हते. आत्ताचे आयुक्त साहेब, गव्हर्नमेंटचे लोक चोर भरले आहेत का?

**मा.आर.एस.कुमार**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृहाला चुकीची उत्तरे दिल्याबद्दल कमिशनर तुम्ही काय कारवाई करणार आहात. मी पुरावे सुद्धा दिले होते. याचे उत्तर मला मिळालेले नाही.

**मा.श्रीकर परदेशी** (महापालिका आयुक्त) - मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, मा.आर.एस. कुमार यांनी जे प्रश्न विचारले होते, त्यावरील चर्चेच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, साधारणतः ६ वर्षांपूर्वीचा मॅटर आहे. यात गंभीर स्वरुपाचे अपहार दिसून आला आहे. ही वस्तुस्थिती आहे. या प्रकरणाची चौकशी चालू आहे. वसूलीची कारवाई पूर्ण झालेली नाही. मुद्दा क्र. ३ विचारात घेता भाववाढीस मंजूरी दिल्याबद्दल कारवाई करण्यात येईल. मुद्दा क्र.५ मध्ये विचारल्यानुसार संबंधित ठेकेदाराकडून वसुली करणेबाबत कार्यवाही करणेत येईल. मुद्दा क्र.६मध्ये विचारले आहे, त्यांच्यावर आजपर्यंत काय कारवाई केली, हे विचारल्याप्रमाणे अद्याप कारवाई केलेले नाही. १ब मध्ये दिल्याप्रमाणे तपासणी करण्यात येईल. २ अ मध्ये विचारल्यानुसार, नियमानुसार अनुज्ञेय नसलेल्या बाबींची वसूली करण्यात येईल. २क मध्ये दिल्याप्रमाणे अंतिम चौकशी अहवालानंतर कारवाई करण्यात येईल. प्रश्न क्र.४, ४ अ मध्ये

प्रश्न विचारलेल्या प्रकरणात कामाचा अंतिम चौकशी अहवाल अप्राप्त असल्यामुळे कारवाई झाली नाही. या प्रकरणी जो जबाबदार असेल तो ठेकेदार/अधिकारी यांच्यावर कारवाई होणार आहे. बाब क्र.३१ आत्ता दाखवली, याची पुर्नतपासणी करुन चौकशी अहवाल दिला असेलतर संबंधित अधिका-यावर कारवाई निश्चित करण्यात येईल.

---------

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी प्रशासनाच्या वतीने आयुक्तांनी उत्तरे दिलेली आहेत. त्यात अनेक प्रश्न आहेत, त्यांची उत्तरे कळालेली नाहीत. कर्तव्यात कसूर, गैरव्यवहार अशी कारणे दिलेली आहेत. त्यात पहिला प्रश्न आहे की, ११ अधिकारी आहेत, त्यांच्यावर कारवाई झालेली आहे का?

(सभागृहात गोंधळ)

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी ११ अधिका-यांची नावे दिलेली नाहीत. यांची नावे आम्हाला पाहिजेत. यात ३ कारणांपैकी ११ अधिका-यांवर कारवाई निष्पन्न झालेली आहे. कर्तव्यात कसूर असलेल्या किती अधिका-यांवर फौजदारी दाखल आहे, त्यांची नावे दिलेली नाहीत. खाली फक्त फौजदारी दाखल झालेली २च नावे दिलेली होती. श्री.व्ही.टी. भोसले व किरण गायकवाड,जनसंपर्क अधिकारी. माझ्या माहितीप्रमाणे डॉ.रॉय यांच्यावर सुद्धा फौजदारी दाखल झालेली आहे. त्यांचे नाव यात दिसत नाही. कलम ५६ प्रमाणे यात कारवाई होत असेलतर, गैर फौजदारीची ३ कारणे आहेत. फौजदारी गुन्हा दाखल असलेली दोनच नावे दिलेली आहेत. डॉ.रॉय यांचे नाव का घेतले नाही? ११ अधिका-यांना काय-काय म्हणून निलंबीत केले आहे याची माहिती पाहिजे होती. श्री.व्हि.टी. भोसले यांच्यावर फौजदारी दाखल झाल्यानंतर त्यांना निलंबीत केले होते का कोर्टाने शिक्षा दिल्यानंतर निलंबीत केले होते. कर्मचारी/अधिका-यांना पोलिस स्टेशनमध्ये फौजदारी दाखल झाल्यानंतर निलंबीत करतो का कोर्टाने शिक्षा दिल्यानंतर निलंबीत करतो याचे उत्तर कृपया मिळावे.

**मा.टेकाळे** (सहा.आयुक्त,प्रशासन) – मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, जे ११ अधिकारी आहेत त्यांचे सेवानिलंबन कार्यालयीन कामाशी, बाबींशी संबंधित आहे. हि नावे आवश्यक असतील तर माझ्याकडे यादी आहे. प्रत्येकाचे डिटेल्स् माझ्याकडे नाहीत. १) थोरात कैलास गेणू-कार्य.अभियंता, २) कांदळकर टी.व्ही. - उपजकात अधिक्षक, ३) भोसले विलास तुकाराम – लेखाधिकारी, ४) दांगट जी.एम. – प्र.उपशहर अभियंता, ५) इंगळे एस.एम. – उपअभियंता (स्था), ६) डॉ.बच्छाव बी.के. – ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, ७) डॉ.इनामदार विकास मुक्तेश्वर – ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, ८) गौड सजितसिंग हिरासिंग - मुख्याध्यापक, ९) डॉ.महादार

अभिजित अशोकराव – वैद्यकीय अधिकारी, १०) काकडे सुहास एकनाथ – व्यवस्थापक, मध्य.औ.भांडार ११) गायकवाड किरण देवेंद्र – जनता संपर्क अधिकारी यांच्यावर विभागीय कारणासाठी निलंबन करण्यात आले आहे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ११ पैकी फौजदारी दाखल झालेले किती अधिकारी आहेत. श्री.व्ही.टी. भोसले, श्री.किरण गायकवाड यांची फौजदारी कशाशी संबंधित आहे. अशाप्रकारे अनधिकृत बांधकाम व इतर कारणासाठी निलंबन हे वेगळे आहे. डॉ.रॉय यांच्यावर अनधिकृत बांधकामासंदर्भात फौजदारी दाखल झाली आहे.

**मा.टेकाळे** (सहा.आयुक्त,प्रशासन) – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, कामाशी संबंधित त्याव्यतिरिक्त निलंबनामध्ये श्री.किरण गायकवाड यांच्यावर गुन्हेगारी संदर्भात गुन्हा दाखल झाला आहे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तुमच्याकडे पूर्ण उत्तर असेल तर सांगा. माहित नसेलतर आयुक्तांना सांगू देत.

**मा.श्रीकर परदेशी** (महापालिका आयुक्त)- मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, सहा.आयुक्त श्री.टेकाळे यांनी उत्तर दिले आहे. आत्तापर्यंत ज्यांना आयुक्तांनी निलंबित केले, त्यांची यादी वाचून दाखवली आहे. आपल्याला पाहिजे असेल तर अर्ध्या तासात प्रत्येकाचे डिटेल्सची माहिती उपलब्ध करु शकतो.

**मा.दत्ता साने -** मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, विषय गंभीर आहे विनंती करतो की, लिगल डिपार्टमेंटचे अधिकारी यांना सभागृहात बोलवा. त्यांना काही प्रश्न विचारायचे आहेत. प्रश्न क्र.१ चे उत्तर अतिशय सविस्तर व सुंदर दिलेले आहे. तेवढेच एक उत्तर समाधानकारक वाटते. बाकी उत्तरे चुकीची आहेत असे सांगू इच्छितो. प्रश्न १ब विचारला होता, त्याचे उत्तर तुम्ही दिले आहे की, कोणताही अधिकारी/कर्मचारी याने अनधिकृत बांधकाम केल्यास त्याचेवर कायदेशीर कारवाई करायची तरतूद आहे. नगरसेवकांच्या अनधिकृत बांधकामासंदर्भात एवढा मोठा लांबलचक कायदा असेल आणि तुमच्यासाठी फक्त २ ओळींचा कायदा असेलतर ही खेदजनक बाब आहे. ज्यावेळी एखादा अधिकारी अनधिकृत बांधकाम करत असेल, एखादा सर्वसामान्य नागरीक अनधिकृत बांधकाम करत असेल तर दोघांसाठी समान न्याय असावा. २ ओळींच्या उत्तराने माझे समाधान झालेले नाही. तुम्ही सभागृहात हे सांगावे की, कलम २६०, ४७८ व ३९७ (क) या कलमात काय तरतूदी आहेत? या माध्यमातून कोणते कलम वापरु शकतो, काय कारवाई करु शकतो, कोणत्या माध्यमातून

अधिका-यावर कारवाई करु शकतो? प्रश्न १ क मध्ये आयुक्तांनी चुकीची उत्तरे दिलेली आहेत. टेन्टेटीव्हली पाहिलेतर दि.३०/८/२०१२ रोजी डॉ.अनिल रॉय यांचे अनधिकृत बांधकाम निदर्शनास आले होते. याप्रकरणी सांगावेसे वाटते की, एवढा मोठा कार्यकाल गेला असता या कार्यकालामध्ये त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला नाही. त्यांना निलंबित करु शकतो याचे उदाहरण देऊ इच्छितो. जनसंपर्क अधिकारी श्री.किरण गायकवाड यांच्या निलंबनाच्या आदेशाचे मा.आयुक्त यांचे पत्र माझ्याकडे आहे. दि.२७/७/२०१३ रोजीचे पत्रात पत्नीच्या विवाहबाह्य संबंधांना कंटाळून त्या गृहस्थाने आत्महत्या केली. ही बातमी वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झाली होती. गेल्या मिटींगमध्ये मा.सुलभा ऊबाळे ताईंनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर आम्हाला याविषयी माहिती झाले. मला श्री.किरण गायकवाड यांनी केलेल्या कृत्याला पाठिशी घालायचे नाही. परंतू एकावर घाव घालता व एकाला लीड करता अशी दुटप्पी भूमिका आपण घेत असालतर ही गोष्ट निंदनीय आहे. ज्यांनी गुन्हा केला त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होतो. श्री.व्ही.टी.भोसले, श्री.कैलास थोरात यांच्यावर सुद्धा फौजदारी गुन्हा दाखल होता. यांना निलंबीत केले होते. डॉ.अनिल रॉय यांच्यावर कारवाई का करत नाही? हे कायद्यात बसत नाही का? या अधिका-याचा व आपला काही हितसंबंध असावा असे वाटायला लागले आहे. हा मनुष्य त्या पदाचे वेटींग दीड दोन महिने ठेवू शकतो. नंतर त्या पदावर पदोन्नती घेऊ शकतो. म्हणजे तुम्ही या विषयाला पाठीशी घालताय. कायदा सगळ्यांसाठी सारखा आहे. यात बदल का करताय? आपण कायदेपंडित असताना असे का करताय असा सरळसरळ प्रश्न आहे. डॉ. रॉय यांनी अनधिकृत बांधकाम कधी केले, त्याचा पंचनामा कधी केला, फौजदारी कधी दाखल केली, बांधकाम कधी काढले आहे, याची सविस्तर माहिती द्यावी. प्रश्न २ ब – नगरसेवक हे या सभागृहाचे प्रतिनिधी, पदसिद्ध अधिकारी आहेत. आम्ही अधिका-यांच्या पाठीमागे गंभीरपणे उभे राहतो. पण आपला एखादा अधिकारी गलिच्छ भाषेत बोलत असेल तर त्या गोष्टीची मी पहिल्यांदा निंदा करतो. दि.२९ जुलै २०१३ रोजी नगरसेविकेचे पती यांच्याबद्दल अतिशय अपशब्द वापरले आहेत. डॉ.अनिल रॉय यांनी अश्लिल भाषेत आपल्या भगिनींना, नगरसेविकांना काय बोलले आहेत ते वाचून दाखवतो – नगरसेविकेचे पती यांच्यावर तोंडसुख घेतले आहे. त्यांनी त्याच नशेत म्हटले आहे, राजकारण्यांना मदत करायला, बोलायला सारखे जाऊ नका. राजकीय लोक सडलेल्या मेंदूचे असतात. तुम्हाला नष्ट करतात. लाज वाटेल असे वागतात. पैसे दिले नाहीतर तुमची पदोन्नती थांबवतात, तुमचे करिअर बरबाद करतील. त्यांचा अधिकार आहे. राजकारण्यांची जात हलकट असते. नगरसेविकेचे पती नरकात जाऊ देत. त्यांच्या पुढील पिढ्या नरकात जातील. असे फेसबुकवर निवेदन केलेले आहे. सभागृहाने नगरसेवक, नगरसेविकांचा सन्मान करावा. दारूच्या नशेत येऊन एखादा नालायक अधिकारी गलिच्छ भाषेत फेसबुकवर भाषण टाकत असेल तर त्यांच्यासाठी काय कायदा आहे. सभागृहातील उपस्थित भगिनींना विनंती

करतो, मी उमाप, ओहोळ साहेबांना याबाबत पत्र दिले आहे. या अधिका-यावर फौजदारी गुन्हा दाखल करा, याच्यावर कडक कारवाई करा. उद्या रक्षाबंधन आहे. अशा नीच, नालायक अधिका-याला खरेतर बांगड्यांचा आहेर करावा. अशा लोकांना पाठिशी घालणे चुकीचे आहे. चुकीच्या माध्यमातून बोलणा-यांना आयुक्त साहेबांनी पाठीशी घातले आहे. अनधिकृत बांधकामांबाबत जे-जे प्रश्न विचारले आहेत, याचे उत्तर मला हवे आहे. आदरणीय बाळासाहेब ठाकरे ज्यावेळी मयत झाले होते, त्यावेळी डोंबीवली हद्दीतील दोन मुलींनी त्यांच्याविषयी फेसबुक अकाऊंटवर चुकीच्या पद्धतीने भावना व्यक्त केल्या होत्या. त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होऊन त्यांना जेलची सजा सुद्धा झाली आहे. असे आपण का करु शकत नाही, हे आपल्याला करावे लागेल. अन्यथा जोपर्यंत त्यांच्यावर कारवाई होत नाही, त्यांच्यावर निलंबनाची कारवाई जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत सभागृह चालू देणार नाही. चुकीचे शब्द वापरतात, एखाद्या नगरसेविकेची, त्यांच्या पतीचे, त्यांच्या खानदानाची इज्जत काढत असालतर त्यांना निलंबित केल्याशिवाय राहणार नाही. सभागृहात, पिंपरी चिंचवड महापालिकेत जर अधिकारी चुकत असेलतर तो माणूस आहे तो चुकणारच. त्याशिवाय तो सुधारत नाही. अधिका-याचे अनधिकृत बांधकाम असेल तर तो करु शकतो. कोणत्या नागरिकाने केलेल्या बांधकामावर नांगर फिरवत असालतर तुम्ही अधिका-यांना देखील शिक्षा करावी. आपल्या कर्मचारी/अधिका-यांपैकी तो इथे रहात असो, पुण्यात रहात असो, ८० टक्के जणांची बांधकामे अनधिकृत आहेत. मी नावासहित यादी देऊ इच्छितो. ज्या-ज्या ठिकाणी अधिकारी/कर्मचा-याचे घर असेल, त्याचे वास्तव्य असेल, त्याठिकाणी कमीत कमी त्याचे १०० ते १५० फूट बांधकाम वाढलेले असेल. डॉ.रॉय यांनी जे कृत्य केले, त्याचा जाहिर निषेध करतो. जोपर्यंत त्यांना निलंबित करत नाहीत, तोपर्यंत सभा चालू देऊ नका.

**मा.गोरक्ष लोखंडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, एका महापालिकेच्या अधिका-याने काल रात्री एक गंभीर गुन्हा केला आहे. भारतीय संविधानाची पाचवी ओळ वाचा. भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीयाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. परंतू उत्तरे देताना डिप्लोमॅटिक उत्तरे देऊन स्वतःची, जगाची, सभागृहाची दिशाभूल करणारी उत्तरे दिली आहेत. मा.चंद्रकांता सोनकांबळे, मा.दत्ता साने यांनी जे प्रश्न विचारले आहेत. त्यावेळी लिगल डिपार्टमेंटला बोलवा म्हणून सांगतो. आपण ब्रिलियंट, एक्स्ट्रा ऑर्डिनरी पर्सन आहात. आम्हाला लॉ पास करताना २९ विषय पास करावे लागतात. त्यातून न्यायालयीन प्रक्रियेत सहभागी व्हावे लागते. म्हणून ही लिगल डिपार्टमेंटचे ओपिनियनशी निगडीत बाब आहे. ज्यावेळी बाळासाहेबांविषयी वेगळे लिहिले जाते, त्यावेळी आर्टिकल १४ मधील ईक्वॅलिटी कायद्यापुढे सगळे समान आहेत. घटनेचे १४ वे कलम सांगते, ईक्वॅलिटी बिफोर लॉ, सर्वांना एकच न्याय. श्री.किरण गायकवाड यांना एक न्याय व डॉ.रॉय यांना दुसरा न्याय देतो.

आर्टिकल १९ अभिव्यक्ति स्वातंत्र्याविषयी आहे. डॉ.रॉय यांनी फेसबुकवर जे सांगितले आहे, तुम्ही त्यांना क्लिनचीट देताय. तुमच्या सेवाशर्ती, अटीनियम बाजूला ठेवून कायदेशीर कारवाई करता येते. आय.टी. †क्ट कलम ६६ ए प्रमाणे डॉ.रॉय यांच्यावर गुन्हा दाखल करता येतो. त्याचबरोबर सायबर कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करता येतो. आय.पी.सी. †क्ट कलम ५०० नुसार अब्रु नुकसानीचा गुन्हा दाखल करता येतो. आपण का दाखल करत नाही. याबद्दल सभागृहात बोललो आहोत. कन्स्टिट्युशनमध्ये कॉक्सेस म्हणतात, रस्त्यावर कोणीही मनुष्य राजकीय मनुष्याबद्दल बोलला तर ते समजू शकतो. परंतू हे महापालिकेचे नोकर आहेत, पब्लिक सर्वंट आहेत. आम्ही महापालिकेचे विश्वस्त आहोत. आमच्यासारखे असतात म्हणून तुमची प्रमोशन झाली आहेत. म्हणून त्यांच्यावर कारवाई झाली आहे. कायद्याप्रमाणे झाले पाहिजे. जेव्हा आपण अभिव्यक्ती स्वातंत्र्याबद्दल बोलतो, लोकांना सुद्धा असे मत देण्याचा अधिकार नाही. आपल्याला भारतीय राज्यघटनेने ७ प्रकारची स्वातंत्र्ये देऊ केली आहेत. त्यांचे उपविधी आहेत. डॉ.रॉय यांच्यावर कारवाई केलीच पाहिजे. श्री.किरण गायकवाड यांचे निलंबन तुम्ही कायद्याच्या अधिन राहून केले आहे. पेपरमध्ये एक बातमी आली, संगमनेर इथे त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. सेक्शन ८२ खाली न्यायालयाने अधिका-यांना अधिकार दिला आहे. ज्यावेळी एखादा मनुष्य सस्पेण्ड असतो, त्यावेळी सेक्शन ८२ खाली पोलिसांचा अधिकार रहात नाही. केस सेशन कोर्टासमोर जाते. त्या कोर्टासमोर तो हजर असतो. कोर्टाने त्यांना पोलिसी कोठडीतून रिलिफ दिलेला आहे. लिगल डिपार्टमेंट यांनी याचा विचार केला पाहिजे. ऑनरेबल कोर्टाची ऑर्डर माझ्याकडे आहे. कोर्टाने राईटिंग करुन ताशेरे मारले आहेत, सदरचे कारण आत्महत्या असू शकत नाही असे म्हटले आहे. पाच दिवसानंतर एफआयआर दाखल झालेला आहे. एखाद्या माणसाचे भविष्य व आयुष्य उद्धवस्त करायचा अधिकार कोणाला दिला आहे? ४५० कामगारांवर गुन्हे दाखल आहेत. मग नवा डिसिप्लिन करुन त्यांचे भविष्य अंधारात टाकायचे का? कलम ४९५ खाली अनधिकृत बांधकाम असेल तर, रस्त्यावर चालताना एखाद्याचा अपघात झालातर फौजदारी गुन्हा दाखल होतो. कोणाला बदनाम करण्यासाठी बातमी दिली म्हणून तुम्ही त्याला निलंबीत करु शकत नाही. एकाला एक न्याय, दुस-याला दुसरा. श्री. किरण गायकवाड दोषी असतील तर डॉ.रॉय यांच्यावर निलंबनाची कारवाई का नाही? ज्यावेळी श्री.किरण गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल होतो, त्यावेळी डॉ.रॉय यांचे समर्थन करताय. एखाद्या अधिका-याने पब्लिकला सांगावे, मान्यवरांच्या विरोधात, महिलांबद्दल बोलले आहेत. मा.महापौर साहेब, तुम्ही आज ज्या अतिशय समर्थपणाने काम करताय, तुम्ही शहराच्या महापौर आहात. महापौर पदी बसला आहात. मान्यवरांना त्रास देण्यासाठी असे अश्लाघ्य वर्तन करण्यासाठी जोपर्यंत डॉ.रॉय यांना निलंबीत करीत नाहीत, तोपर्यंत हे सभागृह चालू देणार नाही. लिगल डिपार्टमेंट यांना इथे बोलवावे. त्यांना प्रश्न विचारायचे आहेत.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर आयुक्तांनी जी निवड केली आहे, वैद्यकीय अधिकारी म्हणून हे चुकीचे नसावे. त्यांचे गुण त्यांनी पाहिले असतील. नंतर गुण उधळले गेले असतील. पण गुण पाहून अधिकार दिले आहेत. २४ तासांआधी डिपीएच पदवी घेतल्यानंतर लगेच पदोन्नती दिली गेली. सिनिऍरिटी सुद्धा असेल. चांगले असताना, कोणतेही टेंशन नसताना आणि विशेष म्हणजे शुद्धीत असताना डॉक्टर असलेले रॉय असे लिहिणार नाहीत हे आयुक्त यांनी मान्य करायला हवे. यापूर्वी या पदावर असलेले डॉ.जगदाळे यांनी तालेरा हॉस्पीटल संदर्भात काम केले आहे. नंतर वायसीएम हॉस्पीटल सुद्धा सांभाळत होते. रात्री १०.०० वाजलेतरी फोन केल्यावर ते हजर असायचे. पोस्टमार्टेमचा काही प्रॉब्लेम असेलतर, एखाद्या नगरसेवकाच्या घरी काही प्रॉब्लेम वैद्यकीय प्रॉब्लेम झाला असला तरी ते त्यांचे काम कसे करायचे, हा त्यांचा अनुभव सांगतो. इथे नगरसेविका छाया फंड यांचे मिस्टर गेले होते, त्यावेळी डॉ.नागकुमार पूर्ण रात्र हॉलमध्ये हजर होते. हे सुद्धा सातत्याने पाहिले पाहिजे. फक्त कामच करत नव्हते तर मदतीला सुद्धा धावायचे. वॉर्डातील नागरीक असेल, आमच्याशी संबंधित व्यक्ती असेलतरी त्यांच्याबाबतीत सुद्धा तशीच भावना ठेवून येत होते. आयुक्त साहेबांना विनंती करते की, तुम्ही डॉ.रॉय यांना रात्री १०.०० वा. फोन करा. डॉ.रॉय यांच्याकडून तुम्हाला फोनवरुन उत्तर मिळालेतरी तुम्ही जिंकलात. यामागचे सांगायचे कारण हेच की, त्यांनी जे फेसबुकवर लिहिले ते स्पष्ट असायला नको का? कशासाठी राग आला हे त्यांनी विचारायला पाहिजे होते. गोष्ट म्हणून त्यांनी अशाप्रकारे फेसबुकवर लिहावे. उद्या तुम्ही म्हणावे, आम्हाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. आम्हाला कोणाच्या स्वातंत्र्यावर गदा आणायची नाही. कोणाशी वाद घालायचा नाही. शांततेचा भंग करायचा नाही. काय चुकले ते आपणच सांगताय, आम्ही सांगतो. मा.महापौरांचे काम चांगले आहे. आम्हाला सगळ्यांना बरोबर घेऊन त्या काम करत आहेत. तुमची एवढी ओळख नाही का? राजकारण्यांबद्दल ते इतके भयानक बोलले. तुमचे तर पूर्ण खानदानच राजकारणी आहे. इथल्या निम्म्यापेक्षा अधिक महिला नगरसेविका राजकीय कुटूंबांच्या पार्श्वभूमीतील आहेत. एकटाच कोणी निवडून येत नाही. घरातील महिलांना निवडून आणायचे यांचे मोठे काम आहे. आमच्यासारख्या स्वयंभू खूप कमी असल्यातरी नव-यांना निवडणूकीला उभे करा किंवा बायकांना उभे करा घरातूनच काम होते. म्हणून लोक निवडून देतात. मी तर ऐकले होते डॉ. रॉय निवडणूकीला उभे राहणार होते. त्यांना पदोन्नत करताना दबाव आला असेल म्हणून २/४ दिवस थांबून आयुक्त साहेबांनी त्यांची नियुक्ती केली असेल. काही महाभाग सक्रिय आहेत. आपली पोळी भाजून घेतात. त्यांनी नगरसेविकेच्या नव-याबद्दल जे बोलले, त्यांना लाज असेल तर त्यांनी सभागृहात थांबू नये. नगरसेविकांच्या समोर थांबायला, बसायला त्यांना लाज वाटली पाहिजे. अधिकारी निगरगट्टपणे येतात. कोणाबद्दल काय बोलावे. एवढे

सुद्धा स्त्री दाक्षिण्य दाखवू नये का? त्यांना इथे बसायचा अधिकार नाही. महापौर साहेब तुम्हाला कळाले होते तर  पदाधिका-यांना कळाले होते तर ताबडतोब आयुक्त साहेबांच्या कानावर घालायला पाहिजे होते. कोणीही उठावे व महिलांबद्दल बोलावे. शहराच्या महापौर एक महिला आहेत. प्रथम नागरिक आहेत. सर्वांत आधी त्या महिला आहेत म्हणून महापौर आहेत. महिलांचे आरक्षण आहे म्हणून सर्वात आधी महिलांची बाजू घ्यायला पाहिजे होती. एका महिलेबद्दल नाहीतर ते सर्व राजकारण्यांबद्दल, राजकारणी महिलांबद्दल बोलले आहेत. हे चुकीचे आहे. चुकीचे आहे असे वाटत असेलतर तुम्ही सुद्धा यावर †क्शन घ्यायला पाहिजे होती. तुमचे पती सुद्धा राजकारणी आहेत. अश्या मुठभर महिला आहेत त्यांचे पती राजकारणी नाहीत. एखाद्याबद्दल गैरसमज झाला असेल तर, त्याच्याबद्दल राग आला असेलतर तिथेच सांगायचे होते. थोडक्यात द्यायचे होते सगळ्यांबद्दल बोलणे शोभत नाही. बोलणे सहन करणे त्यापेक्षा वाईट आहे. मी या घटनेचा निषेध करते. खरेतर महिला अंडर प्रेशरखाली काम करतात. त्यांचे तोंड दाबल्यासारखे होते, असे आमच्या महिलाच म्हणाल्या होत्या. पदाधिका-यांना समजून सांगायला पाहिजे होते. आमचा अपमान होतो. पुन्हा एकदा महिला भगिनींच्या वतीने त्यांचा निषेध करते. त्यांना आधी सभागृहाबाहेर जायला सांगायला पाहिजे होते. कशासाठी सभागृहात बसू दिले. त्यांना महिलांचे वावडे आहे का? महिलांच्या नव-याबद्दल एवढा द्वेष आहे का? एवढा राजकारणी लोकांचा द्वेष करत असाल तर आम्ही सगळे राजकारणी आहोत. त्यांना बसवत नसेल, टेंशन येत असेल तर तुम्ही तुमच्या अधिका-यांना सांभाळा. आम्ही मात्र त्यांचा निषेध करतो.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,खरेतर आयुक्त साहेबांचे गंभीर विषयाकडे लक्ष वेधू इच्छिते. आत्ताच डॉ.रॉय यांच्याबद्दल चर्चा चालली आहे. निश्चितपणे डॉ.रॉय यांनी सर्वांना एका नजरेतून पाहिल्यामुळे, शब्द हे शस्त्राप्रमाणे वापरले असते तर एवढे वादळ उठले नसते. डॉ. रॉय यांना पदोन्नती देणारे सुद्धा हेच सभागृह आहे. त्यांच्याविषयी सभागृहात अत्यंत अपमानास्पद भाषा वापरली जाते आहे. त्यांना बाहेर निघून जा म्हणणारे सुद्धा त्यावेळी याच सभागृहात होते. ज्या नगरसेविकेच्या पतीने त्यांच्याकडे पैशांची मागणी केली, त्याचे नाव डॉ.रॉय यांनी सांगावे. निश्चितपणे आमचा नवरा तिथे नसेल. तुम्ही एवढे का ऐकून घेताय? तुमच्यात हिंमत आहे. तुम्ही पुराव्यासहित सांगा. पैसे घेताना कोणी पुरावा ठेवत नाही. तुम्ही त्यांचे नाव सभागृहासमोर सांगा. तुम्ही का सांगत नाही? तुम्ही सांगितले पाहिजे. तुम्हाला इथे काम करायचे आहे. तुम्हाला सांगावे लागेल. तुम्ही इतका अपमान सहन करुन काम करु शकणार नाही. नाहीतर तुम्हाला रात्री झोप येणार नाही. तुम्ही जे बोललात, त्याची तात्काळ दिलगीरी व्यक्त करु शकता. तुम्ही माफी मागा. या विषयावर पडदा टाकायचा आहे. एकिकडे राज्याचे उपमुख्यमंत्री दुष्काळग्रस्तांबद्दल

जे बोलले होते, त्यांनी सुद्धा त्यावेळी दिलगीरी व्यक्त केली होती. महाराष्ट्राने त्यांना माफ केले. मग डॉ.रॉय यांना माफी का नाही? इथेतर तुमची सत्ता आहे. मी डॉ.रॉय यांचे समर्थन करत नाही. तुमच्या भावना जितक्या तीव्र होत्या, त्यापेक्षा जास्त तीव्र आमच्या भावना आहेत. माझ्या वॉर्डातली एक महिला नर्मदा भोसले हिने मला रात्री ११.४८ वा. कॉल केला. मी कॉल उचलला नाही. तोच कॉल तीने डॉ.रॉय यांना सुद्धा केला. १५/१६ माणसे दारू पिऊन धिंगाणा करत होते. ही महिला फार गरीब आहे. रात्रीची वेळ होती. त्या लोकांना काल पिंपरी पोलिसांनी अटक सुद्धा केली आहे. मी रात्री तिथे होते. ६ फूट उंचीचा एक मनुष्य त्याचे डोळे लालभडक होते. त्याला पाहिल्यानंतर माझ्यासारखीला सुद्धा घाम फुटत होता. कर्मचा-यांना,पोलिसांना तो ऐकत नव्हता. ६ महिन्यांपासून असाच ओरडतोय असे लोक सांगत होते. आपल्या महिला कर्मचारी ड्युटीवर होत्या. दोन दिवसांपूर्वी तिथे पोलिसांत तक्रार केली होती. हा माणूस महिलांना त्रास करतो म्हणून त्याला बाहेर काढले. त्यावेळी तो जोरजोरात सांगत होता, माझ्यासारखे तिथे कितीजण दारू पीत बसतात, पार्टी चालते. मला कोण बाहेर काढतय. हा प्रसंग मी माझ्या मोबाईलवर रेकॉर्ड करुन घेतला आहे. तुमच्याकडे त्याची सी.डी. देते. मी डॉ.रॉय यांची बाजू घेत नाही पण खरे सुद्धा बोलायला शिकले पाहिजे. ड्युटीवरील अधिका-यांना बोलवून घेतले. जोपर्यंत पोलिस येत नाहीत, तोपर्यंत मी तिथे होते. रात्रीचे ११.४५ वाजले होते. दिवसभरात डॉ.रॉय यांना फोन केलातर उचलला नाही असे होत नाही. त्यांचे अनधिकृत बांधकाम असेल, महिला नगरसेविकांबद्दल बोलले असतील तरी ते शंभर टक्के खरे आहे. मी एक महिला म्हणून डॉ.रॉय यांचा निषेध करते. त्यांनी फेसबुकवर लिहिलेले वक्तव्य अत्यंत निषेधार्ह आहे. प्रत्यक्ष उपमुख्यमंत्र्यांना महाराष्ट्राची जनता माफ करत असेलतर हे तर आपले अधिकारी आहेत. माझे चुकले असे म्हणून तुम्ही माफी मागावी. व नगरसेविकेचे नाव जाहीर करावे. कोणत्या नगरसेविकेच्या पतीने पैसे मागितले होते, त्यांचे नाव सांगावे. तुमच्यावर कारवाई होणार, हीच कारवाई या नगरसेविकेवर झाली पाहिजे. न्यायापुढे सगळे समान आहेत. डॉ.रॉय शिक्षेस पात्र असतील तर त्या नगरसेविकेचा नवरा सुद्धा शिक्षेस पात्र झाला पाहिजे. डॉ.रॉय यांना विनंती आहे, तुम्ही समोर या. तुमच्याबरोबर आम्ही आहोत. माणूस म्हणून तुमच्या पाठिशी उभे राहू. प्रशासनाला समोर आणायचे काम केले आहे. तुम्ही शब्द अत्यंत वाईट वापरले आहेत. सगळे तुम्हाला सभागृहात पोटतिडकीने बोलले. तुम्ही माफी मागितली असतीतर हे सगळे तुमच्या समर्थनात उभे राहिले असते. माझी आपल्याला विनंती आहे, वायसीएमसारख्या ठिकाणी रात्रीच्या वेळी रुग्णाच्या नातेवाईकांना पास द्या. तुम्ही तिथे सरप्राईज व्हिजिट केली पाहिजे. महिला नगरसेविका तुम्हाला रात्री फोन करते, ते इमर्जन्सी असल्याशिवाय फोन करणार नाही. तुम्ही थकले असाल, फॅमिलिबरोबर असाल पुन्हा ७.१५ वा. फोन केला होता. तुम्ही कार्यतत्पर नाहीत असे मी म्हणणार नाही. एक व्यक्ती म्हणून माणुसकीचा झरा

तुमच्यामध्ये शंभर टक्के आहे. रात्री त्या व्यक्तिचा अवतार बघितल्यावर मला भिती वाटत होती. मला घाम फुटला होता तर त्या महिलेची काय अवस्था झाली असेल? तो माणूस पाठिवर, हातावर मारा असे म्हणत होता. त्यावेळी एक गरोदर बाई तिला या माणसामुळे पुढे जाता येत नव्हते. मला धक्का मारुन बाहेर काढावे लागले होते. त्या बाईची प्रसूतीची वेळ झाली होती. १२.१२ तिथेच वाजले होते. माझी विनंती आहे, रात्रीच्या वेळी त्याठिकाणी एकापेक्षा जास्त सुरक्षारक्षक नेमावेत. पेशंटचे नातेवाईक असतील तर त्यांना बाहेर काढा. एक स्कॉड नेमावे. अनधिकृत बांधकामाबाबत जे नियम नगरसेवकांना आहेत, तेच नियम निश्चितपणे अधिका-यांना सुद्धा असले पाहिजेत. याची तुलना होऊ शकत नाही. कायदा करणे आपल्या हातात नाही. राज्य शासनाच्या हातात आहे. राज्य शासनाला तशी शिफारस करावी लागेल. मी विनंती करेल की, तशी शिफारस सभागृहाच्या वतीने शासनाकडे केली पाहिजे. डॉ.रॉय यांनी सभागृहापुढे येऊन माफी मागावी. याचा सुवर्णमध्ये माफी हाच आहे. अन्यथा आपल्याला आमच्या रोषाला सामोरे जावे लागेल. ज्या कोणाचे नाव घेणार, जो न्याय डॉ.रॉय यांना, तोच न्याय त्या नगरसेविकेला.

**मा.शारदा बाबर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ताच मा.सिमाताई म्हणाल्या, डॉ.रॉय महिलांच्या पतींविषयी जे बोलले, याच गोष्टीचे नेमके कारण काय, कोणत्या माहिलेचे पती नाहीतर सगळ्याच महिलांच्या पतींना इतक्या खालच्या लेवलला जाऊन का बोलावे? त्यांच्यावर अशी वेळ का आली असेल, या गोष्टीचे कारण शोधले पाहिजे. डॉ.रॉय यांनी महापौरांच्यासमोर येऊन दिलगिरी व्यक्त करावी. त्या गोष्टी नेमक्या कोणत्या आहेत? आमच्या पतींना यांनी का पकडावे? माझे पती व दीर दोन्हीही राजकारणात आहेत म्हणजे ते सुद्धा गुन्हेगारच झाले. आमच्या पुरुषांनी असा काय गुन्हा केला? डॉ.रॉय यांना कोणत्या नगरसेविकेच्या पतीने धमकावले, एवढे त्यांनी काय केले की, त्यांना नरकात पाठवायची वेळ यावी. या गोष्टीचे कारण समजले पाहिजे तोपर्यंत आम्ही त्यांना माफ करणार नाही. समोर येऊन दिलगिरी व्यक्त करावी. नगरसेविकेच्या पतीचे नाव जाहिर करावे एवढी विनंती आहे.

**मा.अनंत को-हाळे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, डॉ.रॉय यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल फेसबुक किंवा ट्विटरवर संपूर्ण सभागृह अपमानित झाले आहे यात शंका नाही. माफी मागणे बंधनकारक आहे. परंतू माफी मागितल्यानंतर नाव जाहिर करणे गरजेचे होत नाही. एक पदाधिकारी तसा असेल तर त्यासंदर्भात सर्वच नगरसेवकांना दोषी धरुन नगरसेवकांविषयी अतिशय चुकीचे वक्तव्य केले आहे. सिमाताईंनी ज्या पद्धतीने सांगितले की, आमची सुद्धा मागणी आहे. त्यांनी नाव जाहिर केलेच पाहिजे. तुम्ही त्यांना सांगावे. सभागृहापुढे नाव जाहिर करावे.

**मा.श्रीरंग बारणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर मा.दत्ता साने यांनी प्रश्न विचारल्यानंतर सभागृहातील सगळ्या महिला भगिनी हा प्रश्न डोक्यावर घेतात का असे सुरुवातीला वाटले होते. सभेच्या पिठासीन अधिकारी महापौर साहेब या एक महिला आहेत. सभागृह नेत्या एक महिला आहेत. आज सभागृहात ५१ टक्के महिला सदस्य आहेत. डॉ.रॉय यांनी महिलांविषयी अनुदगार काढले आहेत. या सभागृहात सांगावे लागेल, दि. १९ जुलै २०१३ रोजी फेसबुकवर डॉ.रॉय यांना त्यांची प्रतिक्रिया व्यक्त केली, त्यानंतर महापालिकेची एक सभा झाली. डॉ.रॉय जिंकले असले तरी सभागृहाला हा अधिकार आहे. आपण ठराव करुन त्यांना पदावरुन काढू शकतो. तुमची मेजॉरीटी आहे. कोण जिंकले आहे, डॉ. रॉय का ज्यांनी त्यांच्यावर आरोप केले? फेसबुकच्या माध्यमातून ते जिंकले असले तरी जर त्यांनी फेसबुकवर प्रतिक्रिया व्यक्त करत असताना संपूर्ण राजकीय व्यक्तिंविषयी प्रतिक्रिया व्यक्त करत असतील तर मी त्यांचा निषेध करतो. ख-या अर्थाने त्यांच्या पतींविषयी स्वाभिमान असेल, ख-या अर्थाने त्यांना वाटत असेल तर तुम्हाला सांगतो, सभा याच ठिकाणी तहकूब करा. यासंदर्भात जोपर्यंत प्रशासनाच्या वतीने निर्णय होणार नाही, डॉ.रॉय त्यांची भूमिका स्पष्ट करणार नाहीत. त्यांना इतके लिहावेसे का वाटले? या गोष्टीचे हास्य झाले हे देखील त्यांनी मांडावे. केवळ चर्चा करुन सभागृहाचा वेळ घालवत असाल तर ते चुकीचे आहे. केलेला आरोप एका व्यक्तीवर नसून महिला भगिंनीवर झालेला नाही तर सभागृहाच्या अस्मितेवर आरोप झालेला आहे. संपूर्ण सभागृहात आरोप झाला आहे ही गोष्ट आपण गांभिर्याने घ्यावी. गोष्ट हसण्यावारी घेऊ नये. सगळ्या महिला भगिनींना विनंती राहिल की, कोणी तर यात चुकत असेल तर त्याला पाठिशी घालायचे नाही. अधिकारी चुकत असतील तर त्यांना सुद्धा माफ करायचे नाही. तुमचे अधिकार वापरून संबंधित अधिका-यावर कारवाई करणे गरजेचे पडते. या विषयाच्या अनुषंगाने सभा तहकूब करावी असा ठराव मांडतो.

**मा.संपत पवार** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.सुलभा ऊबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी गेले बरेच दिवसांपासून वर्तमानपत्रातून फेसबुक अकाऊंटवरुन डॉ.रॉय़ यांनी जे वक्तव्य केले त्याची वाच्यता झाली. याठिकाणी याची सखोल चर्चा झालेली दिसते आहे. परंतू गेले महिनाभरात त्याची तीव्रता कुठेही दिसली नाही. आज सभागृहात प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून या विषयावर चर्चा करतोय. त्यावर डॉ. रॉय हे कशाप्रकारे बोलले, कोणत्या परिस्थितीत बोलले, का बोलले हे प्रत्येक सदस्याला माहित आहे. याच्यावर अजून चर्चा वाढवली तर झाकलेली मूठ उघडायला वेळ लागणार नाही. यात परत महिला नगरसेविकेची बदनामी होणार आहे. राजकारणात आम्ही सुद्धा एक महिला आहोत. आम्ही राजकारणात आहोत, हे सभागृहाने ओळखले पाहिजे. मग

दोषींकडे बोट वळवले जाते. याठिकाणी आम्ही अशाप्रकारे वळवायचे तिथे वळू असे तुम्हाला वाटते का? आमच्या पतींबद्दल किती जणांना सहानुभूती आहे. किती जण काय-काय बोलतात. जेव्हा स्थायी समितीमध्ये नगरसेवकेचा पती येऊन बसत होता तेव्हा आमच्या काही बांधवांना अडचण झाली. नगरसेविकेचा पती येऊन बोलायचा. कुठेतरी चांगल्या मनाने जे बोलत आहेत त्यांनी घाबरायचे कारण नाही. हिंदू धर्मात विवाहप्रसंगी पतीबरोबर सात पाऊले चालावे लागते. म्हणजे जिथे पती तिथे पत्नी ही जाणारच. पत्नीला पतीला पुढे घ्यावे लागते हे नव्याने सांगायची गरज नाही. याठिकाणी डॉ.रॉय यांच्या बोलण्याचा आपल्याकडून विपर्यास होतो आहे. निश्चितपणे डॉ.रॉय चांगले बोलले किंवा त्यांनी फार मोठी मर्दूमकी दाखवली असे मी म्हणणार नाही. त्यांनी याठिकाणी इथे समोर उभे राहून जाहिर माफी मागितली पाहिजे. महिला नगरसेविका म्हणून आम्हाला कमी समजायचे कारण नाही. महिला नगरसेविका काय काय करु शकते हे सगळ्यांना माहिती आहे. ज्यावेळी महिला हा शब्द येतो, त्यावेळी माया, ममता हा शब्द लागू होतो. हा तुमचा व लिगल डिपार्टमेंटचा प्रश्न आहे. कोणतीही मागणी करताना आम्ही म्हटले की यांना फाशी द्या तर तुम्ही देणार आहात का? डॉ.रॉय बोलले हे नक्कीच निषेधार्ह आहे. त्यांच्या कुटूंबाला मी सुद्धा लहानपणापासून ओळखते. ते मराठी नाहीत, त्यांना मराठीची तेवढी उमग नाही. ते बोलले असतील. हे निश्चित स्वागतार्ह नाही. परंतू त्यांनी माफी मागितली होती. त्यानुसार सिमाताईंनी त्यांना सांगितले होते, तुम्हाला सुद्धा माफी मिळेल. तुम्ही सभागृहात रडताय. इथे येऊन जाहिर माफी मागा. कोण कोणाला काय बोलले, कोणत्या नगरसेविकेचे पती याचा परत उल्लेख होणार नाही. आमच्याच हातून आमचे नाव घालवायचे हे होणार नाही. जो काही कोणी बोलला, त्याच्याशी वाद घालून तुम्ही चूक केली. त्याची माफी मागितली पाहिजे. त्यानंतर हे सभागृह चालेल अशी विनंती करते.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर मा.दत्ता साने सभागृहात हा प्रश्न विचारणार या गोष्टीची मुळात सभागृहाला व पत्रकारांना सगळ्यांना कल्पना आहे. डॉ. रॉय यांना जे काही प्रमोशन दिले गेले ते आरोग्य वैद्यकीय अधिकारी म्हणून प्रमोशन दिले. त्यानंतर ख-या अर्थाने वादाला सुरुवात झाली. नगरसेविकेची यात कोणतीही भूमिका नाही. डॉ.रॉय व डॉ.साळवे हे पदासाठी इच्छुक असले तरी दोघांची पदे सारखीच आहेत. याठिकाणी नागरिकांची कामे झाली पाहिजेत, अशी भूमिका घेऊन इथे येत असतो. प्रशासनाकडून प्रमोशन देताना किंवा चुकीच्या पद्धतीने म्हणा प्रमोशन देताना जे काही घडले, त्या वादातून सगळ्या गोष्टी पुढे येत आहेत. त्याची पेपरबाजी होते आहे. वैयक्तिक पातळीवर नगरसेवकांची बदनामी होते आहे. त्याच वेळी त्यांना सभागृहात बसून हे सगळे ऐकावे लागते आहे. तुम्ही चांगले अधिकारी म्हणून काम करताय. सगळ्यांची अपेक्षा आहे. सर्व काम नियमावर बोट

ठेवून करत असतो. या सगळ्या प्रकारांत नेमके काय झाले याच्या खोलात जायला पाहिजे आहे. संपूर्ण वैद्यकीय डिपार्टमेंट सफर होते आहे. यातून कामकाजावर परिणाम होतो आहे. वायसीएम व इतर रुग्णालयांच्या कामकाजावर परिणाम होतो आहे. भोसरी हॉस्पीटलची परिस्थिती पाहिली तर तिथे आमदारांनी अनेक वेळा सूचना केली. तिथे सरप्राईज व्हिजिट द्या. नेमकी परिस्थिती कळेल. कमी-जास्त प्रमाणात पिंपरी चिंचवडमधील रुग्णालयांची परिस्थिती अशीच झाली आहे. सर्वांना अपेक्षा आहे. तुमच्या काळात पिंपरी चिंचवडमधील रुग्णालये चांगल्या पद्धतीने चालतील असे वाटत होते. मात्र प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही. वैद्यकीय विभागात वाद चालू आहे. त्यामुळे सर्व गोष्टी घडत आहेत. या निमित्ताने डॉ.रॉय यांनी माफी मागावी. या सगळ्या गोष्टींच्या खोलात जाण्याची माझी व्यक्तिगत मानसिकता नाही. जे काही घडले आहे त्यांच्या हातून जे करायचे ते करुन पहा. माफी घेऊन फक्त समाधान होईल. नेमके काय घडले याच्या खोलात गेले पाहिजे. पूर्वी सुद्धा डॉ.नागकुमार, डॉ.अय्यर यांच्यात प्रमोशनसाठी याचप्रकारचा वाद झाला होता. हिच परिस्थिती आत्ता निर्माण झाली आहे. पक्षनेते, गटनेते यांनी यासंदर्भात आयुक्तांशी मिटींग घेऊन वाद मिटवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. एकमेकांना दोष देण्यापेक्षा सर्व पक्षांनी एकत्र येऊन वाद संपवण्याची मागणी या निमित्ताने इथे करतो आहे. ही माझी वैयक्तिक मागणी आहे. हा विषय इथेच थांबवावा.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पहिल्यांदा तुमचे आभार मानतो. तुम्ही बोलायला भरपूर वेळ दिला आहे. माझी व्यक्तिशः विनंती आहे की, कोणत्याही अधिका-याला त्याच्या मनावर परिणाम होईल असा अपमान व्हावा अशी सभागृहाची मुळात इच्छा नाही. डॉ.रॉय यांनी फेसबुकवर जी चूक केली त्याचा मी निषेध करतो. त्यांनी त्याची माफी मागितली पाहीजे याबद्दल दुमत नाही. वादविवाद करायचा नाही. अपमान करायची आवश्यकता नाही. एका बाजूला किरण गायकवाड यांच्याशी डॉ. रॉय यांची तुलना होते आहे. फेसबुकवर प्रतिक्रिया देऊन त्यांनी शंभर टक्के चूक केली आहे. किरण गायकवाड बाबत जे म्हटले गेले, मा.गोरक्ष लोखंडे यांनी कलम सांगितले आहे. माझी विनंती आहे, महापालिकेच्या कामात कसूर केली नसेल, गुन्हा बाहेर झाला असेल, कोर्टाकडून आरोपी म्हणून सिद्ध केले नसेल तर त्यांना निलंबित नाही केले पाहिजे. कोर्टाचा सन्मान करायचा असला तरी हा गुन्हा महापालिकेच्या हद्दीबाहेर झाला आहे. जोपर्यंत आरोप सिद्ध होत नाही, न्यायालय अंतिम निर्णय देत नाही तोपर्यंत तशा प्रकारची सस्पेंशन ऑर्डर ठेवणे चुकीचे असणार आहे. एका बाजूला एक न्याय, दुसरीकडे दुसरा न्याय. याबद्दल जरुर विचार करावा. अनेकांचे म्हणणे आहे, अशी प्रवृत्ती कशामुळे व्हायला लागली? या सर्व गोष्टींत मी जात नाही. डॉ.रॉय यांनी माफी मागावी. कामकाजात कसूर करु नये, एका बाजूला त्यांना सुद्धा

न्याय मिळावा अशी विनंती करतो व कामकाजाला सुरुवात करावी. मा.सिमा ताईंचे याठिकाणी अभिनंदन करणार आहे. सहका-यांनी हे शिकून घ्यावे. सभागृहात एका बाजूला डॉ. रॉय यांच्या विरोधात सगळे बोलत असताना त्यांनी त्यांची बाजू उचलून धरली. आरडून ओरडून दुस-याचे तोंड बंद करायचे काम नाही. हा प्रश्न कोणी मांडला? प्रत्येक सदस्यांला बोलायचा अधिकार आहे. मी प्रश्न विचारला म्हणून मीच बोलायचे, तुम्ही बोलू नये असे कोणी करु शकत नाही. मा.सिमाताईंनी विषय मांडला. त्यांचे म्हणणे मांडले. सर्वांना बोलायचा अधिकार आहे. प्रश्न कोणी विचारला हे सोडून द्या. दंड माफ करण्यासाठी विषय मांडला नाही. कोणत्याही एका अधिका-याला टार्गेट करु नये. न्याय देण्याचे काम करावे अशी विनंती करतो.

**मा.भाऊसाहेब भोईर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृहाने या विषयात अतिशय गंभीर चर्चा केलेली आहे. याचे पडसाद स्थायी समितीमध्ये सुद्धा उमटले होते. अधिका-याचा विषय असेल तर इथली प्रथा आहे की, त्याने इथे बसून राहू नये, बाहेर जाण्याची व्यवस्था असते. एवढी अपमानास्पद भावना व्यक्त केल्या. टोकाची भूमिका घेऊन मग ते आयुक्त असले तरी जी घटना घडली ती अतिशय निंदनीय असल्यामुळे तीव्र भावना होणे साहजिकच आहे. महापालिकेत एक संस्था म्हणून ज्यावेळी काम करत असतो त्यावेळी गेल्या ५/७ वर्षांत जातीयवाद फार फोफावत चालला आहे. बोलायला थोडेसे कठिण होईल. कास्टीझम इतर पातळ्यांवर सुद्धा फार होत चालला आहे. एक/दोन अधिका-यांबद्दल बोललो. सामाजिक विषयाचे भान ठेवून त्याचे भांडवल करायचा कोणी प्रयत्न करत असेल तर या गोष्टीला आम्ही भीक घालत नाही. सत्य हे सत्यच असते. डॉ.रॉय यांच्या संदर्भात सर्वांनी केवळ भावना व्यक्त केल्या असताना एक व्यक्ती म्हणून माझे वैयक्तिक मत आहे की, याचा साकल्याने विचार करणे अतिशय गरजेचे आहे. या पलिकडे जाऊन वेगळा कायदा, नियम बघायचे काम कायदेशीररित्या महापालिका आयुक्त नियोजनबद्ध व जागरूक भावनेने करत असतात. घटना घडल्यानंतर कारवाईला सामोरे जावे लागते. त्यानंतर आपण निर्णय घ्यावा. फेसबुकवर व्यवस्थित लिहिले आहे. हे कुठेतरी थांबवावे. आपण आपली संस्था सगळे एकजात असतो. त्याचे भान ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. यावर साकल्याने विचार करुन प्रश्न मार्गी लावावा. एकाला एक न्याय, दुस-याला दुसरा न्याय असे झाले नाही पाहिजे. मी जाहिरपणे बोलतो, कोणताही अधिकारी जातियवाद करत असेल तर त्याला त्याच्या जबाबदारीची जाणिव करुन द्या. नियमावलीत बसण्यासाठी भरपूर लोक बसले आहेत. कोणत्या पद्धतीने कोणी नियमबाह्य कार्योत्तर मान्यता देऊन एखाद्या अधिका-याला नियमात कसे बसवायचे ते बसवले जाते. मा.योगेश बहल मा.विधी समितीमध्ये सातत्याने ८ वर्षे होते. अनेक अधिका-यांना कायदेशीर मार्ग न हाताळता प्रमोशन्स दिलेली आहेत. या गोष्टीत सभागृहात तुम्ही निर्णय घेण्यासाठी

सक्षम आहात हे योग्य आहे. आत्ता माहिती अधिकार कायदा आला आहे. सर्वांचे भान ठेवून, सभागृहाचे भान ठेवून एखाद्या अधिका-याविषयीची चर्चा इथे थांबवावी.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,माझ्या मते ही घटना मागिल महापालिका सभेच्या ३ दिवस आधी फेसबुकवर झाली आहे. डॉ.रॉय यांच्या हातून जे घडले, मी त्याबद्दल बोलते. मी त्यांना कुठे पाठिशी घालते असे कोणीही समजून घेऊ नये. परंतू ही महिलेची बाजू पाहण्याची गोष्ट आहे. महिला राजकारणात सक्षमरितीने पुढे येतात. नवरा पाठिशी भक्कमपणे असतो म्हणून त्या पुढे येतात व पुढे जातात. आज मला वाटले होते महिला चवताळून उठतील. त्यांच्यात विचार करण्याची क्षमता आली आहे. कुठेतरी काही घडले असेल, जास्त धक्का बसला असेल, मन मोकळे करावे म्हणून मित्राकडे मन मोकळे केले. आम्हाला अंतःकरणापासून चांगले असणारे मित्र आहेत मग बोलावे असे त्यांना वाटले. यात नेहमी म्हटले जाते. स्वतःचे मित्र, स्वतःचे जवळचे नातेवाईक असे होऊ नये हे खरे. तुमचे दुश्मन असले तरी असे किती लोक असतील? कोण जिंकले कोण नाही जिंकले, माणूस डिप्रेशनमध्ये जातो. मनुष्याला दुःख होऊ शकते. ज्यावेळी एखादा माणूस संध्याकाळी फेसबुकवर बसत असेल तेव्हा मित्रांशी शेअरींग करावे असे त्याला वाटत असेल तर त्या दृष्टीकोणातून बोलत असतात. मला वाटते, ज्या दिवशी ही बातमी बाहेर लिक झाली, त्याच दिवशी डॉ.रॉय यांनी माफी मागितली होती. पत्रकारांनी पेपरमध्ये सुद्धा दिले होते. माझ्या हातून चुकीचे झाले आहे. माफी मागतो. काही सदस्यांनी सांगितले की, महिलांविषयी विषय आहे. पक्षनेत्यांनी,महापौरांनी महिला असून काय केले? टेकाळे साहेबांना विचारले. त्यांनी लगेच फोन केला का नाही? तुम्ही त्यांना लगेच फोन केला का नाही? त्यांना पाठिशी घालायचा आमचा विचार नाही. लोकांची मागणी होती त्याप्रमाणे त्यांनी माफी मागितली आहे. माफी मागितल्यानंतर माफी मागणारा स्वतः श्रेष्ठ होतो. माफ करणारा श्रेष्ठ होत नाही. आपल्याला प्रेशरखाली माफी मागून किती समाधान मिळाले आहे. ते आत्ता माफी मागू शकतात व आम्हीही आत्ता माफ करु शकतो. पण किती खोलात जायचे? कोळसा कितीही उगाळला तरी काळेच निघते. किरण गायकवाड यांचा गुन्हा सिद्ध झाला नाही. त्यांना निलंबीत करतो म्हणजे का असे विचारले होते, घटना घडली त्या मनुष्याने नगरला जाऊन आत्महत्या केली. त्याची बायको इथे आहे. मी किरण गायकवाडचे समर्थन करत नाही. आयुक्तांनी सुद्धा सांगितले की, पोलिसांना त्यांच्याकडे पत्र आणून दिले म्हणून त्यांच्यावर कारवाई करावी लागली. ही त्यांची पर्सनल गोष्ट आहे. त्यातून जे निष्पन्न होईल ते होईल. निलंबीत केलेल्या १९ लोकांची यादी टेकाळे साहेबांनी वाचून दाखवली. गुन्हा तुमच्याकडून झाला नाही, गुन्हा सिद्ध झाला नाही, तुम्ही कामावर होता. कोण-कोण काय-काय बोलत असतो. एवढे बोलून यातून काय निष्पन्न होते. मी सगळ्यांना विनंती करते, मला वाटत

नाही त्यांनी परत माफी मागावी. डॉ.रॉय यांनी आधी माफी मागितली आहे. माफी मागणाराच श्रेष्ठ ठरतो. सभागृहात ५१ टक्के महिला आहेत. तुमच्या हातून चूक घडली तरी महिला ही भगिनी, पत्नी, आई, मुलगी सगळ्या रुपांमध्ये वावरत असते. इथून पुढे अशा घटना घडू नयेत. तुम्हाला भाऊ म्हणून त्या माफ करतील. किरण गायकवाड किंवा कोणीही असो, कायद्याचेबाबतीत कोणीही असो, ही त्यांची पर्सनल गोष्ट आहे. त्यांनी कामावर काही केलेले नाही. जे काही घडले ते त्यांच्याकडून घडलेले नाही. तो उत्कृष्ट पद्धतीने काम करण्यासाठी प्रयत्न करत होता. नेमके काय घडले माहित नाही. या विषयावर चर्चा करावी असे वाटत नाही. दुपारी २ पासून आत्ता ५ वाजले तरी महापौर साहेबांनी बोलायला वेळ दिला आहे. मा.चंद्रकांता सोनकांबळे यांच्या विषयावर उत्तर द्यावे व कार्यपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करावी.

**मा.टेकाळे** (सहा.आयुक्त, प्रशासन) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी एकूण ११ कर्मचारी/अधिका-यांचे नाव जाहिर केले आहे. त्यांच्या निलंबनाची कारणे पुढीलप्रमाणे सांगतो–

१) कैलास थोरात, कार्य. अभियंता – दि.७/८/२००० रोजी रोडसाईडवरील ट्रान्सफॉर्मरचे चोरी प्रकरण.

२) कांदळकर टी.व्ही., उप जकात अधिक्षक – जकात नाक्यावर असताना रु.२,५००/- जास्त सापडले.

३) व्ही.टी. भोसले, लेखाधिकारी - दि.११/६/२००४ रोजी लिपिक स्तरावरील कर्मचा-यांने अपहार केला. पर्यवेक्षक अधिकारी म्हणून त्यांनी रु.४,२५,१५७/- भरले होते.

४) दांगट जी.एम., प्र.उपशहर अभियंता - चिंचवड येथील शिवाजी चौक ते केएसबी चौक या रस्त्याचे कामात निष्काळजीपणा केला.

५) इंगळे एस.एम., उपअभियंता (स्था) – केएसबी चौक ते शिवाजी चौक या रस्त्याची गुणवत्ता नित्कृष्ट राखल्यामुळे.

६) डॉ.बच्छाव बी.के., ज्येष्ठ वैद्य. अधिकारी – अकार्यक्षमता, राष्ट्रीय कार्यक्रमाचे उद्दीष्ट पूर्ण न करणे.

७) डॉ.इनामदार व्ही.एम., ज्ये.वैद्यकीय अधिकारी – विनापरवाना खाजगी नोकरी करणे.

८) गौड एस.एच., मुख्याध्यापक – शिक्षकांना विनाकारण त्रास देणे, चुकीची माहिती देणे.

९) डॉ.महादार अभिजित, वैद्य.अधिकारी – पेशंटचे संपूर्ण साहित्य वापरले, खोटी माहिती दिली. रुग्णाचे नुकसान केले.

१०) सुहास काकडे,व्यवस्थापक मध्य.औ.भांडार – मशीन खरेदी प्रक्रिया.

११) किरण गायकवाड, जनतासंपर्क अधिकारी – मनुष्यास आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल.

महाराष्ट्र सेवा शास्ती अपिल नियमानुसार कर्मचारी/अधिकारी यांच्याकडून गंभीर स्वरुपाचा गुन्हा घडला असेल तर पोलिसी तपास चालू असताना सुद्धा अधिका-याला निलंबित करण्याचा अधिकार महापालिकेला आहे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, यात बरेच वेगवेगळे प्रकार आहेत. आपल्याकडे अनेक केसेस आहेत, त्यांच्यावर महाराष्ट्रात, भारतात किंवा इतर राज्यात फौजदारी गुन्हा दाखल आहे, ते आपल्याकडे काम करत आहेत. राजेंद्र कांबळे, वेदपाठक यांच्यावर गुन्हा दाखल आहे. फौजदारी झाली आहे. त्यांचे सेवा निलंबन झाले होते. महापालिका खरेच स्वच्छता करत असेल तर जेवढी जेवढी घाण आहे ती बाहेर काढा. कधी कोणावरही उपकार करायची गरज नाही. त्यांचेही तातडीने निलंबन करा. आयुक्त साहेबांना विनंती आहे की, आपण स्वतः या सगळ्या गोष्टी चेक कराव्यात. आपल्याकडे अनेक लोक आहेत. त्यांना निलंबीत करावे. कायदा सगळ्यांना समान आहे. मी किरण गायकवाड यांची बाजू घेत नाही. मी जेव्हा प्रश्न दिले त्यावेळी सगळ्यांना वाटले, त्यांच्यासाठी मी प्रश्न दिले आहेत. कोणी कोणासाठी बोलणार नसेलतर मला बोलावे लागते अशी पद्धत इथे आहे. व्ही.टी. भोसले यांच्यावरही निलंबनाची कारवाई केली होती. गुन्हा दाखल झाला होता. नंतर कोर्टाने शिक्षा सुनावल्यानंतर निलंबन केले. डॉ.रॉय यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल असताना सुद्धा त्यांचे निलंबन का केले नाही? याचे उत्तर दिलेले नाही. विनंती आहे की, तुमचे प्रशासन राजकीय पक्ष नाही. प्रत्येक जातीच्या, धर्माच्या माणसाला मोठा हुद्दा, जागा देतो. महापालिकेचे नियम आहेत, त्यानुसार प्रशासन चालवत असतो. जो अधिकारी त्याच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्या पदावर जात असेल तर आमची हरकत नाही. सिनियारिटी आहे, शैक्षणिक पात्रता आहे म्हणून २/३ वर्षे तो वाट बघतो. तो त्या परिक्षांना बसून आल्याबरोबर त्या पदाची पात्रता बदलणारे वरिष्ठ लोक इथे दिसतात. या गोष्टींचे पडसाद इथे कळत असतात. डॉ. रॉय यांच्यावर फौजदारी दाखल असेल तर त्यांचे निलंबन झालेच पाहिजे ही माझी मागणी आहे. फेसबुक प्रकरणात एकच मित्र नसतो. हजारो, लाखोजण फेसबुकवर असतात. त्यांनी जी भूमिका मांडली त्यामुळे स्पेशली पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महापालिकेचे नगरसेवक-नगरसेविका यांची सगळ्यांची फेसबुकवरुन बदनामी झाली आहे. जेव्हा किरण गायकवाड यांची बातमी सगळ्यांनी वाचली, ते निर्दोष असतीलही, पण असे १० लोकही बोलणार नाहीत. नंतर त्यांच्या निलंबनाची बातमी वाचली. डॉ.रॉय यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. आम्ही माफी मागणारे कोण आहोत? आम्ही माफ केले असे म्हणणारे आम्ही कोण आहोत. इथे कारवाई झाली नाही. बाहेर सुद्धा काय़दे आहेत. तिथे सुद्धा मागणी करु शकतो. कोणी अधिका-याची बाजू घेत नाही हे चुकीचे होत असेल तर त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. महापालिकेचे काम

करणारे सर्वच अधिकारी जनतेचे काम करत असतात. ते त्या कामाचा पगार घेतात. २४ तास रेट्रून काम केले तर त्याचे कौतुक करतो. कोणी चुकीचे काम केलेतर त्याला पनिशमेंट होणे गरजेचे असते. कोण नगरसेवक ओरडून बोलतो का? काहीच बोलत नाही. न बोलणा-यांचीच संख्या सभागृहात जास्त आहे. म्हणून डॉ.रॉय यांच्यावर अनधिकृत बांधकामाबाबत, फेसबुक प्रकरण याबाबत योग्य ती निलंबनाची कारवाई झालीच पाहिजे. टेकाळे साहेबांनी जी नावे सांगितली, त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. याठिकाणी या गोष्टी बघून खात्री केली नाही का? महापालिकेत जातीभाव होत नाही. ५० वर्षांपूर्वी ठराविक समाजाचे लोक वरील पदांपर्यंत पोहोचू शकत नव्हते. एका वेळेला की पोस्टवर महापालिकेच्या ४ पदांवर एकाच समाजाचे लोक येऊ नयेत, यासाठी जातपात करत असाल तर या गोष्टी चुकीच्या आहेत. मा.योगेश बहल यांनी जे मुद्दे मांडले ते अतिशय महत्वाचे आहेत. तुम्ही एकदा कोणाची बाजू न घेता किरण गायकवाड यांच्या प्रकरणी कोर्टाने सांगितले आहे, या कारणाने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करता येत नाही. त्यांनी जामिन मिळाल्यानंतर कळवले का नाही. ते सांगितले नाही तरीसुद्धा त्यांच्यावर कारवाई केली आहे. सगळ्यांवर कारवाई करा, तुमचे अभिनंदन करु. तुमच्या सुद्धा कर्तव्यात कसूर होऊ शकते. आम्ही गप्प बसून सहन करणार नाही. किरण गायकवाड यांच्यावरील आरोप सिद्ध झालेतर त्यांना शिक्षा झालीच पाहिजे. महापालिकेत कोणीतरी प्रश्न विचारला, बातमी आली म्हणून शहराच्या भावना व्यक्त झाल्या असे होत नाही. दोषींवर निलंबनाची कारवाई करावी एवढीच विनंती करते.

----------

**मा.सुजाता पलांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक - १९/८/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमुका/२/कावि/३१२/२०१३ दि.३१/५/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक ११/६/२०१३ ठराव क्र.३५२४ नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३१८ दि.२६/७/२०१३

मे.रोटरी क्लब ऑफ पिंपरी-चिंचवड (शहरातील ६ शाखा) यांना प्रस्तावातील ६ जागा **१)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, (सध्याचे Urinalsचे ठिकाणी), मुंबई-पुणे रस्ता, पिंपरी, पुणे-४११ ०१८, **२)** फुगेवाडी जकात नाक्याचे बाहेरील बाजूस, फुगेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे-४११ ०१२, **३)** के.एस.बी. चौक, पिंपरी, पुणे-४११०१८ (आरक्षण क्र.१०), **४)** बर्ड व्हॅली (गेटचे बाजूस आतील मोकळी जागा), संभाजीनगर, चिंचवड, पुणे-४११ ०१९, **५)** साई चौक, (जेष्ठ

नागरिक संघ वाचनालयाचे बाजूस) नवी सांगवी, पुणे-४११ ०२७, **६)** भोसरी उड्डाण पुलाखाली (समाधान हॉटेलसमोर पुलाच्या खांबास लागून), भोसरी, पुणे-४११ ०३९ (प्रत्येक ठिकाणी सुमारे ५०० चौ.फुट) ३० वर्षे कालावधीसाठी र.रु.१/- प्रति महिना नाममात्र भाड्याने व या जागांवरील जाहिरात हक्कांचे मोबदल्यात स्वखर्चाने "पैसे द्या व वापरा" तत्वावर महिला व पुरुषांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणीसाठी उपलब्ध करुन देण्यास व त्यांचेशी याबाबत करार (Memorandum of Understanding) करणेस "महाराष्ट्र महापालिका अधिनियम" कलम ७९ नुसार मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.अश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब मा.आयुक्त साहेब, रोटरी क्लब ऑफ पिंपरी चिंचवड यासारखी सेवाभावी संस्था त्यांचा सार्वजनिक स्वच्छतागृह उभारण्याचा प्रस्ताव स्वागतार्ह आहे. शहरामध्ये अनेक ठिकाणी सुलभ शौचालये उभारलेली आहेत. त्यांचे काम व्यवस्थित होते का? त्यांच्या स्वच्छता सुविधा व्यवस्था योग्य आहे का? त्यांचेवर याबाबत कोणाचे नियंत्रण आहे? त्यांनी आजपर्यंत किती वेळा स्वच्छतेबाबतची तपासणी केली आहे? त्याचा अहवाल आहे का? हे तपासणे गरजेचे आहे. उदा. चिंचवड येथील सुलभ शौचालय स्वच्छतेसाठी २०१२-२०१३ मध्ये हस्तांतरण केले होते. त्याबाबत पत्र देण्यात आले आहे. आज ते स्वच्छतागृह अस्वच्छ आहे. शौचालयाची अत्यंत दुरावस्था आहे. याबाबत दि.१४/५/१३ रोजी आयुक्तांकडे तक्रार केली होती. आजसुद्धा या स्वच्छतागृहाची दुरावस्था आहे. नागरिकांना मला आज सकाळी फोटो काढून दिला आहे. खाजगीकरणाबरोबर त्यांचेवर नियंत्रण असणे मला महत्वाचे वाटते. याचा खुलासा पाहिजे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते **-**

चिंचवड संभाजीनगर येथिल मे.रोटरी क्लब ऑफ पिंपरी चिंचवडच्या ऑफीस शेजारील बसस्टॉपजवळ महिला व पुरुषांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृह उभारण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच महिला व पुरुषांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृह उभारण्याचे प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, मुंबई-पुणे रस्ता, पिंपरी, पुणे -१८ येथे नागरीकांच्या वाहतुक-वर्दळीच्या कारणास्तव रस्त्यालगत ऐवजी पुर्वी ज्या ठिकाणी मुतारी व स्वच्छतागृह होती त्याच ठिकाणी महिला व पुरुष यांची सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणेस मान्यता देणेत यावी.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सदर उपसुचनेला अनुमोदन देते.

**मा.कैलास कदम -** मा.महापौर साहेब मा.आयुक्त साहेब पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

महिला व पुरुषांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृह उभारण्याचे प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, मुंबई-पुणे रस्ता, पिंपरी, पुणे -१८ येथे नागरीकांच्या वाहतुक-वर्दळीच्या कारणास्तव रस्त्यालगत ऐवजी पुर्वी ज्या ठिकाणी मुतारी व स्वच्छतागृह होती त्याच ठिकाणी महिला व पुरुष यांची सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणेस मान्यता देणेत यावी.

**मा.भाऊसाहेब भोईर-** मा.महापौर साहेब मा.आयुक्त साहेब,सदर उपसुचनेला अनुमोदन देतो. तरी अनुमोदन देण्यापूर्वी माझी नम्र सूचना आहे की, संपूर्ण शाळा माध्यमिक किंवा शिक्षण मंडळाची शाळा असेल, तिची अत्यंत दूरावस्था झाली आहे. त्यादेखील यात बांधाव्यात.

**मा.अनंत को-हाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, काही गोष्टींचा खुलासा देण्यात यावा. रोटरी क्लब ऑफ पिंपरी चिंचवड यांना अशा पद्धतीने मोक्याच्या जागा देण्याचा विचार आपण जेव्हा करतोय. भविष्यात इतर काही संस्थांनी अशा जागा मागितल्यातर त्यांना आपण देणार आहात का? आपण एक रुपया भाडे तत्वावर जागा देत आहोत. त्यांचा अनुभव विचारात घेतला आहे का? आपले आरोग्य विभागाचे कर्मचारी भरपूर आहेत. यांना आरोग्य बाबतीत तसा अनुभव आहे का? स्वच्छतागृहे कशी बांधायची, त्यांची स्वच्छता कशी ठेवणार आहेत, देखरेखीसाठी किती माणसे ठेवणार आहेत. याचा खुलासा पाहिजे. आणखी काही संस्था आल्यातर आपण त्यांना देणार का?

**मा.विलास नांदगुडे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, रोटरी क्लबने जागा मागितली आहे हा विषय चांगला आहे. परंतू तुम्ही जर पाहिले असेल तर महत्वाचे लोकेशनच्या जागा त्यांनी मागितल्या आहेत. त्याठिकाणी त्यांना खरोखर प्रॉफिट मिळणार आहे. पैसे मिळणार आहे तशीच जागा त्यांनी मागितली आहे. परंतू ज्याठिकाणी एखादी शाळा आहे अशा ठिकाणी त्यांना प्रॉफिट मिळणार नाही अशा जागा त्यांनी घेतल्या नाहीत. याचा सुद्धा सभागृहाने विचार करावा.

**मा.श्रीरंग बारणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, या अनुषंगाने मी सुचना मांडलेली आहे. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहे व्हावीत अशी भावना अनेक सदस्यांनी अनेक वेळा व्यक्त केली. सभागृहात, खाजगीत अनेक वेळा सांगितले आहे. महापालिकेच्या जेवढया शाळा आहेत तिथे स्वच्छतागृहांची स्वच्छता होत नाही. सार्वजनिक स्वच्छतागृहे याठिकाणी सुद्धा स्वच्छता नसते. काही ठिकाणी बीव्हीजीला व सुलभला टेंडर दिले आहे. आपण याची माहिती मागवून सांगावी. मध्यंतरीच्या काळात मुख्याध्यापकांना बोलवून बैठक घेतली होती.

त्या तक्रारी ख-या का खोट्या याची देखील माहिती घेतली आहे. प्राथमिक शाळा किती, माध्यमिक शाळा किती हे देखील  सभागृहाला सांगावे. महापालिकेच्या शाळा आहेत त्या ठिकाणी स्वच्छतागृह स्वच्छ केली जात नाही. स्वच्छतागृह चांगले नसते. काही सुलभला दिले आहे. मा.आयुक्त साहेब आपण ज्या संस्थेला जागा देतो त्या संस्थेमध्ये सार्वजनिक शौचालय स्वच्छ झाली पाहिजे असे संबंधित अधिका-यांना पत्र दिले आहे. डांगे चौकासारख्या भरचौकात सार्वजनिक शौचालय करण्यासाठी मी अनेकवेळा पत्र दिले आहे. डांगेचौक या ठिकाणी छ.शिवाजी महाराजांचा पुतळा आहे त्या ठिकाणी लघुशंकेला बसतात ही दूर्दैवाची गोष्ट आहे. तुम्हाला वाटले तर विषय ठेवता. सन्माननियांनी सांगितले जिथे आवश्यकता आहे तिथे जातीने लक्ष घालत नाही. तुम्ही तुमच्या मर्जीप्रमाणे महापालिकेचा कारभार करता हे चुकीचे ठरत नाही. शाळांची शौचालयांची व्यवस्था पाहा. काय कारवाई केली आहे? आजही दिरंगाई होते. आयुक्तांना वाटले तर ते संबंधित अधिका-यांना सांगणार, तिथे लक्ष द्या नाहितर सस्पेण्ड केले जाईल. किती संबंधित अधिका-यांना पत्र मिळाल्यावर सस्पेंड केले. मा.आयुक्त साहेब, तुम्ही जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहांत. असा माझा आरोप आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी उभ्या देशाच्या भावना जोडल्या आहेत. तिथे लोक लघुशंकेसाठी बसतात. त्याठिकाणी तुम्हाला काही करायचे नसेल तरी कमीत कमी त्याठिकाणी आठ/दहा फुटांची भिंत घालून दया. तुम्हाला अस्मियता असेल तर सोय करुन द्या.

**मा.संजय काटे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

प्रभाग क्र. ६४ (बोपखेल) येथील पीएमपीएमएल बसस्टॉप शेजारी नागरिकांच्या सोयीसाठी स्वच्छतागृह नसल्याने गैरसोय होते आहे. विशेषतः महिलांची कुचंबणा होते आहे. तरी वरील ठिकाणी स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नितीन लांडगे** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.राजेंद्र काटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, स्वच्छतागृहाचेबाबतीत आपण टेंडर दिली आहेत. आपल्या निदर्शनास आणून दिले आहे, ख-याअर्थाने बीव्हीजी संस्था काम करत नाही. त्यांनी ठेकेदार नेमले आहेत. संस्थेत मानधनावर ते काम करतात. कामगारांना पूर्ण पगार दिला जात नाही. महापालिका सरकारी संस्था आहे. त्यांना योग्य पगार मिळतो का नाही? हे पाहणे ख-या अर्थाने आपले काम आहे. त्यांना चेकने पेमेण्ट झाले पाहीजे. त्यांना रु.१८००/- पगार देत असाल तर त्यांची मानसिकता किती चांगली राहणार आहे. त्यांना महिन्याला तीन/चार हजार पगार देतात, सुट्टीच्या दिवसाचा पगार कट करतात. रविवारचा

पगार कट करतात. रोजंदारीवर राबवून घेता. पगारच मिळणार नसेल तर कोण स्वच्छतेचे काम करणार आहेत**?** चेकने पेमेण्ट केलेतर रोजगार व्यवस्थित मिळेल. चांगल्या प्रकारे आनंदाने काम करतील. हा प्रस्ताव आलेला आहे. निश्चितपणे आवर्जून चेकने पेमेण्ट करा. नगरसेवक असला तरी काही व्यक्ती अशा जागांवर स्वच्छतागृहांच्या जागा करतात. कोर्ट मॅटरच्या जागा, खाजगी मालकीच्या जागा असतात. मुख्य परिसरातल्या अशा जागांची वाट लावून टाका. स्वच्छतागृहासाठी योग्य जागा कुठे आहे ते बघून घ्या. त्यांची स्वच्छता रोज होत नाही. त्यामुळे आजूबाजूच्या चार जागांचे नुकसान केले जाते. जागा मालकाचे नुकसान केले जाते. जागा योग्य आहे का नाही, कोणाला त्रास होतो आहे का नाही याची सुद्धा एकदा तपासणी करावी.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, मे.रोटरी क्लब ही अतिशय चांगली संस्था आहे. महापालिकेकडून कोणी जागा घेत असेलतर शौचालये करण्यासंदर्भात अभिनंदनाची गोष्ट आहे. धंदा करुन पैसे कमविण्याचा हेतू नसेल तर त्यामुळे देण्यास माझी काही हरकत नाही. आपल्या शहराचा नावलौलिक असलेले भक्तीशक्ती चौक, या परिसरात कमीत कमी हजार/दीडहजार लोक रोज येतात. लहान मुले असतात. त्याठिकाणी जागा अपूरी असल्यामुळे कोठेही टॉयलेटची सोय नाही. त्या ठिकाणी कोप-यात का होईना स्वच्छतागृह बांधण्याचा आदेश द्यावा. महापालिकेच्या शाळांत ६० खोल्या आहेत तर ३/४ महिला कामाला असतात. प्रत्येक मजल्यावर टॉयलेट असावे. त्याठिकाणी आरोग्याचे ऑफिस आहे. त्याठिकाणी टॉयलेट नाही  एकच महिला त्याठिकाणी काम करते. बीव्हीजीचे लोक त्याठिकाणी काम करीत आहेत. कामगारांना पगार दोन, तीन हजार देतात. दोन मुले सिक्युरिटी म्हणून बारा बारा तास काम करतात व त्यांना तीन हजार पगार देतात. त्यामधूनही पगार कट करतात. तरी या गोष्टींचा विचार करावा.

**मा.उल्हास शेटटी** -मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, मला याठिकाणी आयुक्तांना विनंती करायची आहे, आपल्या परिसरात दूर्लक्ष का करताय. क्रिडासंकूलातील टॉयलेटची एवढी वाईट परिस्थिती आहे की आपण जाऊ शकत नाही. बजेटमधून पैसे देतो. पिंपरी चिंचवडच्या टॉयलेटमध्ये तर आपण जाऊ शकत नाही एवढी वाईट परिस्थिती आहे. टेनिस कोर्ट घ्या, स्विमिंग पूल घ्या. अ प्रभागात टॉयलेटची मागणी आहे. मा.शांताराम भालेकर यांनी अधिका-यांच्या निदर्शनास आणुन दिले आहे. शहरात मनपाच्या बिल्डींग आहेत. याच्याकडे दूर्लक्ष करत असताना आपण एवढे पैसे देतो. मिनिमम वेजेस †क्टप्रमाणे पैसे देत असताना दीड/दोन हजारांत स्वच्छता होणार आहे का शक्य नाही. हे करत असताना निवडताना अजंठानगर, थरमॅक्स चौक निवडावेत. आत्ता ६ टॉयलेटस प्रायोगिक तत्वावर

घेतले आहेत. ताबडतोब प्रकल्प राबविला तर खर्च युटिलाईज होईल. झोपडपट्टीतील लोक, व्यापारी वर्ग, ट्रान्सपोर्टचे लोक त्याठिकाणी त्याचा वापर करतील.

**मा.अतुल शितोळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आता जो टॉयलेटचा विषय आला आहे टॉयलेट ब्लॉक बांधल्यानंतर पहिले सहा महिने चकाचक असतात की टाईल्समध्ये आपला चेहरा दिसतो. सहा महिन्यांनंतर तिथे जाऊन पहा. मा.उल्हास शेट्टी यांनी सांगितले, तिथे जाता येत नाही. शाळांच्या स्वच्छतागृहांची काय परिस्थिती आहे. एकदा टॉयलेट बांधल्यानंतर पुन्हा बघत नाही. खरेतर आपले जे अधिकारी आहेत त्यांचे लक्ष असले पाहिजे. प्रामुख्याने फक्त रोटरी क्लबला ते दिले आहे. चॅरिटेबल ट्रस्टला व महिला बचतगट आहे त्यांना ते चालू करण्यास दयावे असे वाटते अशी माझी विनंती आहे.

**मा.प्रशांत शितोळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,खरेतर हा विषय एकप्रकारे प्रशासनाच्या नाकर्तेपणाचा आहे. टॉयलेटच्या तक्रारी चालू राहू नयेत असे मला वाटते. आमच्या चौकातील, शाळांतील जागा पत्र देऊनही स्वच्छ होत नसतील तर आपले लोक काय करतात? माझा स्वतःचा अनुभव सांगतो – झोनिपू विभागात पत्र दिले होते. २/३ वेळा त्याविषयी विचारले की, तुमच्या अंदाजपत्रकातून सुलभ शौचालये बांधून द्या. जागा उपलब्ध आहे. सध्या असलेल्या टॉयलेट ब्लॉकच्या जागा ग्रामपंचायतीच्या काळातल्या आहेत. यावर त्यांचे पत्र आले, बांधून देणार नाही. या टॉयलेटसची परिस्थिती गलिच्छ आहे, दुर्गंधी येते. ते दुरुस्त करुन पे अण्ड यूज या तत्वावर करुन द्या असे मी पत्र दिलेतर मला पत्र आले, असे करुन देता येणार नाही. दोन्ही बाजूंना किती विरोधाभास आहे. एकिकडे शाळेत स्वच्छता होत नाही आणि रोटरी क्लब यांनी चांगला प्रस्ताव दिला म्हणून जी.बी. समोर त्यांचा विषय ठेवला आहे. वास्तविक पाहता, ज्याठिकाणी नागरीकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात आहे, तिथे टॉयलेट झालेच पाहिजेत. याच्या पॉलिसीला मान्यता घ्या. असा विषय सभागृहात आलातरी महापालिकेच्या मिळकतींची परिस्थिती काय आहे? शाळांची परिस्थिती काय आहे याची चर्चा करत असाल तर परिसरातील भागामध्ये स्वच्छतागृहे बांधून देणार आहात का याबाबत सदस्यांनी चर्चा केली. त्यांचे म्हणणे आहे, ज्या-ज्या परिसरात आवश्यकता आहे, आम्ही पत्रव्यवहार केला आहे, मागणी केली आहे तरी आमचे काम होत नाही. मा.आप्पा बारणे यांच्यासारख्या ज्येष्ठ सदस्यांनी सांगितले, ही तक्रार त्यांना सांगायला लागणे हे ठिक नाही. आपल्या लोकांना कळत नाही का, या या अडचणी याठिकाणी सॉल्व्ह झाल्या पाहिजेत. कामकाजाची पद्धत सुधारली आहे. तुमच्या अधिका-यांना नुसते नीटनेटके, कलरकोड युनिफॉर्ममध्ये राहू देऊ नका. नागरिकांना चांगल्या पद्धतीने परिणाम मिळाले पाहिजेत. आम्ही नागरिकांना कशाला उत्तर द्यायचे. मी मागणी केली असेल, होणार नसेल तर तसे पत्र द्या. टाळाटाळ करायचे कारण नाही. तुमच्याकडून ३० टक्के केलेतर जास्त पैसे

खर्च होत नाहीत. प्रत्येक ठिकाणी हिच परिस्थिती आहे. एस्टिमेट तयार करा. ते तयार नाही. आम्ही बजेटला मान्यता दिली आहे. तुमच्या प्रशासकीय अडचणी आहेत. ही महत्वाची गोष्ट आहे. नागरीकांची सोय झाली पाहिजे. बाकीच्या कोणाची मंजूरी होऊ द्या, तुम्ही तुमच्या संबंधित विभागाला सूचना द्या. अशा पद्धतीने कामाची व्यवस्था झाली पाहिजे. पाणी जास्त वापरु नये म्हणून वॉटरलेस सिस्टिम लावली. पाणी वाचवा म्हणता. पण या गोष्टी पाणी वापरुनच स्वच्छ राहतात. शाळेच्या टॉयलेटपाशी तुम्ही जा. ५ मिनिटे सुद्धा तुम्ही थांबू शकत नाही. याचा विचार तुम्ही करावा. मी दिलेल्या पत्राचा त्या अनुषंगाने विचार करावा. ज्या-ज्या मान्यवरांनी विनंती केली, त्यांचा विचार करावा.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)** - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, हा विषय रोटरी क्लबने पुढाकार घेऊन सहा ठिकाणी जागा मागितल्या होत्या. रोटरी क्लब यांना ज्या पद्धतीने देणे योग्य वाटेल त्या पद्धतीने विषय दिलेला आहे. रोटरी इंटरनॅशनल यांचे अनुदान या ६ स्वच्छतागृहांसाठी प्राप्त करणार आहोत. याच ठिकाणी करा असा आपण आग्रह धरला नाही. जिथे जास्त वर्दळ आहे असा जागा निवडल्या आहेत. पिंपरी चिंचवड शहरामध्ये स्वच्छतागृहांची संख्या कमी आहे. बांधलेली स्वच्छतागृहे तोडली जात आहेत. रस्ता रुंदीकरण किंवा विकास करण्याच्या नावाखाली असलेल्या जागांवरील नवीन स्वच्छतागृहे तोडली जात आहेत. त्याबाबत श्री.अंबादास चव्हाण,श्री.काची,श्री.संजय कुलकर्णी व श्री.राजाराम चव्हाण यांना सूचना केल्या होत्या. स्वच्छतागृहांची अवस्था अतिशय खराब आहे. वापरायची इच्छा होत नाही. सार्वजनिक शौचालयांच्या जागा, पुणे-मुंबई रस्ता ४५ मी. रस्ता, ३६ मी. रस्ता या सगळ्या जागांची यादी तयार केली आहे. यादी तयार होती त्यावेळी त्यांना सांगितले होते, त्याठिकाणच्या सन्मा.सदस्य यांच्याशी चर्चा करुन जागा सुलभ राहिल त्याप्रमाणे नगररचना विभागाचे अधिकारी व सॅनिटेशन विभागाचे अधिकारी जागा निश्चित करतील. पिंपरी चिंचवड शहराला बेस्ट सिटी, मॉडेल सिटी म्हणतो परंतू शहरात स्वच्छतागृहे नाहीत ही गोष्ट शहराला निश्चितच भूषणावह नाही. या पद्धतीने प्रशासनाने तयारी केलेली आहे. मी सूचना करतो, सन्मा. सदस्यांची यादी करावी. ज्या-ज्या सदस्यांनी मागणी केली आहे त्यांच्याशी चर्चा करुन जागा निश्चित करुन आपल्या बजेटमधून स्वच्छतागृहे बांधायची तरतूद करुन घ्यावी अशी सूचना करतो. त्यांची देखभाल व्यवस्था नीट होत नाही अशी भावना अनेक सदस्यांनी व्यक्त केली. सुलभ इंटरनॅशनल ही एक संस्था आहे. त्यांच्या कामकाजाबद्दल अनेक ठिकाणी असमाधान व्यक्त केले जाते. पे †ण्ड यूज पद्धतीने स्वच्छतागृहे वापरता येतील. शहरातील स्वच्छतागृहांच्या बाबतीत मी स्वतः समाधानी नाही. त्याबाबत अहवाल मागवला आहे. अतिशय दूरावस्था आहे. ऑटोक्लस्टरच्या सभागृहात मुख्यअभियंता, स्थापत्य, पाणीपुरवठा विभागातील अभियंता,

सर्व कार्यकारी अभियंता, अतिरिक्त आयुक्त यांच्याबरोबर मिटींग घेऊन अत्यंत अस्वच्छता असलेबाबत मुख्य अभियंता यांना ताकीद दिली आहे. २ ऑक्टोबरपर्यंत बदल घडणे अपेक्षित आहे. जोपर्यंत सर्व शाळांमधील स्वच्छतागृहांच्या परिस्थितीत सुधारणा होत नाही, रिपोर्टिंग केले नाहीतर याला शाळेचे मुख्याध्यापक जबाबदार राहतील. संस्थेला सूचना देऊनही त्यांनी त्याकडे दूर्लक्ष केले, सुधारणा केली नाहीतर संस्थेला सुद्धा जबाबदार धरण्यात येईल.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

यापुर्वी महानगरपालिका ठराव क्र.१८५ दिनांक ११/२/२०१३ अन्वये केलेल्या ठरावामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी शहरामध्ये ठिकठिकाणी आरोग्य विभागाकडून सदर प्रस्तावित महिला व पुरुषांकरिता सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणीकरिता मान्यता घेऊन, ३० वर्षे कालावधीसाठी र.रु.१/- प्रति महिना नाममात्र भाड्याने व या जागांवरील जाहिरात हक्कांचे मोबदल्यात स्वखर्चाने “पैसे द्या व वापरा” या तत्वावर महिला व पुरुषांकरिता सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणीसाठी ह्याच तत्वावर धोरणास मान्यता देणेत यावी.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** –मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक -३३९ | विषय क्रमांक - १ |
| दिनांक - १९/८/२०१३ | विभाग- मा.आयुक्त |

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमुका/२/कावि/३१२/२०१३ दि.३१/५/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक ११/६/२०१३ ठराव क्र.३५२४ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३१८ दि.२६/७/२०१३

मे.रोटरी क्लब ऑफ पिंपरी-चिंचवड )शहरातील ६ शाखा (यांना प्रस्तावातील ६ जागा **१)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, (सध्याचे Urinalsचे ठिकाणी), मुंबई-पुणे रस्ता, पिंपरी, पुणे-४११ ०१८, **२)** फुगेवाडी जकात नाक्याचे बाहेरील बाजूस, फुगेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे-४११ ०१२, **३)** के.एस.बी. चौक, पिंपरी, पुणे-४११०१८ (आरक्षण क्र.१०), **४)** बर्ड

व्हॅली (गेटचे बाजूस आतील मोकळी जागा), संभाजीनगर, चिंचवड, पुणे-४११ ०१९, **५)** साई चौक, (जेष्ठ नागरिक संघ वाचनालयाचे बाजूस) नवी सांगवी, पुणे-४११ ०२७, **६)** भोसरी उड्डाण पुलाखाली (समाधान हॉटेलसमोर पुलाच्या खांबास लागून), भोसरी, पुणे-४११ ०३९ )प्रत्येक ठिकाणी सुमारे ५०० चौ.फुट (३० वर्षे कालावधीसाठी र.रु.१ -/प्रति महिना नाममात्र भाड्याने व या जागांवरील जाहिरात हक्कांचे मोबदल्यात स्वखर्चाने "पैसे द्या व वापरा" तत्वावर महिला व पुरुषांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणीसाठी उपलब्ध करुन देण्यास व त्यांचेशी याबाबत करार (Memorandum of Understanding) करणेस "महाराष्ट्र महापालिका अधिनियम" कलम ७९ नुसार मान्यता देणेत येत आहे. तसेच चिंचवड संभाजीनगर येथिल मे.रोटरी क्लब ऑफ पिंपरी चिंचवडच्या ऑफीस शेजारील बसस्टॉपजवळ महिला व पुरुषांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृह उभारण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच महिला व पुरुषांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृह उभारण्याचे प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, मुंबई-पुणे रस्ता, पिंपरी, पुणे -१८ येथे नागरीकांच्या वाहतुक-वर्दळीच्या कारणास्तव रस्त्यालगत ऐवजी पुर्वी ज्या ठिकाणी मुतारी व स्वच्छतागृह होती त्याच ठिकाणी महिला व पुरुष यांची सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ६४ (बोपखेल) येथील पीएमपीएमएल बसस्टॉप शेजारी नागरिकांच्या सोयीसाठी स्वच्छतागृह नसल्याने गैरसोय होते आहे. विशेषतः महिलांची कुचंबणा होते आहे. तरी वरील ठिकाणी स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उभारणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच यापुर्वी महानगरपालिका ठराव क्र. १८५ दिनांक ११/२/२०१३ अन्वये केलेल्या ठरावामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी शहरामध्ये ठिकठिकाणी आरोग्य विभागाकडून सदर प्रस्तावित महिला व पुरुषांकरिता सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणीकरिता मान्यता घेऊन, ३० वर्षे कालावधीसाठी र.रु.१/- प्रति महिना नाममात्र भाड्याने व या जागांवरील जाहिरात हक्कांचे मोबदल्यात स्वखर्चाने "पैसे द्या व वापरा" या तत्वावर महिला व पुरुषांकरिता सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणीसाठी ह्याच तत्वावर धोरणास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३४० विषय क्रमांक - २

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. स्था/वाक/कावि/१२२/२०१३, दि.१०/७/२०११

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि. १७/०७/२०१३ ठ.क्र. २१ नुसार

३) मा.स्थायी समिती सभा क्र.६/८/२०१३ ठ.क्र.३८४०

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील काही प्रमुख रस्त्यांवर फ्लायओव्हरखाली व वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे & पार्क योजना राबविणे आवश्यक आहे. याकरीता पिं.चिं.मनपा हद्दीतील भोसरी फ्लायओव्हर,निगडी फ्लायओव्हर, चाफेकर चौक फ्लायओव्हर, क्रोमा शोरुम शेजारील जागा या ठिकाणी पे & पार्क योजना राबविणेचे नियोजन आहे. याकामी पुणे मनपा कडील पे & पार्क च्या दरांचा अभ्यास केला असुन त्यांचेकडील दर पिं.चिं.मनपा क्षेत्रातही लागु केल्यास सुसूत्रता राहील असे वाटते. त्यानुसार पे & पार्क चे शुल्क (Telescoping Parking Charges) पुढीलप्रमाणे सुचविणेत येत आहे.

१) रस्त्यावरील वाहनतळ

अ) दुचाकी वाहनांकरिता -

पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.३/-

१ तासापुढील कालावधीसाठी – र.रु.४/- प्रति/तास

ब) चारचाकी वाहनांकरीता -

प्रत्येक तासाकरिता – र.रु. १०/-

२) मनपामार्फत तसेच विकास आराखडयातील तरतुदीनुसार विकसित केलेले वाहनतळ /फ्लायओव्हर खालील वाहनतळ

अ) दुचाकी वाहनांकरिता –

पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.२/-

१ तासापुढील कालावधीसाठी र.रु.३/-प्रति/तास

फक्त रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. १५०/-

ब) चारचाकी वाहनांकरिता -

प्रत्येक तासाकरिता – र.रु.१०/-

फक्त रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. ४५०/-

विद्यार्थ्यांसाठी मनपामार्फत देण्यात येत असलेल्या अन्य सवलतीचे धोरणांनुसार विद्यार्थ्यांना पार्किंग सवलत देऊन त्यांना त्यांचे शाळेचे /कॉलेजचे ओळखपत्र व वाहन परवाना सादर केल्यास त्यांना दरमहा र.रु. १००/- याप्रमाणे पार्किंग शुल्क आकारावे. तसेच सदर पे & पार्क योजनेअंतर्गत दूचाकी व चारचाकी वाहनांकरिता ३ वर्ष

कालावधीसाठी ठेका देणेसंदर्भातील अटी व शर्ती प्रस्तावा सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे आहेत.सदरचे पे & पार्क योजनेच्या प्रस्तावित दरास मान्यता देणेत येत आहे

**मा.अमिना पानसरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.अश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,यात चापेकर चौकाचा उल्लेख आहे. फ्लायओव्हरखाली व वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे **&** पार्क योजना राबविणे या योजनेचे स्वागत करते. चापेकर चौक शहराचे मध्यवर्ती ठिकाण आहे. तिथे बसस्टॉप, पोस्ट ऑफिस, बँका, नामांकित ज्वेलर्सची सोन्याचांदीची दुकाने, शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था आहेत. पे †ण्ड पार्क योजना राबवली तरी उड्डाणपुलाखालील रिक्त राहिलेल्या जागेचे सुशोभिकरण करावे व जागा बंदिस्त करावी. जेणेकरुन त्या जागेत अतिक्रमण होणार नाही व परिसर स्वच्छ व सुंदर राहिल. संबंधित विभागाला सूचना देण्यात आल्या होत्या. चार महिने झालेतरी कारवाईला दिरंगाई होते आहे. कृपया काम लवकरात लवकर व्हावे ही विनंती आहे.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पे †ण्ड पार्क योजनेच्या विषयात सर्वच उड्डाणपूलांखाली पार्किंगचा विषय आहे. यासंदर्भात अनेक वेळा सूचना केल्या होत्या, विनंती केली होती. भोसरीच्या उड्डाणपूलाखाली काय अवस्था आहे ते पहा. किती गाड्या लागतात. प्रभाग अधिका-यांनी मागील महिन्यात कारवाई केली होती. परिस्थितीत सुधारणा झाली आहे. खूप मोठ्या प्रमाणात सुधारणा होणे अपेक्षित आहे. आपल्याशी केलेल्या चर्चेत तसे ठरले होते. सर्व ठिकाणी बंद करणार आहोत. त्याठिकाणी गार्डन करायला ठेकेदार तयार आहे. ज्या कंपनीचे टेंडर आहे, त्या कोणावरही कारवाई झालेली नाही. जाळी लावली आहे, ती नित्कृष्ट दर्जाची जाळी आहे. पण लावली आहे. अत्यंत खराब काम झाले आहे. लोक पैसे भरुन गाडीचे पार्कींग करणार आहेत. परंतू गाड्यांची सुरक्षिततासुद्धा महत्वाची आहे. त्या अनुषंगाने चिंचवडे ताईंना सूचना केली आहे. सुशोभिकरण असले पाहिजे. पार्किंगची गरज आहे तिथे पार्किंग असलेच पाहिजे. सुरक्षितता असली पाहिजे. जी काही कामे केली होती, ती अतिशय नित्कृष्ट दर्जाची आहेत. संबंधित अधिका-यांना ताबडतोब काम करायची सूचना द्या. त्याचबरोबर उड्डाणपूलाखालील अतिक्रमणे कमी झाली पाहिजेत. खाजगी लोक सुद्धा खर्च करायला तयार आहेत. आपली इच्छा असेल तर तसे लोक मिळू शकतात. पूलाखालील परिसर सुशोभित होऊ शकतो. ताबडतोब तशा प्रकारच्या सूचना संबंधित अधिका-यांना द्याव्यात.

**मा.राजेंद्र काटे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रत्येक शनिवार, रविवार, दापोडीतील चर्चमध्ये दीड ते दोन हजार लोक येत असतात. उड्डाणपूलावर सुद्धा वाहने पार्क केली जातात. ट्रॅफिक सुरळीत व्हायला ३ ते ४ तास लागतात. सोसायटीतील नागरिकांना त्रास होतो. सोसायट्यांमध्ये अनऑथराईज गाड्या लावल्या जातात. या रामभाऊ काटे उड्डाणपूलाखाली पे †ण्ड पार्कची सोय करण्यात यावी अशी सूचना करतो. या विषयाच्या अनुषंगाने उपसूचना आहे की, पिंपरी चिंचवड हद्दीतील प्रभाग क्रमांक ६२ दापोडी याठिकाणी असणा-या "रामभाऊ काटे" उड्डाणपुलाखाली दुचाकी व चारचाकी वाहनाकरिता पे †ण्ड पार्क योजना राबविणे अत्यावश्यक आहे. कारण त्याठिकाणी दर शनिवार/रविवार विनियार्ड चर्च याठिकाणी येणा-या लोकांची संख्या ५ ते ६ हजार असते व ते पुलावर देखील वाहने पार्क करतात. त्यादृष्टीने हे गरजेचे असल्याने त्यास उपसूचना देणेत येत आहे.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, या विषयाची मागणी २ वर्षांपासून करतो आहे. २ वर्षांनंतर विषय आला आहे. ६ महिन्यांत काम पूर्ण होईल. काम चालू झालेतर लगेच चालू होईल. पे †ण्ड पार्क करावे.

**मा.मंगेश खांडेकर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - निगडी फ्लायओव्हर खालील Tours & Travels चे offices आहेत. ते तसेच ठेऊन इतर उपलब्ध जागेवर पे & पार्क योजनेचा अंमल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.महेशदादा लांडगे –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, पे †ण्ड पार्कसाठी हा विषय इथे आलेला आहे. भोसरी उड्डाणपूलाचा उल्लेख इथे झालेला आहे. हा उड्डाणपूल होऊन बरेच दिवस झाले आहेत. त्या खाली काही जागा पार्किंगसाठी व गार्डनसाठी दिलेली आहे. त्याठिकाणी पार्किंग झोन डिक्लेअर केलेला आहे. त्या दृष्टीने तिथे तयारी आहे. हा भाग माझ्या वार्डात येतो. सुशोभिकरण करण्यासाठी गार्डन केली आहे. ती गार्डन आपण वापरायची व देखभाल सुद्धा आपणच करायची असे संबंधित ठेकेदाराने सांगितले आहे. उड्डाणपूलाखाली अनधिकृत व्यवसाय चालतात त्याबद्दल ब-याचशा सदस्यांनी सूचना केली आहे. आरटीओ यांना सूचना करा. तिथे प्रायव्हेट ट्रान्सपोर्टच्या गाड्या मोठ्या प्रमाणात थांबतात. त्यासाठी काहीतरी करा. एकतर प्रोजेक्ट चालू आहे तिथे करा. तिथे फ्लायओव्हर ज्या कारणासाठी झाला आहे, तिथे बसेसमुळे जास्त अडचण निर्माण होते. आरटीओ यांना पत्र देऊन कळवा. प्रायव्हेट बसेसचा थांबा अलिकडे किंवा पलिकडे करा. पे †ण्ड पार्कसाठी फ्लायओव्हरखालील भाग प्रायोगिक तत्वावर चालवावा. ज्या निविदा मागवल्या, त्यांना

मिळणार आहेत. त्यातील अडचणी समजतील. आजूबाजूला बँका आहेत, मोठमोठे व्यापा-याची दुकाने आहेत. ते सुद्धा महिन्याच्या ठेक्याने पार्किंग विकत घ्यायला तयार आहेत. तिथे जाऊन परिस्थिती बघा. एक विषय स्थायी समितीमध्ये केला होता. गार्डन संस्थेला देखभालीसाठी द्यावी. त्यासाठी निविदा घ्यावी लागेल असे त्याठिकाणी सांगितले आहे. यात कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. त्याठिकाणी राहणा-या नागरिकांना त्रास व्हायला लागला आहे. महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना त्रास व्हायला लागला आहे. रोड क्रॉसिंगसाठी रस्ता ठेवला आहे. त्याचा उपयोग तिथे होत नाही. आपण यात लक्ष घालावे. पे †ण्ड पार्क साठी हा भाग देऊन त्याचा उपयोग होणार नाही. महापालिकेला होणार नाही व ज्याला काम दिला त्याला सुद्धा होणार नाही. महापालिकेने पहिल्यांदा निविदा प्रक्रिया करावी. स्वतः लक्ष घालून विषय मार्गी लावावा.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आपल्या पिंपरी चिंचवड शहरात पाहिलेतर माझ्या प्रभागात ६ मीटरचा रस्ता, १८ मीटरचा रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पार्किंगचा विषय गंभीर आहे. एलबीटीमुळे महापालिकेचे उत्पन्न कमी झाले असलेतरी पे †ण्ड पार्क योजनेमुळे चारचाकी, दुचाकी गाड्या असतीलतर महापालिकेला उत्पन्नाची व्यवस्था होईल. म्हणून हा विषय घेतला आहे. रात्री अपघात झाला असेलतर हा फार मोठा गंभीर प्रश्न आहे. संपूर्ण शहरात पार्किंगची व्यवस्था नाही. पार्किंग असून सुद्धा रस्त्यावर गाड्या पार्क केल्या जातात. प्रत्येक रोडला पार्किंग ठेवले पाहिजे याचा विचार आयुक्त साहेबांनी करावा ही विनंती.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब मा.आयुक्त साहेब, सगळ्यात महत्वाचे म्हणजे इथे पे †ण्ड पार्कचा विषय आपल्यासमोर आला आहे. शहरातील नागरिक कर भरतात. दर वर्षी करात वाढ करतोय. गाडी पार्क करण्यासाठी सुद्धा तुम्ही शहरातील नागरिकांकडून पैसे घेणार आहात. दुचाकी घेणारा प्रत्येक नागरिक सक्षम असतोच असे नाही. ज्या-ज्या वेळी हॉटेलसाठी परमिशन देतो, त्या-त्या वेळी हॉटेलसाठी पुरेशी पार्किंगची व्यवस्था आहे का याची पाहणी करावी. तरच कंम्प्लिशन सर्टिफिकेट द्यावे. इथे मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते – विद्यार्थ्यांसाठी मनपामार्फत देण्यात येत असलेल्या अन्य सवलतीचे धोरणांनुसार विद्यार्थ्यांना पार्किंग सवलत देऊन त्यांना त्यांचे शाळेचे /कॉलेजचे ओळखपत्र व वाहन परवाना सादर केल्यास त्यांना कोणत्याही प्रकारचे (मोफत) शुल्क आकारण्यात येवू नये.

**मा.शारदा बाबर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सदर उपसुचनेला अनुमोदन देते.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,पिंपरी चिंचवड मनपाला उत्पन्न मिळण्याच्या दृष्टीकोणातून पाऊल उचलले आहे. परंतू भविष्यात,ज्या-ज्या संस्थेला टेंडर देणार आहोत, त्या जागेच्या सुरक्षेचा विचार कोण करणार आहे? समजा एखादी गाडी चोरीला गेलीतर जबाबदार कोण असणार आहे? याविषयी धोरण आखणे गरजेचे आहे. कायद्यानुसार अशा मोठमोठ्या पूलांखाली पे ॲण्ड पार्कचे नियोजन करता येते का? मोठा धोका संभवू शकतो. हा विषय पूर्ण शहराचा विषय आहे. दिवसासुद्धा गाड्या रस्त्यावर असतात. अडथळा निर्माण होत असतो. ही पूर्ण पिंपरी चिंचवडमधील समस्या आहे. याविषयी आयुक्त साहेबांनी चांगला विचार करुन चांगले धोरण आखावे. जेणेकरुन आरक्षित जागा आरक्षित करत नसाल तिथे पार्किंगचे धोरण ठेवले. मॉलमधील पार्किंगमध्ये गाड्या जातील. मनपाला उत्पन्न मिळेल याचा कायदा विभागाला खुलासा करावा. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – पिंपरी चिंचवड शहर हे पार्कींगच्या समस्येने ग्रासले असुन गाड्यांना पार्कींगला जागा नसल्याने रस्ते गाड्यांच्या पार्किंगमुळे फिरणे देखिल मुश्कील झाले आहे. तरी पूर्ण शहरातील काही गरज नसलेले आरक्षण बदलून त्याठिकाणी पार्किंग मॉल जर बांधण्यात आलेतर पार्कींगचा विषय सुटेल तसेच मनपाला आर्थिक उत्पन्न देखिल होईल. त्यास मान्यता देणेत यावी.

**मा.राहूल जाधव –** मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी आपल्याला सांगू इच्छितो की, ज्यावेळी आपण आपल्या भागात डी.पी.च्या माध्यमातून मोठमोठे रोड करत असतो. त्या रोडवर नागरिकांच्या वाहनांसाठी जागा असाव्यात अशी सर्वांची इच्छा असते. परंतू आपल्याला विनंती करतो, माझ्या भागात कुदळवाडीमध्ये रोड केला आहे तो लोकांच्या वाहनांसाठी बनवला आहे का? २/३ लाईन लागलेल्या असतात. टेल्को चौक चार पदरी बनवला आहे. रोडला गाड्यांचे पूर्णपणे पार्किंग केले आहे. थरमॅक्स चौकात मोठा रोड असताना तिथे संध्याकाळी यायला जायला मुश्कील होते. ज्या-ज्या ठिकाणी रस्ते आहेत तिथे रस्त्याऐवजी गाड्या लावल्या आहेत. समस्या गंभीर आहे. त्यामध्ये लक्ष घालावे. आपल्या भागात आरक्षण असेलतर पे अण्ड पार्कच्या माध्यमातून करावे. रोडवर लोकांनी वाहतूक करण्याऐवजी दुकाने यांची सोय केली असे वाटते आहे. ट्रक व इतर वाहने लागली असतील तर ट्रॅव्हल गाड्या स्पाईन रोडवर अक्षरशः लागलेल्या असतात. तिथे जाता सुद्धा येत नाही. एका एका लाईनला १०/१२ गाड्या लागलेल्या असतात. रोड वाहतुकीसाठी केला का धंद्यासाठी केला का असे वाटते. यात आपण लक्ष घालावे.

**मा.प्रसाद शेटटी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महापालिकेच्या इमारतीसमोर, चिंचवड स्टेशनला बिगबझारसमोर ग्रेडसेपरेटर आहे. आपल्याला रोड क्रॉस करता येतो. माझी सूचना आहे, मनपासमोर ग्रेडसेपरेटर आहे. त्यावरील ओपन स्पेस आहे. त्यावर शेड टाकून पार्किंगसाठी सोय करावी. निगडीपासून कमर्शियल एरिया आहे, तिथला पार्किंगचा इश्यू नक्की सुटेल. बीआरटी चालू झाल्यानंतर पार्किंगचा खूप मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. या जागी स्लॅब टाकून पार्किंग करावी अशी सूचना करतो.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब मा.आयुक्त साहेब, पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील काही प्रमुख रस्त्यांवर फ्लायओव्हरखाली व वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे & पार्क योजना राबविणे आवश्यक आहे. मनपाच्या वतीने पे & पार्कचे शुल्काची दुरुस्ती खालीलप्रमाणे सुचविण्यात येत आहे.

१) रस्त्यावरील वाहनतळ

अ) दुचाकी वाहनांकरिता

पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.३/- ऐवजी र.रु.२/-

१ तासापुढील कालावधीसाठी – र.रु.४/- ऐवजी र.रु.३/- प्रति तास

ब) चारचाकी वाहनांकरीता

प्रत्येक तासाकरिता – र.रु. १०/- ऐवजी र.रु.५/-

२) मनपामार्फत तसेच विकास आराखडयातील तरतुदीनुसार विकसित केलेले वाहनतळ /फ्लायओव्हर खालील वाहनतळ

अ) दुचाकी वाहनांकरिता र.रु.२/-

पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.२ व १ तासापुढील कालावधीसाठी र.रु.३ प्रति तास फक्त, रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु.१५०/-

तसेच सकाळी ८ ते रात्री ९ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. १५०/-

ब) चारचाकी वाहनांकरिता -

प्रत्येक तासाकरिता र.रु.१०/-

रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. ४५०/-

तसेच दिवसा सकाळी ८ ते रात्री ९ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु.४५०/-

तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील काही प्रमुख रस्त्यांवर फ्लायओव्हरखाली व वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे & पार्क योजना राबविणे आवश्यक आहे. याकरिता पिं.चिं. मनपा हद्दीतील चिंचवड स्टेशन येथिल एम्पायर इस्टेट, रांका ज्वेलर्स समोरील मनपाच्या मोकळ्या जागेत पे & पार्क योजना राबविणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील काही प्रमुख रस्त्यांवर फ्लायओव्हरखाली व वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे & पार्क योजना राबविणे आवश्यक आहे. याकरिता पिं.चिं. मनपा हद्दीतील नाशिकफाटा उड्डाण पूलाखाली मराठा खानावळ, हॉटेल अशोकासमोर नाशिक रोडवर तसेच रेल्वे ते पवनानदी येथिल उड्डाण पुलाखाली मनपाच्या वतीने पे & पार्क योजना राबविणेस मान्यता देणेत यावी.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सदर उपसुचनेला अनुमोदन देतो.

**मा.कैलास कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, पे & पार्क योजना, ज्या जागा देणार आहोत, त्याचे नियोजन पालिका ठराव करुन करण्यात येणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापासून गोकुळ हॉटेलपर्यंत सगळा परिसर कमर्शियल बेल्ट आहे. आयटूआर, आयक्यूसी करताना जागा जो कोणी बिल्डर तिथे आला असेल, जागा पुरेशी नसल्यामुळे पे & पार्कचा प्रश्न माझ्या प्रभागांत मोठ्या प्रमाणात येतो आहे. प्रथम त्याठिकाणी आयटूआर करताना जागा असतील का नाही. सगळ्या गाड्या रोडवर य़ेतात. आंबेडकर चौकापासून माझी विनंती आहे की, त्याठिकाणी पाहणी, सर्वेक्षण करण्याबाबत निर्णय घ्यावा. आपण त्याठिकाणी दर दिलेले आहेत. पुणे महापालिकेच्या माध्यमातून दर ठरवले आहेत. पुणे महापालिकेची वेगळी हद्द पडते. पिंपरी चिंचवड महापालिका ही कामगार नगरी आहे. दर ठरविणेबाबतचा विषय सभागृहासमोर ठेवतोय. निश्चितपणे दुचाकी वाहनांना पहिल्या १ तासासाठी रु.१/-, पुढील प्रत्येक तासासाठी रु.२/-, व ५ तासांसाठी रु.१०/- असावेत. निश्चित केलेले वाहनतळांवर दुचाकीसाठी प्रति तास रु.१/-. दोन तासांसाठी रु.२/-, मासिक पास रु.१०/-, शालेय विद्यार्थ्यांसाठी मासिक पास रु.५०/- असावेत. पिंपरी चिंचवड महापालिका क वर्गात मोडते. पुणे महापालिका ब वर्गात मोडते. आपण त्यांच्याशी तुलना करु नये अशी विनंती आहे. निश्चितपणे य़ा जागेत इंडस्ट्रीयल बेल्ट आहे. आयटूआर करताना संबंधित बिल्डर यांनी केवळ फसवायच्या माध्यमातून बांधकाम केले. पार्किंगसाठी जागा सोडली का नाही याची तपासणी करावी. पार्किंग करणार आहोत. संबंधित बिल्डर किंवा दुकानदाराकडून व्यवस्था करण्यात यावी.

**मा.सुजाता पालांडे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, मा.आशा शेंडगे यांनी मांडलेली उपसूचना वगळता बाकी उपसुचना स्विकारल्या आहेत.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३४० विषय क्रमांक - २
दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. स्था/वाक/कावि/१२२/२०१३, दि.१०/७/२०११
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि. १७/०७/२०१३ ठ.क्र. २१ नुसार
३) मा.स्थायी समिती सभा क्र.६/८/२०१३ ठ.क्र.३८४०

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील काही प्रमुख रस्त्यांवर फ्लायओव्हरखाली व वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे & पार्क योजना राबविणे आवश्यक आहे. याकरीता पिं.चिं.मनपा हद्दीतील भोसरी फ्लायओव्हर,निगडी फ्लायओव्हर,चापेकर चौक फ्लायओव्हर,क्रोमा शोरुम शेजारील जागा या ठिकाणी पे & पार्क योजना राबविणेचे नियोजन आहे. याकामी पुणे मनपा कडील पे & पार्क च्या दरांचा अभ्यास केला असुन त्यांचेकडील दर पिं.चिं.मनपा क्षेत्रातही लागु केल्यास सुसूत्रता राहील असे वाटते. त्यानुसार पे & पार्क चे शुल्क (Telescoping Parking Charges) पुढीलप्रमाणे सुचविणेत येत आहे.

३) रस्त्यावरील वाहनतळ

आ)दुचाकी वाहनांकरिता -
पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.३/-
१ तासापुढील कालावधीसाठी – र.रु.४/- प्रति/तास

ब) चारचाकी वाहनांकरीता -
प्रत्येक तासाकरिता – र.रु. १०/-

४) मनपामार्फत तसेच विकास आराखडयातील तरतुदीनुसार विकसित केलेले वाहनतळ /फ्लायओव्हर खालील वाहनतळ

आ)दुचाकी वाहनांकरिता –
पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.२/-
१ तासापुढील कालावधीसाठी र.रु.३/-प्रति/तास

फक्त रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. १५०/-

ब) चारचाकी वाहनांकरिता -

प्रत्येक तासाकरिता – र.रु.१०/-

फक्त रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. ४५०/-

विद्यार्थ्यांसाठी मनपामार्फत देण्यात येत असलेल्या अन्य सवलतीचे धोरणांनुसार विद्यार्थ्यांना पार्किंग सवलत देऊन त्यांना त्यांचे शाळेचे/कॉलेजचे ओळखपत्र व वाहन परवाना सादर केल्यास त्यांना दरमहा र.रु.१००/- याप्रमाणे पार्किंग शुल्क आकारावे. तसेच सदर पे & पार्क योजनेअंतर्गत दूचाकी व चारचाकी वाहनांकरिता ३ वर्ष कालावधीसाठी ठेका देणेसंदर्भातील अटी व शर्ती प्रस्तावा सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे आहेत. सदरचे पे & पार्क योजनेच्या प्रस्तावित दरास मान्यता देणेकामी मा.आयुक्त यांचा प्रस्ताव असला तरी पिंपरी चिंचवड हद्दीतील प्रभाग क्रमांक ६२ दापोडी याठिकाणी असणा-या “रामभाऊ काटे” उड्डाणपुलाखाली दुचाकी व चारचाकी वाहनाकरिता पे †ण्ड पार्क योजना राबविणे अत्यावश्यक आहे. कारण त्याठिकाणी दर शनिवार/रविवार विनियार्ड चर्च याठिकाणी येणा-या लोकांची संख्या ५ ते ६ हजार असते व ते पुलावर देखील वाहने पार्क करतात. त्यादृष्टीने हे गरजेचे असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील काही प्रमुख रस्त्यांवर फ्लायओव्हरखाली व वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे & पार्क योजना राबविणे आवश्यक आहे. मनपाच्या वतीने पे & पार्कचे शुल्काची दुरुस्ती खालीलप्रमाणे सुचविण्यात येत आहे.

१) रस्त्यावरील वाहनतळ

आ)दुचाकी वाहनांकरिता

पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.३/- ऐवजी र.रु.२/-

१ तासापुढील कालावधीसाठी – र.रु.४/- ऐवजी र.रु.३/- प्रति तास

ब) चारचाकी वाहनांकरीता

प्रत्येक तासाकरिता – र.रु. १०/- ऐवजी र.रु.५/-

२) मनपामार्फत तसेच विकास आराखडयातील तरतुदीनुसार विकसित केलेले वाहनतळ /फ्लायओव्हर खालील वाहनतळ

आ)दुचाकी वाहनांकरिता र.रु.२/-

पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.२ व १ तासापुढील कालावधीसाठी र.रु.३ प्रति तास

फक्त, रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु.१५०/-

तसेच सकाळी ८ ते रात्री ९ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. १५०/-

ब) चारचाकी वाहनांकरिता -

प्रत्येक तासाकरिता र.रु.१०/-

रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. ४५०/-
तसेच दिवसा सकाळी ८ ते रात्री ९ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क
र.रु.४५०/-

तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील काही प्रमुख रस्त्यांवर फ्लायओव्हरखाली व वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे & पार्क योजना राबविणे आवश्यक आहे. याकरिता पिं.चिं. मनपा हद्दीतील चिंचवड स्टेशन येथिल एम्पायर इस्टेट, रांका ज्वेलर्स समोरील मनपाच्या मोकळ्या जागेत पे & पार्क योजना राबविणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील काही प्रमुख रस्त्यांवर फ्लायओव्हरखाली व वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे & पार्क योजना राबविणे आवश्यक आहे. याकरिता पिं.चिं. मनपा हद्दीतील नाशिकफाटा उड्डाण पूलाखाली मराठा खानावळ, हॉटेल अशोकासमोर नाशिक रोडवर तसेच रेल्वे ते पवनानदी येथिल उड्डाण पुलाखाली मनपाच्या वतीने पे & पार्क योजना राबविणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहर हे पार्कीगच्या समस्येने ग्रासले असुन गाड्यांना पार्कीगला जागा नसल्याने रस्ते गाड्यांच्या पार्किंगमुळे फिरणे देखिल मुश्कील झाले आहे. तरी पूर्ण शहरातील काही गरज नसलेले आरक्षण बदलून त्याठिकाणी पार्किंग मॉल जर बांधण्यात आलेतर पार्कीगचा विषय सुटेल तसेच मनपाला आर्थिक उत्पन्न देखिल होईल. त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच निगडी फ्लायओव्हर खालील Tours & Travels चे offices आहेत. ते तसेच ठेऊन इतर उपलब्ध जागेवर पे & पार्क योजनेचा अंमल करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव उपसुचनेसह सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३४१ विषय क्रमांक - ३
दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.प्रशा/१/कावि/५०३/२०१३, दि.२२/४/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.२० दि.१९/७/२०१३

श्री.जुंधारे ज्ञानदेव रामचंद्र, उपअभियंता, स्थापत्य यांना पे बँड र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये कार्यकारी अभियंता, स्थापत्य या पदावर पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.स्वाती साने** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३४२ विषय क्रमांक - ४

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.मसाभां/भांडार/१/कावि/१५२/२०१३, दि.११/६/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.२१ दि.१९/७/२०१३

मनपाचे रुग्णालयातील हायपोसोल्युशन/निकामी भंगार साहित्याची अंदाजे किंमत रक्कम रुपये ७,१६,०७६/- इतकी येत आहे. ही किंमत र.रु.५००/- पेक्षा जास्त असल्याने त्या साहित्याची विक्री करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.नंदा ताकवणे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.स्था/काअ/५००/२०१३, दि.२/०७/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र. २९ दि. २/०८/२०१३

मनपाचे सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विशेष योजना पानांक २९ अ.क्र.१०३ देहू आळंदी रस्ता साखळी क्र. ८/२५० कि.मी. ते १५/२५० कि.मी. ३० मी. डी.पी. प्रमाणे उर्वरित कामे करणे या कामासाठी र.रु.१० कोटी तरतूद केली असल्याने त्या तरतूदीमधून सदर कामासाठी र.रु.९,६३,८०,०००/- (अक्षरी र.रु.नऊ कोटी त्रेसष्ट लाख ऐंशी हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - प्राधिकरण, सेक्टर २६ मध्ये नाट्यगृह व कलादालन याकरिता सुमारे ८००३.३० चौ.मीटर क्षेत्र आरक्षित असून सदर जागेवर नाट्यगृह व कलादालन उभारणेचे नियोजित असून, त्यासाठी मे.पी.के.दास † न्ड असो. यांची नेमणुक करण्यात आली आहे. प्राधिकरण, निगडी व आकुर्डी परिसरातील नागरिकांकरिता एक उत्तम मनोरंजनाची सोय होणार असून त्यासाठी सुमारे ३१ कोटी रुपये एवढा खर्च येणार आहे. तरी प्राधिकरण, सेक्टर २६ मध्ये नाट्यगृह व कलादालन इमारत उभारणेकरिता आवश्यक रक्कम रुपये ३१ कोटींच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. प्रभाग क्र.९ मधील रस्ता तयार करणे, सुभोभिकरण करणेसाठी येणा-या १० कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - एस-१ संप से.क्र.१० पर्यंत एम.एस.गुरुत्वनलिका पुरविणे, उतरविणे, अंथरणे, जोडणी करणे, चाचणी देणे व कार्यान्वित करणे आणि एस-२ संप जवळ १ द.ल.लि. क्षमतेच्या व से.क्र. १० येथे ३ द.ल.लि. क्षमतेच्या संप व पंप घराचे संकल्पन करणे, चाचणी देणे, कार्यान्वित करणेचे कामाची निविदा रक्कम रुपये २०,३६,९८,३९३/- इतकी असून निविदा दर ११.२६% कमी आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. वि.प्रा/

अभि.अ/उवि/क्र/३कू.उ.पु./२४०/१३ दि.२५/४/२०१३ रोजी सध्या कार्यान्वित नसलेली १२०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी स्थलांतरीत करुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यास अनुसरुन मा.आयुक्त यांचे दालनात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचे समवेत दि.२२/५/२०१३ रोजी आढावा बैठक झाली. सदर बैठकीत स्पाईन रस्त्यावर कुदळवाडी चौकात नियोजित उड्डाणपूल बांधणेचे कामात अडथळा ठरणारी वरील कामाअंतर्गत टाकणेत आलेली १२०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी म.न.पा.ने सदर कामाचे ठेकेदार यांचेकडून स्थलांतरीत करणेचे व त्यासाठी येणारा खर्च पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी म.न.पा.स देण्याचे मान्य केलेले आहे. त्यानुसार स्पाईन रस्त्यामधील कुदळवाडी चौकामध्ये उड्डाणपूल बांधण्याच्या कामात अडथळा ठरणारी १२०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी स्थलांतरीत करणेसाठी नव्याने करावी लागणा-या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ९३,००,०००/- इतकी येत आहे. सदर कामास व त्याच्या खर्चास प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. तरी सदर स्थलांतरीत करणेचे काम वरील कामाअंतर्गत करणेस व त्याच्या खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा.पौर्णिमा सोनवणे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.सदगुरु कदम** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - जलक्षेत्र क्र.बी/१० खराळवाडी व गांधीनगर भागातील पाणीपुरवठा २० लाख लि. क्षमतेचे उंच टाकी बांधणे व टाकी भरणेसाठी ४०० मी.मी. व्यासाची पाईप लाईन टाकणे. म.न.पा. अंदाजपत्रक सन २०१३-१४ मधील पान क्र. ६९३ अ.क्र.१२, अंदाजपत्रकीय रक्कम रु.२०,००,०००/- वरील कामाचे नावामध्ये व अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये दुरुस्ती करुन "जलक्षेत्र क्र.बी/१० खराळवाडी व गांधीनगर भागातील पाणीपुरवठा २० लाख लि. क्षमतेचे उंच टाकी बांधणे व टाकी भरणेसाठी ६०० मी.मी. व्यासाची एम.एस. पाईपलाईन टाकणेस" प्रशासकीय मान्यता देणेत यावी. अंदाजपत्रकीय रक्कम रु. ९,५०,००,०००/-.

**मा.गणेश लोंढे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.विलास नांदगुडे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, या विषयाला माझा विरोध नाही. आम्ही इथे विकास कामांना विरोध करत नाही. परंतू विषयाच्या निमित्ताने आयुक्त साहेबांचे लक्ष वेधू इच्छितो की, मिलिटरी यांच्याकडे पैसे भरायचे. पण तिथले ट्रॅफिक पाहिले तर संध्याकाळी ६.०० पासून रात्री १०.०० वा. पर्यंत या परिसरात जाता येत नाही. मी वारंवार मागणी करतो त्यावेळी सांगतात आमच्याकडे फंड उपलब्ध नाही. यात जातीने लक्ष घाला. ताबडतोब मिलिटरीकडे पैसे भरा तरच त्या भागाचा प्रश्न सुटणार आहे एवढीच विनंती करतो.

**मा.राहुल जाधव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज हा विषय आहे. मी खुलासा मागतो की, या रस्त्यासाठी भूसंपादन केलेले आहे. शेलारवस्तीवरुन चिखली, मोशीच्या शिवेपर्यंत ज्या-ज्या लोकांची घरे गेली. त्याबदल्यात त्या लोकांना आपण काही मोबदला दिला आहे का? त्याठिकाणी ब-याचशा लोकांना मोबदला मिळालेला नाही. रोकडे वस्तीपासून चिखली चौकापर्यंत ते व्यवसाय करत होते. आज त्यांची घरे रस्त्यात गेल्यामुळे ते बेघर झाले आहेत. उदरनिर्वाहासाठी झगडत आहेत. त्यांना काहीच मोबदला मिळालेला नाही. समाविष्ट गावामध्ये ज्या पद्धतीने देहूआळंदी रोड केला आहे. त्याच पद्धतीने विकास आराखड्यानुसार डी.पी. रस्ता टाकलेला आहे. ३० ते ४० पत्र दिलेली आहेत. तरी काहीही कारवाई झालेली नाही. टीडीआर मधून जागा घेतल्या होत्या. पालिकेकडे जागा हस्तांतर केलेली नाही. त्यामुळे रस्ता करण्यासाठी जागा मिळत नाही. रक्कम न भरल्यामुळे पालिकेकडे जागा हस्तांतर झालेली नाही. बीआरटीसाठी काय नियम लावू शकता. रक्कम मुदतीत भरली तर जागा ताब्यात येईल. लवकरात लवकर रोड करु शकतो. आमदार मा.विलास लांडे जाधववाडीत, कुदळेवाडीत आले होते. त्यांनी गल्लीबोळांतील रस्ते पाहिले आहेत. एवढा खुलासा करुन डि.पी रस्ता लवकरात लवकर कसा विकसित होईल यासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,खरेतर या विषयीच्या ११ सभा बोलवल्या होत्या. भूसंपादनाचा विषय निघाला. आपण खुलासा मागविला आहे. याविषयी आपण बोलतो ते विषय महापालिकेत मंजूर झाले आहेत. असे किती विषय आतापर्यंत संबंधित कार्यालयाकडे, जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रलंबित आहेत याबददल खुलासा मिळावा. भूसंपादनाचा कालावधी किती आहे. बाधित भूखंडधारकांना मोबदला मिळाला तो किती आहे, त्याचा कालावधी किती आहे याचा खुलासा मिळावा. रेडझोनमधील आरक्षित भागांचे भूसंपादन करुन त्यांना मोबदला देणार का नागरिक स्वतःहून जागा देणार असतील तर डि.पी. रस्ता सोडून, उद्यानासाठी जागा देणार असतील तर अशी आरक्षणे ताब्यात घेणार का याचा खुलासा करावा.

**मा.धनंजय आल्हाट**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, बीआरटी देहू-आळंदी रस्त्यासंदर्भात विषय आहे. बीआरटी रस्ता ३१ मीटर आहे. त्या रस्त्यासाठी २०१३ पर्यंत मुदत आहे. याची घोषणा करण्यासाठी ३ टप्पे केले आहेत. जाधववाडी, डुडूळवाडी पूर्वीच्या रस्त्याचे कि.मी. क्षेत्राखाली आहे. आत्ता विकास करत असताना क्षेत्र वेगळे होते. पूर्वीच्या त्या निविदेत २४ मी. रस्ता ग्राह्य धरला आहे. वाढीव कि.मी. नंतर होते. त्या संदर्भातील जी काही निविदा आहे, त्याठिकाणी आपण रितसर पद्धतीने जोडून वेगळे का केलेले आहे. आपण त्याठिकाणी प्रशासकीय मान्यता घेतोय. रु.९ कोटी ६३ लाखांची प्रशासकीय मान्यता घेतोय. पूर्वीच्या

निविदेत त्याचा सहभाग का केलेला नाही. निश्चित त्यात निविदा काढत असताना संबधित अधिका-यांकडून चूका झालेल्या आहेत का? बीआरटीचा समावेश का केलेला नाही? पूर्वीचे अंतर कमी होते का, आत्ता वाढले आहे. भोसरी संदर्भात डुडुळगावातले पूर्वीचे अंतर आत्ता वाढल्यानंतर त्यांच्या कामासंदर्भातील निविदा काढली आहे. सप्टेंबर अखेरपर्यंत काम संपते आहे. प्रशासकीय मान्यता दयावयाची ठरली तरी सप्टेंबर पर्यंत काम संपते आहे. ही गल्लत अधिका-यांकडून झाली नाही का? म्हणून अशा पद्धतीने वेगळी प्रशासकीय मान्यता घ्यावी लागते आहे का? पूर्वीची निविदा काय होती? यात किती अंतर होते? आत्ता किती वाढले आहे? याचा पूर्ण ताबा झालेला आहे का? डुडुळ गावापर्यंत अंतर आहे ते किती कि.मी. आहे? अंतर किती थांबले आहे याचा नेमका खुलासा संबंधित अधिका-यांनी करावा अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.महापौर** – संबंधित अधिका-यांनी खुलासा करावा.

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना)** - मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, देहू-आळंदी रोडचे † क्विझिशन झालेले आहे. अवार्ड डिक्लेअर झालेले आहे. कुदळवाडीचा रोड तिथे प्राधिकरण व पीसीएमसी या एरियातील प्रॉपर्टीचा इश्यू आहे, तो सॉल्व्ह झालातर ते सुद्धा फायनल होईल. लॅण्ड † क्विझिशनसाठी किती कालावधी लागतो. पीसीएमसीत लॅण्ड † क्विझिशन एमआरटीपी † क्ट अंतर्गत करतो. एमआरटीपी † क्टच्या कलम १२७ मध्ये कालावधी नमूद नाही की किती वर्षांत केले पाहिजे. साधारणतः ३ वर्षांत पूर्ण अवार्ड प्रोसेस लागू होऊ शकेल.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, यात आल्हाटवाडीचे बरेचसे क्षेत्र † क्विझिशन करायचे राहिले आहे. तिथे बरेचसे भूसंपादन राहीले आहे. दुसरा प्रश्न स्थापत्य संदर्भात आहे. याचे वेगळे काम का काढले आहे, समाविष्ट का केले नाही? याठिकाणी अचूक पध्दतीने विश्लेषण करावे.

**मा.विनया तापकीर –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता भदाणे मॅडम यांनी खुलासा दिला. एमआरटीपी † क्टच्या कलम १२६ प्रमाणे भूसंपादन करतो. अर्जन्सी क्लॉज काय असतो याचा खुलासा करावा.

**मा.किरण मोटे -**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझा या विषयाला विरोध नाही. मागिल वर्षी सभागृहात ताथवडे गावठाणाबाबत जे स्टेटमेंट दिले होते, खुलासा केला होता. एक वर्ष उलटून गेले आहे. गावठाणातला रस्ता आहे. माझा प्रभाग क्षेत्रफळाच्याबाबत सर्वात मोठा प्रभाग आहे. माझ्या प्रभागात लोकसंख्येची घनता सर्वांत जास्त आहे. आपण मोठमोठे

प्रोजेक्ट करतो. परंतू प्रामुख्याने सांगायचे आहे की, एक वर्ष उलटून गेल्यानंतर या विषयावर बोलतोय. शहराचा विकास सर्व थरांतून झालातर इथे बोलण्यात अर्थ आहे. प्राथमिक स्वच्छतेबाबत, रस्ता देऊ शकत नसाल तर, नागरीकांच्या भीषण समस्या सोडवू शकत नसाल तर महापालिकेत नगरसेवक म्हणून काम करायला काय अर्थ आहे? माझ्यासारख्या ब-याच नगरसेवकांना प्रश्न भेडसावत आहेत. रस्त्यांवरुन मागील सभेच्या वेळी बरेच नगरसेवक बोलले होते. यात सुद्धा कृपया लक्ष घालावे. महिलांसाठी दोन हजारपेक्षा जास्त टॉयलेट उभारणार आहोत. अंतर्गत रस्ते, डिपी रस्ते करण्याचा विचार करावा. माझ्या प्रभागात ग्रामिण भागापेक्षा अतिशय वाईट परिस्थिती आहे. यात लवकरात लवकर कासारवाडीचा रस्ता विकसित करावा.

**मा.राजन पाटील (सह शहर अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, देहू-मोशी-आळंदी डीपी रस्त्याचे १०४ कोटींचे काम केले आहे. डिपी रस्ता २४ मी. असलातरी तत्कालिन आयुक्तांनी या रस्त्याची फायनल कंडीशन बघून १०० कोटींमध्ये काम करा असे सांगितले होते. म्हणून २४ मी. रस्त्याचे काम करायला घेतले होते. परंतू रस्ता विकसित करता येत नाही. आधी हा रस्ता नव्हता. तो नवीन अलाईनमेंटमध्ये घालणे आवश्यक आहे.

**मा.राहूल जाधव-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आम्हाला भदाणे मॅडमने खुलासा करुन सांगावे. प्राधिकरणाचा खुलासा केला. कुदळवाडी रस्ता आहे तिथे प्राधिकरणाचा काय संबंध येतो.

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना)-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,कुदळवाडीचा रस्ता आहे. त्याचा पोर्शन आपल्या इथून जातो. तो देहू-आळंदी रस्त्याला मिळतो. त्याचा अर्धा पार्ट प्राधिकरणात आलेला दिसतो. लॅण्ड † क्विझिशन बरोबर झालेतरी याबाबत काय निर्णय घ्यायचा आहे?

**मा.राहूल जाधव-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, १२ जणांची कोर्टकेस चालू आहे. तिथे रोड झालेला आहे. तुम्ही म्हणताय तो रोड महापालिकेच्या हद्दीत आहे. हायकोर्ट केस चालू आहे. आजपर्यंत समाविष्ट गावांत महापालिकेने किती डीपी रोड ताब्यात घेतले आहेत?

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना)-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, चिखली गावाची पूर्ण माहिती घेऊन माहिती देता येईल.

**मा.राहूल जाधव-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,डिपी रोड करण्यासाठी किती वर्षे लागतात? आमचे गाव महापालिकेत समाविष्ट होऊन १६ वर्षे झाली. एकसुद्धा रोड का करता

आला नाही? माझ्या प्रभागांत ४३ आरक्षणे आहेत. शाळेमध्ये मुलांना बसायला जागा नाही. ही सुद्धा आरक्षणे पूर्णपणे ताब्यात घेता आली नाहीत. ४० गुंठयातली २० गुंठे जागा ताब्यात आली आहे. शाळेची जागा ताब्यात आली असली तरी शाळेत जायला जागा नाही. डिपी रस्ते लवकरात लवकर ताब्यात घेऊन विकसित करावेत ही विनंती आहे.

**मा.दत्ता साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर मा.राहुल जाधव यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याचे भदाणे मॅडम यांनी चुकीचे उत्तर दिले आहे. जो विषय दिला आहे तो प्राधिकरणाचा रोड पूर्ण झालेला आहे. पूर्वी मा.अजितदादा पवार तिथे आले होते. इलिगेशन होते. रस्ता पूर्ण केला असताना फक्त १००/१५० मूळ शेतक-यांकडून जागा घेतली होती. ही माणसे कोर्टात गेली म्हणून रोड थांबवतोय असे उत्तर देणे चुकीचे वाटते आहे. जे लोक कोर्टात गेले त्यांच्याबरोबर मिटींग घेऊन त्याचा पाठपुरावा करत नाही का? कुदळवाडीपासून देहू-आळंदी रस्त्याचा विषय आहे. त्या माणसाचे काही आरक्षण नाही. भंगारवाल्यांनी कचरा टाकला आहे. एमइसीबीचा ट्रान्सफॉर्मर टाकला आहे. यूपीचा मनुष्य आहे. तो आपल्याला चांगल्या कामाला विरोध करत असाल तर आपले लिगल ॲडव्हायजर काय करतात? याला कोणी काढू शकत नाही काय? फक्त शंभर ते दीडशे फूट रस्ता करायचा राहीला आहे. तेवढ्यासाठी या रस्त्याची वाहतूक थांबली आहे. रस्ता लोकांसाठी, वाहतुकीसाठी केला आहे. भंगारवाल्यांसाठी, गाड्या लावण्यासाठी रस्ता केला आहे का? संध्याकाळी ५.३० वा. पर्यंत एका वेळेला २०० गाड्या लागलेल्या असतात. माझी आपल्याला विनंती आहे की, हा रस्ता फ्री करा. लिगल ॲडव्हायजर यांना विचारा. देहू-आळंदी रोडमध्ये जी घरे केली आहेत ती मागासवर्गीयांची घरे आहेत. ती पूर्ण उद्धवस्त झाली आहेत. त्यांना किती मोबदला दिला आहे? पैशांच्या रुपाने किंवा टिडीआरच्या रुपाने तुम्ही त्यांना मोबदला दिला आहे का? याची माहिती भदाणे मॅडम यांना देता आली नाही. त्यांनी या जागेवर कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. कुदळवाडी, चिखली, देहू-आळंदी भागातील लोकांकडून जागा घेतलेली आहे. त्याचा त्यांना मोबदला द्यावा किंवा घरकुल योजनेतून त्यांना घरे द्यावीत. यावर निर्णय घ्यावा. या लोकांच्या चार पिढ्या त्या घरात गेल्या आहेत. त्यांनी पूर्ण आयुष्य तिथे काढले आहे. त्यांनी आपल्याला रस्त्यासाठी जागा दिली होती, त्याचा एक रुपयासुद्धा तुम्ही त्यांना दिलेला नाही. गोरगरीबांना कोणी न्याय देत नाही. त्याप्रमाणेच जे शेतकरी आहेत त्यांना सुद्धा मोबदला दिला गेलेला नाही. वेगळा रस्ता दिला मग मोबदला द्यायचा नाही का? तिथे अजून डांबर सुद्धा पडलेले नाही. त्यांना कोणी मोबदला देत नाही. लोकांनी प्रेमाने त्यांची जागा दिली म्हणजे त्यांना काहीच द्यायचे नाही का? ज्यांची घरे पाडलीत, त्यांना ५/६ वर्षांपासून प्रॉपर्टी टॅक्सच्या पावत्या दिल्या आहेत. असा भोंगळ कारभार चालला आहे. यात लक्ष घालणे गरजेचे आहे. या लोकांना मोबदला देण्यात यावा. जे कोणी गोरगरीब, शेतकरी

असतील, तिथल्या मागासवर्गीयांची खूप पूर्वीची घरे आहेत. त्यांना मोबदला देण्यात यावा. गेल्या मिटींगमध्ये मी बोललो होतो. आपण २ दिवसांत नोटीस पाठवतो असे सांगितले होते. आम्ही हॉस्पीटल करा म्हणून ओरडत आहोत. आज दुसरी मिटींग आली तरी अजून नोटीस आलेली नाही. त्यांनी कसलीही पूर्व परवानगी दिलेली नाही. जेवढी जेवढी आरक्षणे आहेत, तो डीपी रोड ताब्यात घेऊन त्याचे मार्किंग करा. आम्ही ओरडून दमलो आहोत. नाहीतर वेगळ्या माध्यमातून काहीतरी करावे लागेल अशी मागणी आहे. दर मिटींगला आम्ही म्हणतोय, डिमार्केशन करा, खडीमुरुमाचा रस्ता करा. शेतक-याने चुकून जागा विकली, एखाद्या माणसाने तिथे घराचे बांधकाम केलेतर काय करणार? सगळ्या जागांचे अवार्ड झालेतरी ज्यांनी मोबदला मागितला आहे त्यांना तो का मिळू शकत नाही? कोणत्याही भागात च-होली, चिखली, मोशी, किवळे इथे १६ वर्षांत एकही डीपी रस्ता करु शकलो नाही यापेक्षा निंदनीय बाब काय? आमच्या शब्दाला दाद द्यायची नसेलतर आम्ही ओरडून उपयोग काय? आम्हाला वेगळ्या पद्धतीने करावे लागेल. किती लोकांना मोबदला दिला, किती लोकांचा मोबदला घ्यायचा बाकी आहे याची माहिती द्यावी.

**मा.विनया तापकिर-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, मी मघाशी विचारले होते, अर्जन्सी क्लॉज काय असतो? भूसंपादनाच्या विषयाच्या अनुषंगाने विचारते आहे. वस्तीमध्ये जाण्यासाठी रस्ता नाही. नागरीकांचा प्राकृतिक स्त्रोत, जलस्त्रोत बुजवले आहेत. त्यांना मोबदला दिलेला नाही. महापालिकेच्या नियमांत तरतूद आहे का? विहीरी बुजवल्या आहेत. त्याचा मोबदला नागरिकांना मिळाला का, याची तरतूद आहे का? मा.राहूल जाधव म्हणाले ते खरेच आहे. १७ वर्षे पालिकेत समाविष्ट होऊनही कोणताही डीपी रोड विकसित नाही. याकडे खरेच लक्ष द्या. शहरी भागापेक्षा ग्रामिण भाग मॉडेल वॉर्ड म्हणून विकसित करा. आम्हाला यायला-जायला रस्ता नाही, प्यायला पाणी नाही. कोणतीही आरक्षणे विकसित नाहीत. भूसंपादन प्रक्रियेला किती वर्षे लागतात? ते ३ वर्षे म्हणतात मग आज १७ वर्षे का लागली? भूसंपादनाबाबत भदाणे मॅडम यांनी खुलासा द्यावा. तुम्ही मुलभूत सुविधा देऊ शकत नसाल तर आमच्या लोकांकडून टॅक्स सुद्धा घेऊ नका.त्यांना टॅक्स माफ करा. आम्ही काय करायचे?

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना)-** मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, सर्वप्रथम मा.दत्ता साने, मा.राहूल जाधव यांनी जे प्रश्न विचारले आहेत, त्याचे क्लॅरिफिकेशन देते. कुदळवाडी रस्त्यातील ५/६ घरे प्राधिकरणात येतात, आपल्याकडे येत नाहीत हे मी क्लिअर केले आहे. त्यांना कशाप्रकारे मोबदला द्यायचा. उर्वरीत अवार्ड त्याच्याशी स्टकअप झाले आहे, ते क्लिअर होईल. देहू-आळंदी रोड गावाकडून वळवला. त्याला मंजूरी आली आहे. ब-याच लोकांना अवॉर्ड डिक्लेअर झाल्यानंतर मोबदला मिळाला आहे. टीडीआरची सर्वंकष माहिती नंतर देते. मा.विनया तापकीर यांचा प्रश्न आहे, ग्रामिण भागातील रस्ते कधी डेव्हलप

करणार? पिंपरी चिंचवडमध्ये २००० मध्ये नवीन १७ गावे समाविष्ट झाली. २००९मध्ये जो डिपी मंजूर झाला २००९ पासून २०१३ म्हणजे ४/५ वर्षे झाली. आरक्षणे डेव्हलप करण्यासाठी आरक्षणांच्या जागा ताब्यात घेऊन पूर्ण डिपार्टमेंटचे याच्यासाठी कोऑर्डिनेशन करु. या महिन्यात तसा प्रोग्राम डिक्लेअर करु. MRTP Act च्या कलमानुसार डीपी मंजूर आहे. त्याप्रमाणे MRTP Act च्या प्रोव्हिजन्स लागू आहेत. या आरक्षणांत डीपी रोड आहे. आपल्याला MRTP Act अंतर्गत भूसंपादन करावे लागते. काही ठिकाणी इमर्जन्सी क्लॉज असतो. जिथे ताबा घेण्यात अडचणी असतात तिथे इमर्जन्सी क्लॉज लागतो. कुठेही लागत नाही. कलेक्टर व कमिशनर यांना विचारुन सेक्शन १७ लावला जातो. हॅजरडस काही असेल तर त्याचे सुद्धा नियम आहेत. सेक्शन १७ लावून भूसंपादन केले जाते. याचे नियम कलम २६ खाली दिले आहेत. याच नियमांखाली भूसंपादन करतो. या विषयावर सभागृहात बोलत असताना याबाबतीत तरतूदी आहेत. क्लॉज १५ मध्ये ४ गोष्टींसाठी भूसंपादन होऊ शकते. पहिले एफ.एस.आय. देणे, दुसरे टी.डी.आर. देणे, तिसरे खाजगी वाटाघाटीने, यामध्ये दोन्ही पार्टी किंवा कमिशनर यांच्याकडे त्याचे अधिकार आहेत. MRTP Act च्या कलम १५२ मध्ये आयुक्तांच्या पॉवर्स नमूद आहेत. मा.महापालिका सभेच्या पॉवर्स आहेत. कमिशनर यांच्याशी संबधित ज्या पॉवर्स आहेत, त्या अनुषंगाने खाजगी वाटाघाटी करतो. जिथे वाटाघाटीमधून जागा मिळणे शक्य नाही. तिथे भूसंपादन कायद्याचे कलम वापरतो. एकूण ११५० आरक्षणे आहेत. ४०० कि.मी. चे डिपी रोड आहेत. यांचे भूसंपादन करण्यासाठी दरवर्षी रु.२,०००० कोटींपेक्षा जास्त तरतूद लागेल. असलेली तरतूद, नगरसेवकांची मागणी, याची सांगड घालून डेव्हलपमेंटची कामे करत असतो. विहीरींबाबतचा प्रश्न लॅण्ड अक्विझिशन ऑफीसर यांच्याशी रिलेटेड आहे. लॅण्ड अक्विझिशन ऑफीसर कलेक्टर यांच्या अखत्यारित काम करतात. ४ जणांची टीम नेमली आहे. आपण फक्त पैसे देतो. नगररचना विभाग फक्त माहिती देण्याचे काम करतो. टीडीआरची माहिती द्यायची असते. इथपर्यंत नगररचना विभागाचा रोल आहे. आम्ही आमचा रोल पूर्ण करतो. कोऑर्डिनेशन करतो. हा विभाग भूसंपादनासाठी संपूर्णपणे जबाबदार नाही.

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, विशालनगर रस्त्याबाबत खुलासा दयावा.

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना) -** मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, पिंपळे सौदागर, विशालनगरचा रस्ता, डेअरी फार्मवरुन पिंपळे गुरवला जाणारा रस्ता, औंध, पुणे डिफेन्सचा रस्ता आहे. याबाबतीत संरक्षण विभागाशी पत्रव्यवहार झाला आहे. रस्त्याच्या जागेचे पैसे देण्याचे कबूल केलेले आहे. त्यांची डिमांड आहे, एश्यूरन्स आहे. टेक्निकल इश्यू आहे. तो इश्यू क्लिअर केलेला आहे. त्याची वर्क ऑर्डर मिळून जाईल.

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हिंजवडी आय.टी. पार्क इथे खूप गर्दी आहे. तो लवकरात लवकर ताब्यात घ्यावा.

**मा.अनिता तापकिर-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, काळेवाडी फाटा जयहिंद शाळा इथे रस्ता वाहतुकीला खुला केलेला नाही. रस्ता झालेला आहे. सिग्नलबददल सुद्धा बोलले आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, रेड झोनमध्ये आरक्षणे ताब्यात घेता येतात का? याचे उत्तर दिले नाही. माझ्या वॉर्डात एक सुद्धा उद्यान नाही. माझ्या वॉर्डात एक उद्यान व्हावे अशी आमची इच्छा आहे. रेडझोनमध्ये झोपडीधारकांना घरे दिली आहेत मग उद्यान का होऊ शकत नाही? सर्व डीपी रस्त्यांची आरक्षणे मा.महापालिका सभेमध्ये मंजूर करुन घेऊन सादर करावीत. जेणेकरुन आमचा कार्यकाल संपल्यानंतर आम्ही काही केले नाही असे बोलायची संधी पुढच्यांवर येऊ नये. MRTP Act खाली करता येत नाही असे सांगितले. पण रस्त्यांची गरज लक्षात घेता महापालिका सभेत असा प्रस्ताव पाठवून तो ताबडतोब मंजूर करुन घ्यावा. ग्रामिण भागाचा विचार केला तर आरक्षणाचे भूखंड ताब्यात देणे गरजेचे आहे. जिथे आरक्षणे ओपन होती, तिथे आपल्याला टेंशन नाही. ग्रामिण भागाची परिस्थिती किचकट आहे. त्यासाठी आत्ताच तयारी करावी अशी माझी इच्छा आहे.

**मा.राहूल जाधव-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवडच्या समाविष्ट गावांमध्ये आरक्षणे ताबा घेण्यासाठी किती करोडो रुपये खर्च झाले आहेत?

**मा.धनंजय आल्हाट -**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, बीआरटी संदर्भात विषय निघाला. नवीन गावांचे नगरसेवक यांचे आक्रमण झालेले दिसते. प्रत्येकाचा कोंडमारा उफाळून आलेला दिसतोय. मला सूचना करायची आहे की, खरेतर त्यांनी पुरेपूर सेवा द्यायला पाहिजे. ग्रामिण भागातील नवीन नगरसेवकांच्या विकास कामांचा विषय आला आहे. आयुक्तांचे मार्गदर्शन घेतले जाते. सेवा दिली जात नाही. दुय्यम वागणूक दिली जाते. अशी भावना झाली आहे. म्हणून हे आक्रमण झाले आहे. भूसंपादनाबाबत गोंधळ चालला आहे. वस्तुस्थिती आपल्या डोळ्यापुढे आहे. त्यावर उपाययोजना केली नाही. आत्ता मा.सुरेश म्हेत्रे यांनी सांगितल्याप्रमाणे पुढील नगरसेवक आम्हाला दोष देणार आहेत. मला वाटते, आपल्या नेतृत्वाखाली नियोजन मिटींग बोलवावी. त्यात भूसंपादन, विकास कामांसंदर्भात आमच्या नवीन गावांतील नगरसेवकांना बोलवावे. ज्या नगरसेवकांना बोलवले, त्यांची प्रायोरीटी लिस्ट त्याठिकाणी घेतली. त्यापुढे काय झाले आम्हाला माहित नाही. स्वतंत्र नियोजन बैठकीत असंख्य गोष्टींचा ऊहापोह होईल. जेणेकरुन आम्हाला काहीतरी करता येईल. नवीन कामांबाबत नगरसेवकांमध्ये स्वतंत्र भावना निर्माण झाली आहे. आपले कुठेतरी नेतृत्व असावे.

**मा.किरण मोटे -** मा.महापौर साहेब**,** मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये कासारवाडी येथे मनपामार्फत मैलापाणी शुद्धीकरणासाठी टप्पा क्र. १,२ व ३ असे एकुण तीन Sewage Treatment Plant आहेत. सदर प्लॅन्टमध्ये सद्यस्थितीत सर्वसाधारण ७४ ते ८० एम.एल.डी. मैलापाण्यावर प्रक्रिया केली जाते. सद्यस्थितीत प्रक्रियायुक्त पाण्याचा पुर्नवापर काही प्रमाणात मनपाचे उद्यानासाठी करणेत येतो व उर्वरित पाणी नदीपात्रामध्ये सोडणेत येते. CME येथे कासारवाडी STP पासून पंपिंगद्वारे पाणी पुरविणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामाची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम रु.२,४७,४८,२११/- इतकी येत असलेबाबत, त्यांना यापूर्वी कळविलेले आहे. त्यानंतर त्यांनी दिनांक २५/०७/२०१३ रोजीचे पत्रानुसार सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम मनपाकडे डिपॉझीट म्हणून जमा करणेची तसेच या रक्कमेतून काम पूर्ण झालेनंतर देखभाल, दुरुस्तीकामी प्रति महिना आवश्यक ती रक्कम देणेची संमती दर्शविलेली आहे. तसेच सदरचे काम त्यांनी त्वरीत पूर्ण करुन देणेबाबत कळविलेले आहे. परंतु सदर कामासाठी CME यांचेकडून सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकानंतर (म्हणजे २५ जुलै २०१३ रोजी) पत्र मिळाले असून या विभागामार्फत सदर कामाचे खर्चासाठीची तरतुद या वर्षाच्या मनपाच्या अंदाजपत्रकामध्ये करणेत आलेली नाही. परंतु सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम CME कडून मनपाकडे जमा होणार असलेने त्या रक्कमेतून सदर काम मनपामार्फत करुन घेणेस येणारे अंदाजे सुमारे र.रु.२,४८,००,०००/- चे रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.महेशदादा लांडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, भदाणे मॅडम यांनी ४ रस्त्यांबाबत नमूद केले आहे. डिफेन्सकडून हे चार रस्ते मागितले आहेत. त्याबद्दल पुन्हा एकदा सांगावे. उपमुख्यमंत्री मा.अजित पवार यांनी या विषयासंदर्भात सूचना केल्या होत्या. अतिरिक्त आयुक्त श्री.प्रकाश कदम साहेब त्यावेळी होते. माझ्या वॉर्डमधील डिफेन्स भागातील जुना रस्ता आहे. त्यासंदर्भात तीन वर्षे पाठपुरावा करतोय. मिलिटरी यांनी कंपाऊंड बांधून रस्ताच बंद केला आहे. इथे आपली व्हिजिट सुद्धा झाली होती. मा.दिलिप बंड साहेब, मा.शर्मा साहेब असताना सुद्धा त्यांची व्हिजिट झाली होती. या रस्त्याला या विषयात कोणी सामिल करुन घेत नाही. त्याठिकाणी रहिवासी लोकांना रस्ता बंद केला तर बाहेर येण्याजाण्यासाठी जागा राहणार नाही. मी सांगतो म्हणून विश्वास ठेवू नका. मला एक काय शंभर वेळा तुमच्यासमोर सांगावे लागते. चुकीचे सांगत असेल तर करु नका. तुम्ही शब्द दिला आहे. हा विषय त्यात घेतो. हा विषय घेतला नाही पण माझ्यानंतर आलेले विषय

प्रायोरीटीने घेतले आहेत. मी बावळट आहे का? आम्हाला रस्ता नाही म्हणून सांगतोय. तिथे राहणा-या लोकांसाठी महत्वाचा विषय आहे.

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना)** - मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, पिंपळे सौदागरपासून डेअरी फार्मपर्यंत, भोसरी उड्डाणपूलापर्यंत रस्ता करायचा आहे. चार रस्ते सांगितले आहेत. पुण्यापासून आकुर्डी पर्यंत ज्या-ज्या डिफेन्सच्या जागा आहेत. पूर्वी डिफेन्सकडे जो प्रस्ताव पाठवला होता, तो त्यातीलच आहे. रक्षक सोसायटी व असे २ रोड डिफेन्सने अडवलेले आहेत. त्याप्रमाणे हा इश्यू आला आहे. दादांसमोर विषय झाला आहे. संरक्षण खात्याचे अधिकारी यांच्याबरोबर मिटींग झाली. त्यांच्याकडे सर्व विषय घेऊन गेलो होतो. त्यांनी पूरावा द्यायचा आहे. आपण म्हणताय, आपली जागा आहे. ते म्हणतात त्यांची जागा आहे. त्यांचा नकाशा आला असेलतर चेक करुन घेतो.

**मा.महेशदादा लांडगे-** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, दोन विषय आहेत. रक्षक सोसायटी असे ३ विषय प्रायोरीटीने घेतले आहेत. विषय कधी आला, डिफेन्समध्ये कधी मांडला याची तारीख सांगा. मी विषयाची तारीख सांगतो. मी काही गोष्टी सांगतो. त्यात काही तथ्य असते. आयुक्त दिलीप बंड यांच्या वेळचा विषय सांगतोय. माझ्याकडून तुम्हाला कोण सांगणार, महेश लांडगे यांचे काम करा म्हणून. सभागृहातील कोणत्याही प्रशासन अधिका-याला विचारा, चुकीचे काम सांगणार नाही. रस्ता बंद केलातर लोक येऊ देत नाहीत. आपण त्यांना मंजूरी दिली आहे याचा तरी विचार करा.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, सदर विषयाची उपसुचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३४३ विषय क्रमांक - ५
दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.स्था/काअ/५००/२०१३,दि.२/०७/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र. २९ दि. २/०८/२०१३

मनपाचे सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विशेष योजना पानांक २९ अ.क्र.१०३ देहू आळंदी रस्ता साखळी क्र. ८/२५० कि.मी. ते १५/२५० कि.मी. ३० मी. डी.पी. प्रमाणे उर्वरित कामे करणे या कामासाठी र.रु.१० कोटी तरतूद केली असल्याने त्या तरतूदीमधून सदर कामासाठी र.रु.९,६३,८०,०००/- (अक्षरी र.रु.नऊ कोटी त्रेसष्ट लाख ऐंशी

हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्राधिकरण, सेक्टर २६ मध्ये नाट्यगृह व कलादालन याकरिता सुमारे ८००३.३० चौ.मीटर क्षेत्र आरक्षित असून सदर जागेवर नाट्यगृह व कलादालन उभारणेचे नियोजित असून, त्यासाठी मे.पी.के.दास †न्ड असो. यांची नेमणुक करण्यात आली आहे. प्राधिकरण, निगडी व आकुर्डी परिसरातील नागरिकांकरिता एक उत्तम मनोरंजनाची सोय होणार असून त्यासाठी सुमारे ३१ कोटी रुपये एवढा खर्च येणार आहे. तरी प्राधिकरण, सेक्टर २६ मध्ये नाट्यगृह व कलादालन इमारत उभारणेकरिता आवश्यक रक्कम रुपये ३१ कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.९ मधील रस्ता तयार करणे, सुभोभिकरण करणेसाठी येणा-या १० कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच एस-१ संप से.क्र.१० पर्यंत एम.एस.गुरुत्वनलिका पुरविणे, उतरविणे, अंथरणे, जोडणी करणे, चाचणी देणे व कार्यान्वित करणे आणि एस-२ संप जवळ १ द.ल.लि. क्षमतेच्या व से.क्र. १० येथे ३ द.ल.लि. क्षमतेच्या संप व पंप घराचे संकल्पन करणे, चाचणी देणे, कार्यान्वित करणेचे कामाची निविदा रक्कम रुपये २०,३६,९८,३९३/- इतकी असून निविदा दर ११.२६% कमी आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. वि.प्रा/ अभि.अ/उवि/क्र/३कू.उ.पु./२४०/१३ दि.२५/४/२०१३ रोजी सध्या कार्यान्वित नसलेली १२०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी स्थलांतरीत करुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यास अनुसरुन मा.आयुक्त यांचे दालनात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचे समवेत दि.२२/५/२०१३ रोजी आढावा बैठक झाली. सदर बैठकीत स्पाईन रस्त्यावर कुदळवाडी चौकात नियोजित उड्डाणपूल बांधणेचे कामात अडथळा ठरणारी वरील कामाअंतर्गत टाकणेत आलेली १२०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी म.न.पा.ने सदर कामाचे ठेकेदार यांचेकडून स्थलांतरीत करणेचे व त्यासाठी येणारा खर्च पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी म.न.पा.स देण्याचे मान्य केलेले आहे. त्यानुसार स्पाईन रस्त्यामधील कुदळवाडी चौकामध्ये उड्डाणपूल बांधण्याच्या कामात अडथळा ठरणारी १२०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी स्थलांतरीत करणेसाठी नव्याने करावी लागणा-या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ९३,००,०००/- इतकी येत आहे. सदर कामास व त्याच्या खर्चास प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. तरी सदर स्थलांतरीत करणेचे काम वरील कामाअंतर्गत करणेस व त्याच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

तसेच जलक्षेत्र क्र.बी/१० खराळवाडी व गांधीनगर भागातील पाणीपुरवठा २० लाख लि. क्षमतेचे उंच टाकी बांधणे व टाकी भरणेसाठी ४०० मी.मी. व्यासाची पाईप लाईन टाकणे. म.न.पा. अंदाजपत्रक सन २०१३-१४ मधील पान क्र. ६९३ अ.क्र.१२, अंदाजपत्रकीय रक्कम रु.२०,००,०००/- वरील कामाचे नावामध्ये व अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये दुरुस्ती करुन “जलक्षेत्र क्र.बी/१० खराळवाडी व गांधीनगर भागातील पाणीपुरवठा २० लाख लि. क्षमतेचे

उंच टाकी बांधणे व टाकी भरणेसाठी ६०० मी.मी. व्यासाची एम.एस. पाईपलाईन टाकणेस” प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. अंदाजपत्रकीय रक्कम रु. ९,५०,००,०००/-.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये कासारवाडी येथे मनपामार्फत मैलापाणी शुद्धीकरणासाठी टप्पा क्र. १,२ व ३ असे एकुण तीन Sewage Treatment Plant आहेत. सदर प्लॅन्टमध्ये सद्यस्थितीत सर्वसाधारण ७४ ते ८० एम.एल.डी. मैलापाण्यावर प्रक्रिया केली जाते. सद्यस्थितीत प्रक्रियायुक्त पाण्याचा पुर्नवापर काही प्रमाणात मनपाचे उद्यानासाठी करणेत येतो व उर्वरित पाणी नदीपात्रामध्ये सोडणेत येते. **CME** येथे कासारवाडी **STP** पासून पंपिंगद्वारे पाणी पुरविणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामाची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम रु.२,४७,४८,२११/- इतकी येत असलेबाबत, त्यांना यापूर्वी कळविलेले आहे. त्यानंतर त्यांनी दिनांक २५/०७/२०१३ रोजीचे पत्रानुसार सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम मनपाकडे डिपॉझीट म्हणून जमा करणेची तसेच या रक्कमेतून काम पूर्ण झालेनंतर देखभाल, दुरुस्तीकामी प्रति महिना आवश्यक ती रक्कम देणेची संमती दर्शविलेली आहे. तसेच सदरचे काम त्यांनी त्वरीत पूर्ण करुन देणेबाबत कळविलेले आहे. परंतु सदर कामासाठी CME यांचेकडून सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकानंतर (म्हणजे २५ जुलै २०१३ रोजी) पत्र मिळाले असून या विभागामार्फत सदर कामाचे खर्चासाठीची तरतुद या वर्षाच्या मनपाच्या अंदाजपत्रकामध्ये करणेत आलेली नाही. परंतु सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम CME कडून मनपाकडे जमा होणार असलेने त्या रक्कमेतून सदर काम मनपामार्फत करुन घेणेस येणारे अंदाजे सुमारे र.रु.२,४८,००,०००/- चे रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.राजेंद्र काटे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ३४४ विषय क्रमांक - ६

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.वैद्य/८/कावि/६८१/२०१३, दि.१२/७/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.३० दि. २/०८/२०१३

मौजे दापोडी येथील आरक्षण क्र.३/४ मुस्लिम दफनभूमीमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३२२ नुसार दफनविधी करणेस परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.महेशदादा लांडगे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४०/२०१३, दि.१६/०६/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र. ३१ दि. २/०८/२०१३

डॉ.उदय टेकाळे, सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २७/०८/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब, हा विषय तहकुब करण्यात यावा अशी सूचना करते.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाच्या अनुषंगाने सभागृहाच्या वतीने आपल्याला विनंती करु इच्छितो. मुंढे साहेबांनी पिंपरी चिंचवड महापालिकेत चार वर्षे अतिशय चांगले काम केले. त्यांच्या काळात महापालिकेची आर्थिक परिस्थिती चांगल्या पद्धतीने सुधारली. जकात विभागाला शिस्त लागली, गळती होती ती थांबली. आपल्याला विनंती आहे की, याठिकाणी मुंढे साहेबांचा सभागृहाच्या वतीने सत्कार करण्यात यावा.

**मा.स्वाती साने** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रमांक ७ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३४५ विषय क्रमांक - ७
दिनांक -१९/८/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४०/२०१३,
दि.१६/०६/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र. ३१ दि. २/०८/२०१३

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ८
दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/ड-१/२०४/१३,
दि.१०/०५/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.६ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३२३ दि.२६/७/२०१३

पिंपरी चिंचवड मनपाने मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजुर विकास योजनेतील मिळकती (मौजे पिंपळे निलख शीव ते वाकड चौक शाळा) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी भुसंपादन करणेकामीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मंजुरीने मा.जिल्हाधिकारी यांना सादर केलेला आहे. प्रस्तावातील बाबी विचारात घेता भूसंपादन प्रक्रियेबाबत कायदेशीर गुंतागुंत टाळणेचे दृष्टीने मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजूर विकास योजनेतील मिळकती (मौजे पिंपळे निलख शीव ते वाकड शाळा चौक स.नं.२४२पै., २४४पै ते २४९ पै, २५१पै, २५७ पै ते २६३ पै, २६५ पै व २६६ पै, २६९ पै ते २७२ पै, २७६पै ते २७८पै.) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी सदर जमिनीचे म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतूदीनुसार भूसंपादन करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब. सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.स्वाती कलाटे** - मा.महापौर साहेब, हा विषय मागे घेण्यात यावा अशी सूचना करते.

**मा.सुमन नेटके –** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर –** सदर विषय मागे घेण्यात येत आहे.

यानंतर सदर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ३४६ विषय क्रमांक - ८
दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/ड-१/२०४/१३, दि.१०/०५/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.६ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३२३ दि.२६/७/२०१३

विषय- मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजुर विकास योजनेतील मिळकती (मौजे पिंपळे निलख शीव ते वाकड चौक शाळा) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी भुसंपादन करणेबाबत...

मा.महापालिका आयुक्त यांना (विषय क्रमांक ८) त्यांचे संदर्भिय विषयपत्र मागे घेणेस परवानगी देणेत येत आहे.

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मागे घेण्यात आलेचे मा.महापौर यांनी प्रकट केली.

-------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ९
दिनांक - १९/८/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था.EWS/२०२/२०१३,दि.०३/०६/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.०९/०७/२०१३ ठ.क्र.१९ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३२७ दि.२६/७/२०१३

पिंपरी चिंचवड मनपाच्या JnNURM - BSUP अंतर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येणा-या EWS घरकुल योजनेअंतर्गत च-होली व डुडुळगाव येथे

११३४ घरे बांधणे प्रस्तावित असुन त्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे DPR मधील १३२५० घरापैकी चिखली येथील से.क्र.१७ व १९ मधील ६७२० घरे व च-होली व डुडुळगाव येथील ११३४ घरे असे एकुण ७८५४ घरांचे काम पुर्ण होईल. उर्वरीत ५३९६ घरे जागेअभावी व JnNURM Mission चा कालावधी मार्च २०१४ अखेर असल्यामुळे बांधणे शक्य नाही. या अनुषंगाने प्रकल्प ७८५४ सदनिकांपर्यंतच सिमित करणेबाबतचा सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल (D.P.R.) शासनाकडे पाठविणे आवश्यक असल्याने सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने JnNURM अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) १३२५० घरे बांधण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडून मंजूर करुन घेतला आहे. त्यापैकी चिखली येथिल सेक्टर क्र.१७ व १९ येथे ६७२० घरे बांधण्याचे काम चालू असून ते लवकरच पूर्ण होईल.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीता (EWS) घरे बांधण्यासाठी शहराच्या विकास आराखड्यामध्ये (DP) ठिकठिकाणी आरक्षणे आहेत. त्यातील च-होली व डुडूळगांव येथिल जागा जवळपास ९५% ताब्यात आलेली आहेत व त्या ठिकाणी ११३४ घरे बांधणे शक्य आहे. अशा रीतीने १३२५० पैकी ७८५४ घरे पूर्ण होतील. JnNURM अभियानाची मुदत मार्च २०१४ अखेर आहे व शहरातील EWS ची आरक्षणे ताब्यात नसल्यामुळे JnNURM योजनेतील सर्व घरे मार्च २०१४ अखेर पूर्ण होणे शक्य नाही. ही बाब लक्षात घेता JnNURM ची मुदत संपल्यानंतर सुद्धा शहरातील EWS ची आरक्षणे ताब्यात घेऊन या योजनेमधील उर्वरीत पात्र लाभार्थ्यांना घरे देण्यासाठी नविन धोरण आखून सदरचा प्रस्ताव केंद्र सरकार व राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवावा अथवा नविन धोरणानुसार महानगरपालिकेस आर्थिकदृष्ट्या शक्य असल्यास शहरातील या योजनेमध्ये पात्र झालेल्या लाभार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आरक्षणाच्या जागांवर घरे बांधण्याचे नियोजन करावे.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.रामदास बोकड -**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,या विषयाच्या अनुषंगाने आपल्याला विनंती करते की, गेले पाच महिने झाले. नाशिकफाटा, पिंपळे सौदागर इथून जो बीआरटीएस रोड जातो, तिथे किमान तीस लोकांनी स्वतःहून घरांचा ताबा दिलेला आहे. ३० कुटूंबे आज रोजी बेघर झाली आहेत. मी चार/पाच महिने प्रशासनाचा कारभार पाहिला आहे. या

लोकांविषयी टाळाटाळ चाललेली दिसते. टाऊन प्लॅनिंगकडून दोन दिवसाच्या कामासाठी दोन महिने लागतात. त्याचे कारणच हे आहे. गेले दीड वर्षांत छोट्या-छोट्या रस्त्यांसाठी आम्ही ओरडतोय. त्याकडे कोणी लक्ष देत नाही. १९९४ चा डिपी बदलला आहे. त्याकडे दूर्लक्ष करतो. अवॉर्ड डिक्लेअर केले जात नाही. जे लोक जागा ताब्यात देत नाही. त्यांच्या जागेतून रस्ता होत नाही. अशा लोकांवर कारवाई होत नाही. टाऊन प्लॅनिगचे लोक त्यांना पाठिशी घालतात हे खरे दूर्देव आहे. समक्ष आयुक्त साहेबांशी केबिनमध्ये मी चर्चा केली आहे. गेल्या १५ तारखेला पेपरमध्ये नोटीस जाहिर केली होती. गेले ५ महिने हे लोक रस्त्यावर आहेत. त्यांचा आपल्याकडून विचार झालेला नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, ज्या लोकांनी जागेचा ताबा दिला आहे, त्याठिकाणी रस्ता झाला आहे. ईडब्ल्यूएसची घरे एक महिन्याच्या आत तयार करुन या सर्वांना देण्याचे काम आपण निश्चितपणे करावी अशी विनंती करतो. अन्यथा पुढील मिटींगमध्ये या विषयावर मला बोलायची संधी देऊ नका. एक महिन्याच्या आतमध्ये आपण त्यांना त्वरित ताबा द्यावा अशी अपेक्षा व्यक्त करतो. पिंपळे गुरव, सांगवी येथून १८ मी. रस्ता करण्यासाठी स्थापत्य विभागाकडून टाळाटाळ होते आहे. जाणिवपूर्वक कामे होत नाहीत. साईड पट्टा केला तरी तो भरला जात नाही. याची दखल घेणे गरजेचे आहे.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, दुर्बल घटकांच्या घरांसंदर्भात सर्वांनी चर्चा केली आहे. या योजनेची मुदत दि. ३१ मार्च २०१४ रोजी संपते आहे. योजना पूर्ण करत असताना येणारे अडथळे डोळ्यासमोर ठेवताना या कालावधीत ७ ते ८ हजार घरे बांधणे शक्य नाही. याठिकाणी सूचना राहिल की, स.नं.१०० मध्ये अर्धे लोक शिफ्ट झाले आहेत. अजमेरा येथील स्टेडीयमचा ८ एकरचा प्लॉट रिकामा होतो आहे. आपण घरे बांधायचे काम करणा-या संबंधित लोकांवर कारवाई करावी. तिथे फायर ब्रिगेडचे रिझर्वेशन आहे. एमआयडीसीच्या ओपन प्लॉटमध्ये सुद्धा घेऊ शकतो. भूसंपादनासाठी बाहेर अडचण येत असेलतर या गरीब माणसांसाठी घरे बांधायचा प्रोजेक्ट करण्यात यावा. यात लक्ष घालावे अशी संबंधित अधिका-यांना सूचना द्यावी अशी विनंती आहे.

**मा.सुलभाताई उबाळे -**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण जो घरकुलाचा विषय याठिकाणी आणला आहे. उर्वरीत फक्त सतराशे घरे बांधणार आहोत. नंतर घरे बांधणार का नाही याची शाश्वती दिली जात नाही. या विषयावर वारंवार प्रचारात्मक चर्चा झाली आहे. जाहिरात काढली त्यावेळी ज्या लोकांनी अर्ज भरले, त्यांनी असंख्य हालअपेष्टा सहन केल्या आहेत. त्यांनी तासनतास रांगेत उभे राहून फॉर्म घेतले आहेत. कागदपत्रे गोळा करताना त्यांचा बराच खर्च झालेला आहे. त्यांना आपण घरे न देण्याचा आपल्याला अधिकार पोचत

नाही. जर आपल्याकडे जागा ताब्यात नव्हती तर तेवढ्या घरांचे टेंडर कशासाठी काढले? आपली चूक आहे. कोणावर जबाबदारी निश्चित करणार आहोत. ज्यावेळी या लोकांना स्वप्न दाखवले गेले, २००७ पासून स्वप्नातील घरकूलाची गोष्ट चालू आहे. लोकांनी असंख्य आंदोलने केली आहेत. कोणत्यातरी आशेने बघितले होते. तुम्ही घरे मिळणार असे आश्वासन दिले होते. मागिल आयुक्तांनी हे सगळे केले. ते त्यांच्या जबाबदारीतून निघून गेले. आणि आता आपण सांगताय, मी त्यावेळी नव्हतो. आता निर्णय घेण्याची जबाबदारी आपल्यावर आली आहे. आपण ही जबाबदारी झटकू शकत नाही. यात आपला अपराध नाही. प्राधिकरणाकडे अशी आरक्षणे असतील तर ती त्यांच्याकडून मागा. या लोकांना घरे द्या. खरेतर त्यांना घरे द्यायची आपली जबाबदारी नव्हती पण आपण ती स्विकारली आहे. काही लोकांना घरे मिळाली आहेत, काही लोकांना मिळाली नाहीत. ज्यांना घरे मिळाली नाहीत त्यांच्यावर ही अन्यायकारक भूमिका होते आहे, असमानता होते आहे. जेवढे पात्र अर्ज आहेत, त्यांची कॉम्प्यूटराईज्ड वेटींग लिस्ट लावली आहे. लोकांना घरे मिळणार आहेत असे सांगितले जाते. परंतू या गोष्टीला कोण जबाबदार आहे? कन्सल्टंट सगळी फी घेऊन गेला आहे. सगळा निधी खर्च झालेला आहे, याला कोण जबाबदार आहे? महापालिका सभेमध्ये या विषयाला मंजूरी देऊन आम्ही जे पाप केले ते आम्ही आमच्या माथ्यावर घेणार नाही. हे पाप करण्यासाठी आम्ही कोणाच्याही पाठिमागे लागलो नव्हतो. जे केले आहे ते निस्तरले पाहिजे. चौकाचौकात बसून किती दिवस झाले. लोक आंदोलन करत आहेत. आपल्याला पण माहिती आहे. किती महत्वाचा विषय आहे. प्राधिकरणाकडे चौकशी करा. त्यांच्या घरकुल योजनेत आपल्या लाभार्थ्यांना घरे द्यायला सांगितली. अर्जाची स्क्रूटिनी झाली होती. लोकांनी कागदपत्रे दिली होती. आणि आत्ता सांगताय, घरे मिळणार नाहीत. मा.महापालिका सभेत निर्णय होतो. हा निर्णय घेतल्यानंतर आमच्या मनात अपराध केल्याची भावना राहणार आहे. अशा प्रकारची उपसूचना आली आहे. आम्ही शिरसावंद्य नाही असे म्हटले आहे.
अशा प्रकारची उपसूचना घ्या. तरच हा विषय मंजूर करा.

**मा.शारदा बाबर-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, या विषयासाठी मी थांबले आहे. हा गरीबांच्या जिव्हाळयाचा विषय आहे. माझ्या वॉर्डाच एकदम गरीब लोक आहेत. ही योजना नगरपालिकेने आखली होती. सामान्य लोकांनी तुमच्याकडे घरे मागितली नव्हती. तुम्ही करु शकत नाहीतर हा विषय आणता कशाला? योजना कशाला राबवताय? शेअर कशाला लावताय? निवडणूका आल्या की, लोकांना पूर्ण अपेक्षा दाखवायची नंतर काहीतरी कारण सांगून जागा नसेलतर अर्धवट योजना कशाला राबवितोय? गरीबांचा प्रश्न आहे. त्यांनी पन्नास हजार भरले आहेत. ते कसे भरले त्यांना माहित आहे. दीड लाखाचे घर तीन/चार लाखांवर गेले आहे. तिथे जाऊन पाहून या. त्यांना घर मिळणार अशी त्यांनी मानसिक

तयारी केली आहे. एकिकडे अनधिकृत घरे पाडायची, दुसरीकडे लोकांना घरकुल द्यायचे. ज्यांची घरे आहेत त्यांची पाडायची मग त्यांनी कुठे जायचे? माझी आपल्याला मनापासून कळकळीची विनंती राहील की, ही योजना पूर्णत्वाला न्यावी. गरीबांना घरे दिलीच पाहिजेत. ही महापालिका श्रीमंतांची महापालिका आहे का श्रीमंत महापालिका आहे समजत नाही. गरीबांना घरे देऊन ही गरीबांची महापालिका आहे हे दाखवून द्या.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ४,००० घरांची योजना असताना आज याठिकाणी लोकांना घरकुल देण्याचे प्रयत्न चालू आहेत. हायकोर्टाने गेले २.५ वर्षांत किती एफ.एस.आय. कन्झ्युम झाला आहे याची प्रत्यक्ष माहिती या पत्रात मागितली आहे. सुरुवातीपासून वादात ठेवलेली योजना आहे. जागा ताब्यात नसताना बांधकाम केले. या योजनेतील त्रुटींची पूर्तता करताना आयुक्तांच्या नाकी नऊ आले. करायचे कोणी भरायचे कोणी? आयुक्त साहेब, तुम्ही खूप सहनशील आहात. तुमच्या सहनशीलतेला दाद देते. तुम्ही चुक करत नाही. पूर्वी केलेल्या चुकांवर पांघरुण घालताय. ही योजना काटेकोरपणे नियम पाळून व्हायला पाहिजे होती तशी झाली नाही. नियम पालन करताना त्याप्रकारेच ती पूर्ण करावी लागली आहे. हे सगळे करत असताना त्यात त्रुटी असताना १३,००० लोकांना घरकुल देऊ शकलो असतो तर निश्चितपणे आनंदच झाला असता. ज्यावेळी घरकुल योजनेचा विचार केला, त्यावेळी सभागृहात आम्ही चार होतो. आता चौदा झालो आहोत. त्यावेळी चार असताना सुद्धा आम्ही आपल्या पाठिशी उभे होतो. आज मात्र खेदाने नमूद करावेसे वाटते की, आपण उर्वरीत योजना पूर्ण करु शकला नाहीत. आमचा विरोध असणार आहे. खरेतर योजना राबवली आहे. संपूर्ण लोकांसाठी राबवली पाहिजे. आपल्याकडे २,००० घरे ज्या लोकांना देणार आहोत, त्यांना ती मिळणारच नाहीत. त्यातील एकजण जरी कोर्टात गेलातर घरांचे वाटप करु शकणार नाही. आपल्याकडून त्यांचा अधिकार डावलला गेला आहे. अपनोंकी किमत सपनोंसे ज्यादा होती है। यांची किंमत आपल्याला पर्यायाने सभागृहाला भोगावी लागणार आहे. आपण गरीबांचे स्वप्न तुडवले नाही काय? त्यांना जे दिव्य पार करावे लागले आहे ते त्यांनाच माहिती आहे. किती आरक्षणे ताब्यात आहेत? नगररचना विभागाला याची माहिती दिली आहे. मग ही देखील घरे बांधली पाहिजेत. लोकांचे स्वप्न पूर्ण करायची जबाबदारी आपली आहे. आपण त्यांना स्वप्न दाखवले होते. आज जरी पैशांची अडचण असली तरी, ४५० कोटी ६५ हजार रुपये घरांसाठी खर्च झाले असले तरी त्याठिकाणी झालेला भ्रष्टाचार, घरांच्या किंमतीत झालेली वाढ याचा विचार करता आपल्याला लोकांच्या भावनांशी खेळता येणार नाही. आपल्यामुळे त्यांना घरे मिळणार नाहीत. आपण ही जबाबदारी घेणार कारण आपण एक जबाबदार अधिकारी आहात. आपण जबाबदारी टाळत नाही. चांगला नागरिक म्हणून, चांगला आय.एस.आय. ऑफीसर म्हणून उर्वरीत लोकांची

सुद्धा जबाबदारी घ्या. आपण जबाबदारी घेतली नाहीतर झालेली घरे सुद्धा आपण वाटू शकणार नाही. पात्रधारकांची यादी तयार केली आहे. ५०,००० भरायला लावले. ड्रॉ झाला. सगळ्यांना लॉटमध्ये पत्र गेली होती. ते कोर्टात जाणार आहेत. त्यानंतर इमारती भग्न अवस्थेत उभ्या राहतील तर त्यांचे काय करणार आहोत? याचा कुठेतरी विचार करावा लागणार आहे. सर्वांना समाविष्ट करुन घ्या. करु शकत नाही असे म्हणत असालतर आम्ही कशासाठी मान्यता देणार आहोत? एकदा विरोध होतो. याबाबतीत आम्ही सहभागी होणार नाही. महापौर साहेब, महापौर म्हणून तुम्ही उर्वरित लोकांची जबाबदारी घेतली पाहिजे. कोणत्यातरी प्रकारे या योजनेत बसले पाहिजेत. प्रोजेक्ट म्हणून त्यात कोट्यावधी खर्च करतो त्यात यांच्यावर सुद्धा खर्च होईल. एलबीटीमुळे महापालिकेचे उत्पन्न घटले आहे. ५ वर्षांपूर्वी सुकाळ होता. याचे आम्ही साक्षीदार आहोत. ज्यावेळी ही योजना करु शकत होतो, त्यावेळी केली नाही. आज करु शकत नाही म्हणून धडधडीत सांगतोय. यात या लोकांचा काय दोष आहे? दिवसभर लाईनमध्ये थांबून कुत्र्यासारखे यांना हाकलून देत होते, हाडहाड करत होते. वृद्ध स्त्रिया, लहान मुले लाईनमध्ये थांबत होते. त्यांचा काहीच दोष नव्हता. अशा प्रकारे आपण एखाद्याचे स्वप्न चिरडून टाकत आहोत. कुठेतरी प्रयत्न करा, कमिटमेंट करा. ते कमिटमेंट फूलफील करा. पुढे पाहून तर काहीच होणार नाही. ड्रॉ झाला त्यांचे काय करणार आहात? त्यांचा विश्वासघात केला म्हणून उद्या आपल्यावर फौजदारी गुन्हा दाखल होईल. आपल्याला विनंती आहे की, गृहप्रकल्प पूर्णतः सगळ्या नागरीकांसाठी राबवावा. अर्धवट प्रोजेक्टला मान्यता घेताना माणुसकीच्या दृष्टीकोणातून, नागरीकांच्या भावना समजून घेऊन हा प्रोजेक्ट पूर्ण करावा.

**मा.कैलास कदम**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,ईडब्ल्यूएस योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून १३,२५० घरांपैकी आज ७८०० घरे बांधून तयार होत आहेत. या संख्येबाबत संभ्रम निर्माण होत असताना ४४९६ कुटूंबांना घरे उपलब्ध होणार नाहीत. याठिकाणी केंद्र शासनाकडून, राज्य शासनाकडून या योजनेसाठी आपल्या महापालिकेला निधी मिळाला आहे. दूर्बल घटकांसाठी ईडब्ल्यूएस योजना आहे. निश्चितपणे या योजनेच्या माध्यमातून ज्यांनी ज्यांनी घरे मिळण्यासाठी अर्ज भरले आहेत त्यांना घरे मिळाली पाहिजेत. ही कामगार नगरी, कष्टक-यांची नगरी आहे. आपण सगळ्या योजनांसाठी शासनाकडून पैसे आणले होते. आपण त्यांना ४४९६ लोकांना घरे उपलब्ध करुन देण्याबाबत सांगताय. तसा प्रस्ताव शासनाला पाठवला असल्याचे नमूद केले आहे. १३२५० कुटूंबांसाठी जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून निधी आला होता, त्यावेळी आपल्या महापालिकेच्या ज्या जागा उपलब्ध होत्या, त्या माध्यमातून जे अधिकारी काम करत होते. त्यांच्या माथी हे पाप का आले नाही? दूर्बल घटकांसाठी घरांची योजना आहे. केंद्र सरकार, राज्य सरकारच्या माध्यमातून ही योजना

राबवताना निश्चितपणे या पापत काँग्रेस पक्ष सुद्धा सहभागी होणार नाही. योजना वेळेत पूर्ण न केल्यामुळे टार्गेट पूर्ण केलेले नाही असे यात म्हटले आहे. यात आपण निश्चितपणे मतदान घ्यावे. पुढील घरे होणार नाहीत, यासाठी याठिकाणी विरोध होतो आहे. पुढील घरे दूर्बल घटकांसाठी ईडब्ल्यूएसच्या माध्यमातून देणार आहोत. ती उपलब्ध करुन दयावीत अशी विनंती करतो.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,महापालिकेने गरीबांना घर देण्याची योजना राबविली. ही योजना खरेतर गरीबांसाठी नव्हती. त्या योजनेचा हेतू वेगळा होता. सभागृहापुढे विषय आला त्यावेळी मी बोललो होतो, शहरातील कोणत्याही व्यक्तीने मला घराचे छप्पर नाही मला घर द्या असे सांगितले नव्हते. कोणत्याही माणसाने एक रुपयाचा अर्ज करुन तिकिट लावून मला घर द्या म्हणून विनंती केली नव्हती. मुळात ही योजना राबवली त्यावेळी या योजनेत जो भ्रष्टाचार झाला, एका प्रतिष्ठेसाठी ही योजना राबविली आहे. या लोकांना घरे देताय पण हे महापालिकेचे कर्तव्य नव्हते. मुळात योजना राबविताना नागरीकांना आशेवर ठेवले. त्यांना घरे मिळाली नाहीत. याचा सुद्धा तुम्हाला शाप लागणार आहे. भविष्यात ज्या नागरीकांना घरे मिळणार नाहीत, ज्या नागरीकांना घरे देऊ शकणार नाहीत, ते नागरीक आशेवर बसले आहेत. त्यांना घरे मिळाली आहेत, ते देखील त्या घरात जाऊन राहू शकणार नाहीत इतक्या नित्कृष्ट दर्जाचे काम झाले आहे. २०१२ मध्ये प्रकल्प पूर्ण व्हायला पाहिजे होता. आजही पूर्ण झालेला नाही. असे असताना आज केवळ योजना बंद करायची म्हणून सभागृहात विषय मांडतो आहोत. प्रामुख्याने महापालिका क्षेत्रात चांगला प्रकल्प करण्यासाठी महापालिकेकडे जो निधी आहे, तो वेगळ्या मार्गाकडे, प्रसिद्धीसाठी वळवला. जाहीरातीपोटी मोठ्या प्रमाणात खर्च करुन प्रसिद्धी मिळवली. यातून महापालिकेच्या निवडणूकीत स्वार्थ साधला गेला. पाचशे रूपयाला फॉर्म वाटले गेले. सिमाताईंनी सांगितल्याप्रमाणे, गोरगरीब माणसे, अपंग माणसे दिवस दिवस फॉर्मसाठी थांबत होते. त्यांनी किती हेलपाटे घातले आहेत. तुम्ही या सगळ्यांना निराश केले आहे. त्यांचे शब्द, भाषणे पहा. जेवढ्या योजना डिक्लेअर केल्या आहेत, तेवढ्या योजना पूर्ण करु असे सांगितले होते. आता योजना बंद करताय. ७८५४ घरे देऊ असा दावा करत असालतर त्याला आमचा विरोध आहे. मा.कैलास कदम यांनी मतदान घेऊन मागणी केली आहे त्याला मी पाठिंबा देतो.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,विरोधी पक्षनेते मा.कैलास कदम यांनी उपसूचना व्यवस्थित ऐकली असती तर ब-याचशा शंका-कुशंका दूर झाल्या असत्या. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी इतकी मोठी चांगली योजना आणली आहे. यात कोणत्याही पक्षाचा दोष नाही. प्रशासनाचा दोष आहे. आम्ही

निधी आणला, पैसे आणले, योजना आणली. क्रेडिट घ्यायचा प्रश्न आलातर क्रेडिट घेणे हा सत्ता ज्याची असते त्याचा तो धर्मच असतो. तो आमचा अधिकारच आहे. आमच्या नेत्यांनी गोरगरीबांसाठी योजना राबवली. हे आजही सांगतोय, उद्याही सांगणार. ज्या उपसूचना केल्या, त्यात म्हटले होते, सर्वांना घर मिळावे यासाठी शहरात फक्त डुडुळगांव इथे ईडब्ल्यूएसची आरक्षणे आहेत. नवीन समाविष्ट गावांत दूर्बल घटकांसाठी योजना करताना आरक्षणे ताब्यात घेताना तिथल्या जास्तीत जास्त लोकांना घरे देता येतील अशा प्रकारचा प्रयत्न प्रशासनाने करावा. हे करत असताना नेत्यांनी केलेला होकार व आघाडी सरकारमधील सर्वांना बरोबर घेऊन जाणार. याच गोष्टी मर्यादीत असतील तर महापालिकेने ठराव करुन लिमिटेशन पुढे वाढवता येतील. राज्य शासन मदत करते. याचसाठी प्रयत्न असेलतर टप्याटप्याने महापालिकेने आपली योजना पूर्ण करावी अशी उपसूचना सभागृहात मांडली आहे. प्रशासनाने आपला  टाकला आहे. त्यांनी चूक केली. प्राधिकरणात प्रॉब्लेम आहे. रेड झोनमधील जागा आहे. हे काही मनापासून सांगितले नाही. मा.अजितदादा पवार, मा.पृथ्वीराज चव्हाण यांनी हेच सांगितले आहे. सभागृहाने हेच सांगितले होते. यात संपूर्ण चूक प्रशासनाची आहे. त्याचे खापर आमच्यावर का फोडताय? आम्ही हे सहन करणार नाही. योजना राबवली हे आम्ही अभिमानाने सांगतोय. कोणी स्वप्नभंग केलेला नाही. स्वप्नपूर्ती करण्यासाठी पूर्ण प्रयत्न राहणार आहे. म्हणून उपसूचना केली आहे. आम्ही जागा निवडली नाही. योजना राबवायची जागा निवडायचे काम प्रशासनाने केले आहे. हे त्यांनी बघायचे आहे. उपसूचना दिली आहे. शहरांत इतर ठिकाणी योजना करावी अशी राज्य शासनाकडे विनंती करणार आहोत. एक्सटेंशन मिळेल ते ठिक नाही. आम्ही जी आश्वासने दिली होती, ती टप्याटप्याने पूर्ण करावीत, हेच पक्षाचे धोरण आहे. हेच आघाडी सरकारचे धोरण आहे. हे अप्लाय केलेले निकष नीट पडताळून पहावेत. दुसरा टप्पा पहावा. खरोखर गरजवंत आहेत का, आर्थिक दूर्बल आहेत का हे तपासण्यात कसूर होऊ नये. हे सुद्धा तपासून पहावे अशी विनंती करतो.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शब्दांची फेकाफेक हे राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष यांचेकडे कसब आहे. ते चुकू शकत नाहीत. उपसूचना वाचली म्हणून तर बोललो आहोत. यात कुठेही खात्रीलायक शब्द वापरलेला नाही. मूळ विषयाला उपसूचना आहे. आत्ता बोलून दाखवले ते केले असेलतर हा विषय प्रशासनाकडून आला पाहिजे होता. आयुक्त साहेब, तुम्ही २ वर्षांत निघून जाल, म्हणाल यात माझा काही संबंध नाही. गरीब तसेच राहीले. हिंदीत एक म्हण आहे, चोरी और सिनाजोरी, गिरे तोभी तंगडी ऊपर। मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री कोणाचेच नाव घ्यायचे नाही. ही जेएनएनयूआरएमची योजना आहे. निधी आणताना खोटे बोलून आणला आहे. योजनेचे वाट्टोळे केले आहे. प्रशासकीय चूक आहे. सत्ताधारी पक्षाचा कामकाजावर अंकुश पाहिजे नको का**?** चांगले केले की आम्ही केले.

मोठमोठे पूल झाले आम्ही केले. चूक झालीतर ती प्रशासनाने केली. ही अत्यंत निंदनीय गोष्ट आहे. उपमुख्यमंत्री सकाळी सहा वाजता फिरले, मंगलाताई सगळीकडे फिरल्या. चांगले केले ते त्यांनी केले. वाईट केले ते आम्ही केले असे म्हणणे चुकीचे आहे. त्याच वर्षी दोन/तीन हजार लोकांना सांगितले असते. दादा आले तेव्हा आपण जाऊन सांगू असे आमचे म्हणणे होते. आत्ताच पक्षाध्यक्षांनी सांगितले आहे, टप्याटप्याने घरे देऊ. यात जर-तर नको आहे. आयुक्त कमिटमेंट करु शकतात. ते रेकॉर्डवर येईल. कमिटमेंट केलीतर हे आम्ही देऊ अशी नुसती उपसूचना द्यायची. जीत भी मेरी पट भी मेरी असे असेलतर आमचा या उपसूचनेला विरोध आहे. या विषयावर मतदान घेण्यात यावे. आम्ही संख्येने कमी आहोत पण आम्हाला या पापातून वाचवण्यासाठी मतदान घेण्यात यावे.

**मा.भाऊसाहेब भोईर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आम्ही आमची भूमिका स्पष्ट केली आहे. मा.योगेश बहल यांनी सविस्तर ठराव मांडल्यानंतर आनंद झाला. या आनंदात सहभागी होण्यासाठी मी या विषयाला पाठिंबा देऊ इच्छितो. भारतातून ५ महानगरपालिकांची जेएनएनयूआरएमच्या योजनेमध्ये निवड करत असताना त्यात पुणे महानगरपालिकेचे नाव होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नाव यात अंतर्भूत करण्याचे श्रेय मा.मुख्यमंत्री यांना असताना कोणत्याही योजनेची घोषणा करताना, त्याची नोंद करताना त्यांचे नाव घेतले जात नाही. सत्ताधारी पक्ष हजरच होतो. श्रेय घेण्याचे उघड मनात असताना जेएनएनयूआरएम योजनेच्या माध्यमातून कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी, गतिमान शहराचा विकास व्हावा म्हणून शहराला नाव देण्यासाठी ही योजना कार्यान्वित झाली होती. पूर्वीपासून मा.आप्पा बारणे यांनी देखील मत व्यक्त केले होते. मी सुद्धा मत व्यक्त केले होते. यात महापालिकेचा काय संबंध आहे? ज्या पद्धतीने घोषणा झाली, मतांचे राजकारण झाले हे प्रत्येक पक्ष करत असतो. शिवसेनेची जिथे सत्ता आहे, तिथे सुद्धा या प्रकारच्या घोषणा असतात. हे सर्व करत असताना आपण कुठेतरी अर्धवट उपसूचनेच्या माध्यमातून ठाम निर्णय घ्या. त्याप्रमाणे होऊ द्या. त्याचा कालखंड किती याची शहानिशा करुन पुन्हा एकदा विषय सभागृहासमोर आणावा. संदिग्धता काहीच नाही. कुठेही उदघाटनात कॉंग्रेस पक्षाचे नाव घेत नाहीत म्हणून आम्ही सहभागी नाही असे नाही. हा विषय पुन्हा एकदा व्यवस्थित करुन सभागृहापुढे ठेवावा. अन्यथा मा.कैलास कदम यांनी मागणी केली आहे. त्यांच्या मताशी मी सुद्धा ठाम आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जेएनएनयूआरएमचा प्रोजेक्ट आहे. मागिल महिन्यात हा विषय एवढ्यासाठी तहकूब ठेवला होता. खरेतर शुभेच्छा द्यायची आहे. कमिशनर त्यांच्या मताशी ठाम होते. आमच्याकडे कुठे जागा नाही. फंड मिळतील का

नाही. पालकमंत्र्यांबरोबर मिटींग झाली होती. त्यात ठरले की, जेएनएनयूआरएमची मुदत संपत असलीतरी केंद्र सरकार व मा.शरद पवार साहेबांच्या माध्यमातून मुदतीत परत वाढ करुन घेऊन या लोकांना घरे द्यावीत. म्हणून मिटींगमध्ये उपसूचना देण्यात आली आहे. जेवढी ईडब्ल्यूएसची आरक्षणे आहेत, शहरात तेवढ्या जागा आहेत. तिथे आर्थिक दुर्बळ घटकांसाठी घरे द्यायची आहेत. आयुक्त साहेबांनी यावर खुलासा करावा की, पहिल्यांदा केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवू. या या बैठकीत खरेतर राष्ट्रवादी व कॉंग्रेस पक्ष दोघांनी कमिटमेंट केलेली आहे. लोकांना घरे देणार आहोत. त्या दृष्टीकोणातून आमचे सुद्धा हेच म्हणणे आहे. लोकांना घरांची सुविधा देण्याबाबत विषय ठेवला आहे. केंद्र सरकारला कळवा, या या जागा योजनेसाठी आहेत. जागा ताब्यात घेणार आहोत. जितकी घरे देता येतील द्यायची आहेत. वेळ लागला तरी द्यायची आहेत. या दृष्टिकोणातून उपसूचना दिलेली आहे. तुमचे म्हणणे काय आहे. या आधी झालेल्या मिटींगमध्ये असेच म्हटले आहे. या दृष्टीने टप्याटप्याने घरे देण्याच्या योजनेत हा विषय मंजूर करावा.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)**–मा.महापौर साहेब,सर्व सन्मा. सदस्य, जेएनएनयूआरएम चा डिपीआर मंजूर झाला, त्यावेळी १३२५० घरे बांधायचे सादरीकरण केले होते. त्याला मान्यता मिळाली आहे. जागा ताब्यात येतील या अपेक्षेने घरकुले पूर्ण झाली. काही जागा ताब्यात आल्या. लगेच वाटप करणे अपेक्षित होते. जवळपास ९० टक्के जागा ताब्यात आल्या होत्या. उर्वरीत जागा ताब्यात आल्यानंतर घरे वाटप सुरु करु शकतो. मार्च २०१४ मध्ये जेएनएनयूआरएम योजनेचा कालावधी संपुष्टात येत असल्यामुळे रिवाईज डिपीआर सादर करणे आवश्यक होते. म्हणून हा विषय आला आहे. या प्रोजेक्टमध्ये नाहीतर अनेक प्रोजेक्टमध्ये रिवाईज प्लॅन सादर केलेला आहे. स्टॉर्म वॉटर ड्रेनेजमध्ये पाईपचा डायमिटर पडलेला आहे, ही अपेक्षा प्लॅनिंगमध्ये शंभर टक्के योग्य नाही. केवळ पिंपरी चिंचवड महापालिकाच रिवाईज प्रोजेक्ट सादर करते असेही नाही. पुणे महापालिकेने देखील घरकुल योजनासारखे अनेक प्रकल्प रद्द करुन रिवाईज करुन घेतले. महापालिकेने धोरण ठरवले. प्रोजेक्ट करायच्या हेतूने, कृतित्मक हेतूने ठरवलेले धोरण आहे. महापालिका प्रशासनाने पुरेपूर प्रयत्न केले होते. धोरण ठरवायचे आणि करायचे नाही असा हेतू यात दिसत नाही. प्रकल्पाच्या जागा नाहीत. प्लॅन रिवाईज करुन सादर करुन लाभार्थ्यांना त्याचा लाभ देता येईल. आपल्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये ईडब्ल्यूएस योजनेसाठी आरक्षणे आहेत, ती ताब्यात आलेली नाहीत. राज्य शासन स्तरावर बैठक झाली आहे. त्यात चर्चा झाली. ईडब्ल्यूएसची आरक्षणे जेएनएनयूआरएम योजनेत विकसित करतोय. केंद्र सरकारच्या योजना या स्वतःच्या योजना बनवून त्याचा मसुदा तयार करुन त्या मा.महापालिका सभेसमोर आणतोय. म्हाडाकडून मार्केट रेटपेक्षा स्वस्त घरे मिळतात. त्याच पद्धतीने २.५ एफ.एस.आय. वाढवून

मिळण्याची विनंती करतोय. त्यामुळे मार्केट रेटपेक्षा कमी रेटने दुर्बल घटकांसाठी स्वस्तात घरे मिळू शकतील. लगेच सभागृहात हे धोरण आणतोय. आज शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवतोय. अडीच एफएसआय मागतोय. त्याला मान्यता मिळालीतर त्यात उरलेल्या लाभार्थींना प्राधान्याने देता येतील. अशा गाईडलाईन धोरणात समाविष्ट करणार आहोत. त्याप्रमाणे लाभार्थ्यांना त्यात समाविष्ट करुन घेता येऊ शकेल असे महापालिकेचे नियोजन राहील.

**मा.कैलास कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ज्येष्ठ सदस्य मा.योगेश बहल यांनी सांगितले होते. हा प्रश्न पिंपरी चिंचवडमध्ये रहात असल्याकारणाने दूर्बल घटक, कष्टकरी कामगारांचा प्रश्न आहे. जवळपास १३,००० घरांसाठी अर्ज दिला आहे. काटकसरीने ४४०० कुटूंबांना घरे देता येणार नाहीत. सरकारला सादर करणार असे नमूद केले आहे. आघाडी सरकारकडे त्याची कल्पना निश्चित आहे. आयुक्त साहेबांनी आत्ता वक्तव्य केले. त्याप्रमाणे महापालिकेत घेणार आहोत का? घेणार असाल तर ४०९६ कुटूंबांना घरे उपलब्ध होणार असतील तर तशाप्रकारची घोषणा आपण याठिकाणी करावी. ४०९६ लोक बाकी आहेत. त्यात प्रस्तावित सगळे लोक दूर्बल घटक या माध्यमातून फॉर्म भरले आहेत. त्यांना घरे देणार आहात का? मग तसे नमूद करा. हे मिनिटस् मध्ये घेणार आहात का? आपण स्पष्टीकरण करावे, तसा आदेश द्यावा. ४६९६ लोकांना त्याच रेटमध्ये समाविष्ट करुन घेणार आहात का? नाहीतर विषय तहकूब करावा.

**मा.अजित गव्हाणे**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर या सगळ्याच नगरसेवकांची मागणी किंवा इच्छा आहे, शहरातील ज्या लोकांनी अर्ज केले त्या शंभर टक्के सगळ्या लोकांना घरे मिळाली पाहिजेत. त्या दृष्टिकोणातून प्रशासनाच्या ज्या अडचणी आहेत, त्याचा आयुक्त साहेबांनी खुलासा केला आहे. पुढील मा.महापालिका सभेपूर्वी आपण सर्व पक्षांच्या प्रमुखांची बैठक लावावी. सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर हा विषय पुढील मिटींगमध्ये घ्यावा. सगळ्यांची हिच भूमिका व अपेक्षा आहे. आम्हालाच क्रेडिट घ्यायचे नाही. सगळ्या पक्षांना याचे क्रेडिट मिळाले पाहिजे. सगळे मिळून प्रकल्प राबवतोय. भविष्य काळात या गोष्टीचे क्रेडिट सगळ्या नगरसेवकांना मिळाले पाहिजे म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, सर्व पक्षप्रमुखांची मिटींग आयोजित करावी, नंतर पुढील मिटींगमध्ये हा विषय जी.बी.समोर यावा.

**मा.महापौर** **:-** विषय क्रमांक ९ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ३४७ विषय क्रमांक - ९
दिनांक -१९/८/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था.EWS/२०२/२०१३,दि.०३/०६/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.०९/०७/२०१३ ठ.क्र.१९ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३२७ दि.२६/७/२०१३

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले. --
------

**(मा.मुंढे साहेब, सहा.आयुक्त, जकात/एल.बी.टी. विभाग यांचा सत्कार करण्यात आला.)**

**मा.सुनिता वाघेरे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १०
दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.जयश्री गावडे, मा.उषा वाघेरे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि. १७/०७/२०१३ ठ.क्र. २२ नुसार

प्रभाग क्र.२४ (प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) मधील पिंपरी चिंचवड येथील लक्ष्मीनगर येथे सर्वे नं.२६८ मधील भुखंडामध्ये, आरक्षण क्र.२३७, बेघरांसाठी घरे या कारणास्तव आरक्षण केलेले आहे. परंतु सदर भुखंड हा पुरनियंत्रण रेषेत आहे. त्यामुळे बेघरांसाठी घरे या विषयास अनुसरुन आरक्षित केलेल्या जागेचा मुळ हेतु साध्य होत नाही किंवा बांधकाम करता येणार नाही. म्हणजेच सदर जागेत मनपाच्या नियमानुसार कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नसल्यामुळे सदर भुखंडामधील, बेघरांसाठी घरे हे असलेले आरक्षण बदलुन सदर भुखंडाची जागा ही गार्डनसाठी आरक्षित करण्यात यावी. कारण पिं.चिं. लिंक रोड परिसरात २० हजारांहुन जास्त लोकसंख्या आहे. सदर परिसरात सुमारे ४ ते ५ हजार इतकी फ्लॅटची संख्या आहे. स्मशानभुमी, झोपडपट्टी, मोठया प्रमाणावर नाला, दोन मैला शुध्दीकरण प्रकल्प,काही ठिकाणी छोटे रस्ते आहेत. तसेच मोठमोठया सोसायटया असुन सदर सोसायटयांना गार्डन नाही. त्यामुळे तेथील लहान मुलांना खेळण्यासाठी तसेच जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी गार्डनची व्यवस्था नाही.

मुलांना मोकळा श्वास घेण्यासही खुल्या हवेची जागा नसल्याने तसेच परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी सदर जागेचा गार्डनसाठी विचार करावा. त्यामुळे सदर आरक्षित जागेचा योग्य वापर होईल व नागरिकांना त्याचा उपभोग घेता येईल. तरी सदर जागेतील वरील आरक्षण बदलुन गार्डनसाठी आरक्षण करणेकामी सदरच्या ठरावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.जयश्री गावडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.झामाबाई बारणे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सदर विषयाला विरोध नाही. नदीपात्रात बांधकामे चालली आहेत. पाडापाडी केलेली आहे. ज्या-ज्या ठिकाणी बांधकामे चालली आहेत, या बांधकामांवर आपले नियंत्रण नाही का. त्यांना पूररेषेचा धोका नाही का. अनेक ठिकाणी नदीपात्रातील बांधकामे पाडलेली आहेत. पत्राशेंड सुद्धा पाडलेल्या आहेत. पूररेषेत आहे, नदीपात्रात आहे अशा बिल्डरची मोठमोठी बांधकामे चालली आहेत. हे आपल्या निदर्शनास आणून देते की, बिर्ला हॉस्पीटलच्या शेजारी मोठी बांधकामे चालली आहेत. मोरया पूल इथे दोन बिल्डरची कामे चालली आहेत. मला वाटते रावेत पूररेषेत,नदीपात्रात सुद्धा मोठी बांधकामे चालली आहेत. त्याला कशी काय परमिशन दिली आहे. किती वर्षांपूर्वी परमिशन दिलेली आहे याची मला माहिती पाहिजे. त्या बांधकामांना कधी परमिशन दिली आहे. त्या बांधकामांकडे आपले दूर्लक्ष होते. हा विषय नाही परंतू शाळेतल्या मुलांना पिण्यासाठी पाणी नसते. आयुक्तांना सुद्धा फोटो दिलेला आहे. प्यायला पाणी नाही अशा परिस्थितीत जवळजवळ ५/६ महिने पाणी वाहत होते.

**मा.अजय सायकर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शाळेसाठी जागेचे आरक्षण केले आहे. ४० हेक्टर असून सुद्धा मनपाची शाळेची इमारत झाली नसल्यामुळे शाळेत पहिली पासून ७वी पर्यंत वर्ग भरत असतात. मला विनंती करायची आहे, लवकरात लवकर जागा ताब्यात घेऊन आरक्षण असलेल्या जागेत शाळेची इमारत बांधण्यात लक्ष घालावे.

**मा.अनंत को-हाळे –** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, एका प्रभागाचे धोरण आखताना ज्या पद्धतीने आज मंजूरी केली आहे. पूरनियंत्रण रेषेत प्लॉट आहे, तिथे गार्डन करायचा ठराव केलेला आहे. माझ्या प्रभागात आरक्षण क्र.२३० क पूर नियंत्रण रेषेत प्लॉट ४० गुंठ्यांचा प्लॉट आहे. प्रसूतीगृहाचे आरक्षण आहे तिथे बांधकाम होऊ शकणार नाही. अशा आरक्षणाविषयी धोरण पुढे काय असणार आहे. माझ्या प्रभागात प्रसूतीगृहासाठी आरक्षित जागा आहे, तिथे उद्यान व्हावे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, विषयाला विरोध नाही. बेघरांसाठी घरे या विषयाची आरक्षणे डी.पी. त भरपूर आहेत. त्यानुसार मनपाने कोणतेही धोरण ठरवलेले नाही. ज्यांची घरे रस्त्यांत, प्रकल्पात जातात, त्यांना घरे दिली पाहिजेत. याबाबतीत चर्चा झाली आहे. मा.रामदास बोकड यांनी मुद्दा मांडला आहे, तो अत्यंत महत्वाचा आहे. नाशिक रोडचे काम चालू आहे. महापालिकेला जागा देऊन २० वर्षे झाली आहेत. ज्यांनी स्वतःच्या जागेत घर बांधले आहे, त्यांची घरे महापालिकेने तोडली आहेत. पर्यायी व्यवस्था काहीच केलेली नाही. मार्केट रेटप्रमाणे पैसे देत होतो. आज एक गुंठा जागेचा रेट २० लाखांत गेला आहे. मार्केट रेटप्रमाणे पैसे कसे देणार आहोत? आज त्यांचे संसार उघड्यावर आहेत. कॉलेजला जाणा-या मुली आहेत. हे कोणी तुमच्या नजरेसमोर आणले आहे का? बेघरांसाठी घरे ही जी आरक्षणे आहेत, त्यात नेमके काय करायचे? एक गुंठा जागा महापालिका देणार नाही. ४/५ मजली बिल्डींग बांधून तेवढ्या मापाची घरे देणार असाल तर त्याला न्याय मिळणार आहे. नदीपात्रात येत नाही तिथे अन्य काहीतरी कारण होईल. आरक्षण होईल. हळूहळू संख्या कमी होईल. शहराच्या दृष्टीकोणातून जे असायला पाहिजे ते दिसणार नाही. घरकुल बिल्डींगमध्ये मागणी केलेली आहे ते देऊ शकतो का याचा विचार करावा. बिल्डींग बांधून झाल्या आहेत. जेवढे लोक आहेत त्यांना घरे द्यावीत अशी विनंती करते.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, विषयाला विरोध करणार नाही. सहकार्य करताना सुद्धा निस्वार्थीपणे सहकार्य केले पाहिजे. माझ्या मित्रांनी हा विषय भूलवून मांडला आहे. दरबदल करण्यासाठी कलम ३७ची कारवाई केली आहे. त्यांची चूक नाही. हेतू शुद्ध पाहिजे. सर्वे नं.२६८ करिता पूररेषेचे दोन-दोन नकाशे आहेत. यापूर्वी सभागृहात ते दिलेले आहेत. ९० टक्के पूररेषेच्या आत, दुस-या ९० टक्के पूररेषेच्या बाहेर दोन्ही ठिकाणी बांधकाम होऊ शकणार नाही. पूररेषेच्या आतमध्ये असल्यामुळे तिथे गार्डन करायचा विषय मांडला आहे. परंतू खरेतर विषय मांडताना ज्यावेळी मा.शहर सुधारणा समितीतून विषय आला. त्यावेळी नगररचनाच्या कोणत्याही अधिका-याने खरेतर मार्गदर्शन करायची गरज होती. हा विषय आला, पास झाला. त्याच्यापुढे काहीच होणार नाही. कागदोपत्री फक्त विषय पास होणार. माझ्या मित्रांना विनंती आहे. आरक्षणाचे दोन, पूररेषेचे दोन नकाशे इथे दाखवले आहेत. मागिल ५ वर्षांमध्ये कोणते नकाशे योग्य ते आधी ठरवा. ते ठरवताना मला स्वतःला पाटबंधारे विभागाने ९० टक्के प्लॉट पूररेषेत आहे असे उत्तर दिले आहे. अशी आरक्षणे ताब्यात घ्यायची का नाही याची सुद्धा मला माहिती द्यावी लागेल. आपण निर्णय घेतला. त्याचा वर्षात पुन्हा १०० टक्के फायदा घेणार आहे ते इथेच सांगते.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

प्रभाग क्र.२४ (प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) मधील लक्ष्मीनगर येथे स.नं.२६८ मध्ये असलेल्या भुखंडावर, आरक्षण क्रमांक २३७ बेघरांसाठी घरे असे आरक्षण आहे. परंतू सदर आरक्षणाचा भुखंड हा पुरनियंत्रण रेषेत येत असल्याने मनपा नियमानुसार कोणतेही बांधकाम करता येणार नाही. पर्यायाने आरक्षणाचा मूळ हेतू साध्य होणार नाही. सदर परिसरात वीस हजारापेक्षा अधिक लोकसंख्या असुन स्मशानभूमी, झोपडपट्‍टी, मोठ्या प्रमाणावर असलेल्या नाले व मैलाशुद्धीकरण प्रकल्पांमुळे पर्यावरण संवर्धन करण्यासाठी उद्यान करणे गरजेचे आहे. त्यानुसार आरक्षण क्र. २३७, बेघरांसाठी घरे यामध्ये बदल करुन ते उद्यानासाठी आरक्षण करण्यात यावे. महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये बदल करुन बेघरांसाठी घरे या आरक्षणाऐवजी उद्यान हे आरक्षण करण्यात यावे. सदर विषयास कायम होण्याची वाट न पाहता, मा.आयुक्त यांनी हरकती सूचना मागवून अंतिम निर्णय घेवून सदर विषय पुढील कार्यवाही करण्याकरीता व शासनास प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

**मा.उषा वाघेरे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, प्रभाग क्र.२३ केशवनगर या प्रभागामध्ये आरक्षण क्रमांक – २३० (क) प्रसुतीगृह एकूण क्षेत्र ०.४ स.नं.२८४ पैकी असून हा भुखंड पूरनियंत्रण रेषेमध्ये येत आहे. तरी सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नसल्याने व प्रभागामध्ये मुलांना व जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी, महिलांना मोकळा श्वास घेण्यासाठी उद्यान अस्तित्वात नसल्याने त्याठिकाणचे आरक्षण बदलून उद्यानासाठी आरक्षण करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राहूल जाधव** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.सुनिता वाघेरे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.
यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३४८ विषय क्रमांक - १०
दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.जयश्री गावडे, मा.उषा वाघेरे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि. १७/०७/२०१३ ठ.क्र. २२ नुसार

प्रभाग क्र.२४ (प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) मधील पिंपरी चिंचवड येथील लक्ष्मीनगर येथे सर्वे नं.२६८ मधील भुखंडामध्ये, आरक्षण क्र.२३७, बेघरांसाठी घरे या कारणास्तव आरक्षण केलेले आहे. परंतु सदर भुखंड हा पुरनियंत्रण रेषेत आहे. त्यामुळे बेघरांसाठी घरे या विषयास अनुसरुन आरक्षित केलेल्या जागेचा मुळ हेतु साध्य होत नाही किंवा बांधकाम करता येणार नाही. म्हणजेच सदर जागेत मनपाच्या नियमानुसार कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नसल्यामुळे सदर भुखंडामधील, बेघरांसाठी घरे हे असलेले आरक्षण बदलुन सदर भुखंडाची जागा ही गार्डनसाठी आरक्षित करण्यात यावी. कारण पिं.चिं. लिंक रोड परिसरात २० हजारांहुन जास्त लोकसंख्या आहे. सदर परिसरात सुमारे ४ ते ५ हजार इतकी फ्लॅटची संख्या आहे. स्मशानभुमी,झोपडपट्टी,मोठया प्रमाणावर नाला, दोन मैला शुध्दीकरण प्रकल्प,काही ठिकाणी छोटे रस्ते आहेत. तसेच मोठमोठया सोसायटया असुन सदर सोसायटयांना गार्डन नाही. त्यामुळे तेथील लहान मुलांना खेळण्यासाठी तसेच जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी गार्डनची व्यवस्था नाही. मुलांना मोकळा श्वास घेण्यासही खुल्या हवेची जागा नसल्याने तसेच परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी सदर जागेचा गार्डनसाठी विचार करावा. त्यामुळे सदर आरक्षित जागेचा योग्य वापर होईल व नागरिकांना त्याचा उपभोग घेता येईल. तरी सदर जागेतील वरील आरक्षण बदलुन गार्डनसाठी आरक्षण करणेकामी सदरच्या ठरावास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.२४ (प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) मधील लक्ष्मीनगर येथे स.नं.२६८ मध्ये असलेल्या भुखंडावर, आरक्षण क्रमांक २३७ बेघरांसाठी घरे असे आरक्षण आहे. परंतू सदर आरक्षणाचा भुखंड हा पुरनियंत्रण रेषेत येत असल्याने मनपा नियमानुसार कोणतेही बांधकाम करता येणार नाही. पर्यायाने आरक्षणाचा मूळ हेतू साध्य होणार नाही. सदर परिसरात वीस हजारापेक्षा अधिक लोकसंख्या असुन स्मशानभूमी, झोपडपट्टी, मोठ्या प्रमाणावर असलेल्या नाले व मैलाशुद्धीकरण प्रकल्पांमुळे पर्यावरण संवर्धन करण्यासाठी उद्यान करणे गरजेचे आहे. त्यानुसार आरक्षण क्र. २३७, बेघरांसाठी घरे यामध्ये बदल करुन ते उद्यानासाठी आरक्षण करण्यात यावे. महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये बदल करुन बेघरांसाठी घरे या आरक्षणाऐवजी उद्यान हे आरक्षण करण्यात यावे. सदर विषयास कायम होण्याची वाट न पाहता, मा.आयुक्त यांनी हरकती सूचना मागवून अंतिम निर्णय घेवून सदर विषय पुढील कार्यवाही करण्याकरीता व शासनास प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. तसेच प्रभाग क्र.२३ केशवनगर या प्रभागामध्ये आरक्षण क्रमांक – २३० (क) प्रसुतीगृह एकूण क्षेत्र ०.४ स.नं.२८४ पैकी असून हा भुखंड पूरनियंत्रण रेषेमध्ये येत आहे. तरी सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नसल्याने व प्रभागामध्ये मुलांना व जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी, महिलांना

मोकळा श्वास घेण्यासाठी उद्यान अस्तित्वात नसल्याने त्याठिकाणचे आरक्षण बदलून उद्यानासाठी आरक्षण करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले

-------

**मा.उषा वाघेरे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३४९ विषय क्रमांक - ११

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.उषा वाघेरे,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव -

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि. १७/०७/२०१३ ठ.क्र.२३ नुसार

प्रभाग क्र.४५ मधील मोनिका बिल्डींग, विशाल आंगण यांच्या सोसायटीमधील मोकळी जागा सर्वे नं. ३०९ खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असुन सदर जागा ताब्यात घेण्यासाठी भुसंपादनाची कार्यवाही करुन जागा ताब्यात घेणेत येत आहे.

**मा.आशा सूर्यवंशी** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

## <u>मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे / कामे</u>

**मा.आशा सुर्यवंशी** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १२

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/३०१/२०१३ दि.६/२/२०१३

२) मा.क्रीडा समिती सभा दिनांक २१/२/२०१३ ठराव क्र.४७ .

३) मा.विधी समिती सभा दिनांक १/३/२०१३ रोजी ठराव क्र.१२४

४) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३०६९ दिनांक १२/३/२०१३

५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/६१५/१३,दि.१९/३/२०१३

६) मा.महापालिका सभा ठराव क्र.३२८ दि.२६/७/२०१३

प्रस्तावात सविस्तर क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-अ ,क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ब , क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-क ,क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ड ,मध्ये नमुद केलेप्रमाणे मनपा क्रिडा धोरण मसुद्यास तसेच ३ डिसेंबर अपंग दिनानिमित्त अंध ,अपंग ,व मतिमंद विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करणेकामी परिशिष्ट अ/ब मध्ये नमूद तपशिलाचा मूळ धोरण मसुद्यात समावेश करुन परिपूर्ण क्रीडा धोरण मसुद्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, या विषयात भरपूर त्रुटी आहेत. संबंधित क्रिडाक्षेत्रातील लोकांना वारंवार बोलवून चर्चा केली आहे. उपसूचना खूप मोठ्या प्रमाणात होत होत्या. एका विषयाला किती उपसूचना द्यायची, किती दुरुस्त्या करताना मोठ्या प्रमाणात दुरुस्ती होते आहे. म्हणून क्रिडा समितीतून क्रिडाचे विषय यावेत. विनंती आहे की ज्यांना ज्यांना उपसूचना द्यायच्या आहेत, त्यांना क्रिडा समितीतून उपसूचना देता येतील. नंतर हा विषय पुन्हा येईल. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – सदर विषयात त्रुटी असल्याने त्या दुरुस्त करुन सदरचा विषय क्रिडा समितीमार्फत फेरसादर करणेत यावा.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर विषयाचे उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.आशा सुर्यवंशी** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक -३५० विषय क्रमांक - १२

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/३०१/२०१३ दि.६/२/२०१३

२) मा.क्रीडा समिती सभा दिनांक २१/२/२०१३ ठराव क्र.४७ .

३) मा.विधी समिती सभा दिनांक १/३/२०१३ रोजी ठराव क्र.१२४

४) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३०६९ दिनांक १२/३/२०१३

५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/६१५/१३,दि.१९/३/२०१३

६) मा.महापालिका सभा ठराव क्र.३२८ दि.२६/७/२०१३

सदरच्या विषयात त्रूटी असल्याने त्या दुरुस्त करुन सदरचा विषय क्रमांक १२ क्रिडा समितीमार्फत फेरसादर करणेत यावा.

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली काळभोर**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १३

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ: - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/९०२/२०१३ दि.०८/०७/२०१३

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.३३१ दि.२६/७/२०१३

महापालिकेचे वाढलेले कार्यक्षेत्र व लोकसंख्येमध्ये झालेली वाढ विचारात घेता, महापालिका कार्यक्षेत्रामधील नागरिकांना पायाभूत नागरी सुविधा पुरविणे व कार्यालयीन कामकाजाची विभागणी समप्रमाणामध्ये करणे आवश्यक आहे. त्याकरीता सध्या लोकसंख्या विचारात घेऊन पूर्वीच्या अ,ब,क व ड या ०४ प्रभाग समित्यांव्यतिरिक्त नव्याने आणखी ०२ प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २९-अ नुसार नवीन द्विसदस्यीय प्रभाग रचनेमुळे प्रभाग कार्यालय या नावामुळे संभ्रम निर्माण होतो. प्रभाग समितीमध्ये प्रादेशिक क्षेत्र समाविष्ट होत असल्याने समिती कार्यालयाचे नाव क्षेत्रीय कार्यालय असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

पुनर्रचनेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे –

| अ.क्र. | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | प्रस्तावित कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | अ क्षेत्रीय कार्यालय | ८,१०,१४,१५,१६,१७, १८,१९,२५,२६,२७ = ११ | भेळ चौकातील सध्याचे अ प्रभाग कार्यालय |
| २. | ब क्षेत्रीय कार्यालय | २०,२१,२२,२३,२४,४२, ४९,५०,५१,५२,५३ = ११ | अस्तित्वातील ब प्रभाग कार्यालय, एल्प्रो कंपनी आवार |
| ३. | क क्षेत्रीय कार्यालय | ३७,३९,४०,४१,४३,४४, | अस्तित्वातील क प्रभाग कार्यालय, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ४५,६१,६२,६३,६४ = ११ | हॉकी स्टेडीयम शेजारी |
| ४. | ड क्षेत्रीय कार्यालय | ४६,४७,४८,५४,५५,५६, ५७,५८,५९,६० = १० | अस्तित्वातील ड प्रभाग कार्यालय, रहाटणी |
| ५. | इ क्षेत्रीय कार्यालय | ६,७,२९,३०,३१,३२,३३, ३४,३५,३६,३८ = ११ | ग्रोथ लॅब, भोसरी |
| ६. | फ क्षेत्रीय कार्यालय | १,२,३,४,५,९,११,१२,१३, २८= १० | जागा निश्चित करणे आवश्यक आहे. |

उपरोक्तप्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करुन क्षेत्रीय कार्यालयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २९-अ अन्वये मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते –

उपरोक्तप्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करुन क्षेत्रीय कार्यालयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २९-अ अन्वये खालीलप्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात येत आहे.

क क्षेत्रीय कार्यालय - प्रभाग क्रमांक ४३,४४,४५ वगळून ड क्षेत्रीय कार्यालयात समाविष्ट करणेत यावेत.

ड क्षेत्रीय कार्यालय - प्रभाग क्रमांक ५८,५९,६० वगळून क क्षेत्रीय कार्यालयात समाविष्ट करणेत यावेत.

इ क्षेत्रीय कार्यालय - प्रभाग क्रमांक ३८ वगळून क क्षेत्रीय कार्यालयात समाविष्ट करणेत यावा.

**मा.आशाताई सुर्यवंशी** – मा.महापौर साहेब,उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक -३५१ विषय क्रमांक - १३

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/९०२/२०१३दि.०८/०७/२०१३
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.३३१ दि.२६/७/२०१३

महापालिकेचे वाढलेले कार्यक्षेत्र व लोकसंख्येमध्ये झालेली वाढ विचारात घेता, महापालिका कार्यक्षेत्रामधील नागरिकांना पायाभूत नागरी सुविधा पुरविणे व कार्यालयीन कामकाजाची विभागणी समप्रमाणामध्ये करणे आवश्यक आहे. त्याकरीता सध्या लोकसंख्या विचारात घेऊन पूर्वीच्या अ,ब,क व ड या ०४ प्रभाग समित्यांव्यतिरिक्त नव्याने आणखी ०२ प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २९-अ नुसार नवीन द्विसदस्यीय प्रभाग रचनेमुळे प्रभाग कार्यालय या नावामुळे संभ्रम निर्माण होतो. प्रभाग समितीमध्ये प्रादेशिक क्षेत्र समाविष्ट होत असल्याने समिती कार्यालयाचे नाव क्षेत्रीय कार्यालय असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

पुनर्रचनेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे –

| अ. क्र. | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | प्रस्तावित कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | अ क्षेत्रीय कार्यालय | ८,१०,१४,१५,१६,१७,१८,१९,२५, २६, २७ = ११ | भेळ चौकातील सध्याचे अ प्रभाग कार्यालय |
| २. | ब क्षेत्रीय कार्यालय | २०,२१,२२,२३,२४,४२,४९,५०, ५१, ५२,५३ = ११ | अस्तित्वातील ब प्रभाग कार्यालय, एल्प्रो कंपनी आवार |
| ३. | क क्षेत्रीय कार्यालय | ३७,३९,४०,४१,४३,४४,४५,६१, ६२, ६३,६४ = ११ | अस्तित्वातील क प्रभाग कार्यालय, हॉकी स्टेडीयम शेजारी |
| ४. | ड क्षेत्रीय कार्यालय | ४६,४७,४८,५४,५५,५६,५७, ५८,५९,६० = १० | अस्तित्वातील ड प्रभाग कार्यालय, रहाटणी |
| ५. | इ क्षेत्रीय कार्यालय | ६,७,२९,३०,३१,३२,३३,३४,३५, ३६, ३८ = ११ | ग्रोथ लॅब, भोसरी |
| ६. | फ क्षेत्रीय कार्यालय | १,२,३,४,५,९,११,१२,१३,२८= १० | जागा निश्चित करणे आवश्यक आहे. |

उपरोक्तप्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करुन क्षेत्रीय कार्यालयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २९-अ अन्वये खालीलप्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात येत आहे.

क क्षेत्रीय कार्यालय - प्रभाग क्रमांक ४३,४४,४५ वगळून ड क्षेत्रीय कार्यालयात

समाविष्ट करणेत यावेत.

ड क्षेत्रीय कार्यालय - प्रभाग क्रमांक ५८,५९,६० वगळून क क्षेत्रीय कार्यालयात समाविष्ट करणेत यावेत.

इ क्षेत्रीय कार्यालय - प्रभाग क्रमांक ३८ वगळून क क्षेत्रीय कार्यालयात समाविष्ट करणेत यावा.

यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.विधी समिती**

**मा.महेशदादा लांडगे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -३५२ विषय क्रमांक - १४

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

**अ)** दिनांक ०५/०७/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** दिनांक १९/७/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.महिला व बालकल्याण समिती**

**मा.महेशदादा लांडगे**–मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -३५३ विषय क्रमांक - १५

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

**अ)** दिनांक २६/६/२०१३, ३/७/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** दिनांक १०/७/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.शहर सुधारणा समिती**

**मा.महेशदादा लांडगे**– मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -३५४ विषय क्रमांक - १६

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

दिनांक १९/६/२०१३, ३/७/२०१३ व ९/७/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.क्रिडा समिती**

**मा.महेशदादा लांडगे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -३५५ विषय क्रमांक - १७

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

दिनांक ३/७/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.नंदा ताकवणे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३५६ विषय क्रमांक - १८

दिनांक - १९/८/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. वि/मु.का/३०२/२०१३ दिनांक १९/८/२०१३

विषय – नाशिकफाटा उड्डाणपुलाच्या सुशोभिकरणासाठी एल.ई.डी. दिवे वापरून प्रकाशव्यवस्था करणे या कामाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता व उपलेखाशिर्ष तयार करुन तरतुद वर्गीकरणास मान्यता मिळणेबाबत...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नाशिक फाटा येथे दुमजली उड्डाणपुलाची उभारणीचे काम स्थापत्य विभागामार्फत करणेत येत असुन ते नजिकच्या भविष्यात पुर्ण होणार आहे. सदर उड्डाणपुलाच्या सुशोभिकरणाकामी एल.ई.डी. दिव्यांचा वापर करुन प्रकाशव्यवस्था केल्याने उड्डाणपुलाच्या सौंदर्यात भर पडुन आकर्षक व भव्य दिसणार आहे. हा पुल महानगरपालिकेचा गौरवास्पद प्रकल्प आहे. त्यामुळे जनसामान्य, नागरीक, पर्यटक यांच्यामध्ये हा प्रकल्प बहुचर्चेचा ठरणार आहे. तथापि या कामाचा अंतर्भाव मुळ कामामध्ये नसल्यामुळे याकामी स्वतंत्रपणे कामाची निविदा मागवुन, आर्थिक तरतुद उपलब्ध करुन, आर्थिक उपलेखाशिर्ष तयार करुन काम करावे लागणार आहे. मा.उपमुख्यमंत्री मा.अजितदादा पवार यांनी सदर उड्डाणपुलाचे काम तातडीने करणेच्या सुचना दिल्या आहेत. विषयांकीत काम याच उड्डाणपुलाशी संबंधित असलेने कामाची तातडी लक्षात घेता निविदा कार्यवाहीसाठी आवश्यक बाब म्हणुन कामाच्या खर्चास मा.महापालिका सभेकडून प्रशासकीय मान्यता मिळणे आवश्यक आहे. सदर कामाच्या नावाचे उपलेखाशिर्ष निर्माण करुन या कामासाठी सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील (पृष्ठ क्र.४७, अ.क्र.१२६) नाशिक फाटा उड्डाणपूल येथे पादचा-यांसाठी FOB व इतर अनुषंगिक कामे करणे या कामासाठी केलेल्या र.रु.८ कोटी या तरतुदीमधुन तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. याकामी नाशिकफाटा उड्डाणपुलाच्या सुशोभिकरणासाठी एल.ई.डी. दिवे वापरुन प्रकाशव्यवस्था करणे या नावाचे उपलेखाशिर्ष तयार करुन सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील (पृष्ठ क्र.४७, अ.क्र.१२६) नाशिकफाटा उड्डाणपुल येथे पादचा-यांसाठी FOB व इतर अनुषंगिक कामे करणे या कामासाठी केलेल्या र.रु.८ कोटी या तरतुदीमधुन र.रु.६२ लाख इतकी तरतुद वर्ग करणेस

व कामाचा खर्च रक्कम रुपये ६२,१६,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा सुर्यवंशी** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६८ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर** – सर्वांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देऊन, सर्वांनी सहकार्य दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/९३७/१३
दिनांक – ०९ /१० /२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.